# श्याम कुलकर्णी



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# तुझी माझी जोडी!

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# तुझी माझी जोडी!

## लेखक : श्याम कुलकर्णी

# तुझी माझी जोडी!

लेखक : श्री. श्याम कुलकर्णी

**पत्ता : द्वारा श्री.जयवंत कुलकर्णी,"गन्धार"फ़्लॅट क्र.५/४**

**आयडियल कॉलनी,कोथरूड पुणे ४११०२९**

**संपर्क – व्हॉट्स ऍप क्र.९७६५४५६५८१**

**Email : sgk6642@gmail.com**

पुस्तकातील छायाचित्रे: श्री श्याम कुलकर्णी
मुखपृष्ठ: श्री.सतीश ब्रह्मे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २४ नोव्हेंबर २०२१ (कार्तिक कृ दशमी शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M.E. 1975

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित.



सतीश ब्रह्मे, मी व्यवसायाने बँकर आहे. पण लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. सध्या निवृत्तीनंतर पूर्णवेळ चित्रकला आणि शिल्पकलेसाठी वेळ देत आहे.

**तुझी माझी जोडी!**

# दोन शब्द

हा वेगवेगळ्या वेळी लिहिलेल्या विनोदी लेखांचा /कथांचा संग्रह आहे व यातील अनुभव काही अंशी मी स्वत: अनुभवले आहेत व त्यात विनोदासाठी काही कल्पित भर टाकलेली आहे हे वाचकांच्या सहजच लक्षात येईल. यातील प्रमुख दोन पात्रे मी स्वत: व कल्पनेतील माझी बायको आहे, अर्थात ही दोन पात्रे ही बहुतांश वाचकांना आपलीच प्रतिमा आहे असे वाटू शकेल. अगदी पु. ल. देशपांडे यानीही सुनीताबाईंना ’आपल्या घरात सगळे देशपांडे फक्त तू उपदेशपांडे’ असे म्हटले आहे. मला लहानपणापासून माझ्या दोन मोठ्या बहिणी, माझ्या पाठची बहीण या उपदेशपांडे आवृत्तीच होत्या व नंतर बायकोनेही तीच भूमिका बजावली, त्यामुळे या कथांना किंवा अनुभवांना ‘‘तुझी माझी जोडी’’ असे शीर्षक!

या सर्व ‘‘उपदेशपांडे’’ना

हा संग्रह अर्पण!

# कथानुक्रम

१. हिडिंबा आणि मेनका
२. मोलाचा सल्ला आणि सल्ल्याचे मोल
३. अक्कलदाढ आली पण ---
४. कहाणी माझ्या ध. रो. मु. ची!
५.. दोन तज्ज्ञ एक अज्ञ आणि एक विशेषज्ञ
६.. नाच रे पोरा!
७. सापडला म्हणून --!
८. तिची दिव्य दृष्टी
९. किस्सा कुर्सीका!
१०. आडमार्गी जाऊ नको

# १. हिडिंबा आणि मेनका

घरात मी व सौ. सुमती दोघेच असताना घराची घंटी वाजली. मुले असताना घरातील सर्व खोल्यात वावर असल्यामुळे कोणीतरी दार उघडे पण आता आम्ही दोघेच असल्यावर मोठ्या घरात दार उघडणे हे एक कामच असते. इतर वेळी सौ. घरातील कामात मग्न असल्यावर मीच दार उघडणे अपेक्षित असते पण आज मी पुस्तकाचे काम करीत होतो त्यामुळे मध्येच उठावे लागू नये म्हणून सौ. ने दार उघडले व मला आत येऊन सांगू लागली " कोणी तरी बाई तुमच्याकडे आली आहे"

बहुतेक माझ्या सर्व उपक्रमात अपेक्षित प्रतिसाद देणारी सुमती या बाबतीत मात्र संशयकल्लोळमधील रेवतीसारखे का वागते हे मला न उमगलेले कोडे. खरं तर मी अगदी नाकासमोर पाहून चालणारा आणि समोरून बाई आली तर कितीही वळसा पडला तरी तिला टाळून जाणारा. आता माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे त्यांना माझ्याशी संभाषण करावेसे वाटते त्याला माझा काय बरे इलाज? सुमतीच्या मते तसे काही नाही, मीच त्यांच्याकडे काहीतरी निमित्त काढून गप्पा मारायला जातो. आणि तिच्या मते कोणतीही स्त्री आणि पुरुष एकत्र येणे म्हणजे लोणी आणि विस्तव

एकत्र येणे आणि त्यांना दूर ठेवणेच योग्य. त्यामुळे माझ्याकडे बाई आली हे सांगताना तिच्या स्वरातील मार्दव पूर्णपणे नष्ट झाले होते. जणु काही ती बाई माझ्याकडे आली हा मोठा अपराधच माझ्याकडून झाला होता.

"माझ्याकडे?" मी जरा हबकूनच विचारले "माझ्याकडे कश्याला कोण बाई येतेय. तुझ्याकडेच आली असेल, नीट विचार तिला. " बाईला भेटण्यात मला स्वारस्य नव्हते असे नाही. पण तसे दाखवणे धोक्याचे होते.

"माझ्याकडे आली असती तर तुम्हाला कश्याला बोलवायला आले असते? " फणकाऱ्याने ती म्हणाली "सरांना भेटायच आहे तिला, असं म्हणतेय. मग भेटायच आहे का तिला? की सर नाहीत घरी, म्हणून सांगू? "

"तसं कशाला? बघतो की मी. कॉलेजविषयी काही काम असेल तर समजायला नको का?"

असे म्हणत मी गेलो. शिवाय तिच्यासमोरच भेट घडत असल्याने तिचा काही गैरसमज होण्याची भीती बाळगण्याचे कारण नव्हते. तिच्याबरोबर बाहेर येऊन पहातो तर एक अगदी अपरिचित स्त्री समोर दिसली. चाळिशीतली असावी. अंगापिंडाने मजबूत पण अंगावरील कपड्यावरून जरा गांवढळ दिसत होती

" नमस्कार सर, मी गुंडाप्पाची आई. " तिने करून दिलेल्या स्वपरिचयावरून ती कोणत्या तरी विद्यार्थ्याची आई असावी एवढा अंदाज मला करता आला. पण गुंडाप्पा कोण हे माझ्या ध्यानात येईना म्हणून मी विचारले

"कोण गुंडाप्पा? "

"अहो असं काय करता सर, त्यादिवशी आपण भेटलो नाही का? जी. एस. कुंदगोळ तो तुमचा विद्यार्थी आठवतो ना? त्याला घेऊन मी आले होते बघा. "मला आठवण करून देत ती म्हणाली. कुंदगोळ नाव ऐकल्यावर माझ्या डोक्यात प्रकाश पडला. कारण असे नाव असणारा तो एकमेव प्राणी माझ्या क्लासमध्ये होता. तसा तो बुद्धिमत्तेने मध्यम होता पण अतिशय मेहनती होता त्यामुळे परीक्षेत बरे गुण मिळवायचा. पण एक दिवस महाविद्यालयात तो आपल्या आईला घेऊन आला व ती आपला मुलगा माझा किती भक्त आहे व मी किती मेहनतीने त्या वर्गात शिकवतो अशी माझी खूप स्तुती करून शेवटी आपल्या मुलाकडे जरा अधिक लक्ष देण्याचा प्रेमळ आग्रह करून गेली, हे सगळे तिने आठवण करून दिल्यावर एकदम मला आठवले.

"अच्छा अच्छा तुम्ही कुंदगोळच्या मातु:श्री तर, बसा, बसा, काय काम काढलत? " प्राध्यापकाच्या पेशास शोभेल असे तिचे

स्वागत करत मी म्हणालो. "काही नाही सर, आमच्या शेतातली ताजी भाजी थोडीशी आणली आहे. "पिशवी माझ्यासमोर रिकामी करत ती म्हणाली.

"अहो याची काय जरुरी आहे? तुमच्या लेकाला शिकवण्याचे माझे कामच आहे आणि त्याबद्दल शासनाकडून मला पगार मिळतो. त्यामुळे याची आवश्यकता नाही " म्हणून मी तिला ती परत घेऊन जाण्यास सांगितले पण माझे काही न ऐकता तिने

"आमच्या गुंडाकडे जरा लक्ष असू द्या. खूप अभ्यास करतो त्याला पहिला वर्ग मिळायला पाहिजे" असे जणु ती माझीच जबाबदारी असल्यासारखे तिने मला बजावले.

त्यावेळी कसेतरी तिला वाटेस लावले. पण त्यानंतर ती गेल्यावर, सुमतीने मोठे डोळे करत माझ्याकडे पाहिले आणि ती म्हणाली, "एवढे नाटक करायची काय आवश्यकता होती? ती तुम्हाला भेटली होती ना एकदा, मग तसे कबूल करायला काय अडचण होती? "

" अग, अशी कधीतरी भेटणारी माणसं सगळी मी ध्यानात ठेवतो असं तुला वाटते का? आत्ता एकादी गोष्ट कुठे ठेवली हे शोधायला सुद्धा मला तुझी मदत लागते आणि ही केव्हांतरी भेटलेली नगण्य बाई माझ्या लक्षात कशी रहाणार? "

"नगण्य कश्याला, चांगली लक्षात राहील अशी दिसते बाई ती. "

"तुला काय म्हणायचय? " मी वैतागून विचारले.

"काहीनाही, तुम्हाला चांगलं माहीत आहे मला काय म्हणायचे आहे ते" असे झटक्यात म्हणून तिने विषय तेथेच थांबवला.

गुंडाप्पाच्या आईने माझा चांगलाच पिच्छा पुरवायचे ठरवलेले दिसले. पण तिने गनिमी कावा वापरण्याचे ठरवल्यामुळे नेहमी मला अगोदर सावध रहाणे जमत नसे. एक दिवस मी काही कामासाठी बाहेर गेलो होतो व आल्यावर पहातो तो सुमती चेहरा हुप्प करून बसली होती.

"काय झाले अशी का बसली आहेस? "

" तुमची ती आली होती " चेहरा आणखीच भकास करत ती म्हणाली.

"ती कोण, ती? " माझ्या लक्षात आले होते तरी मी विचारले.

"अहो असं काय करता तुमच्या लाडक्या विद्यार्थ्याची आई, आलं ना लक्षात? "

"अग ती माझ्याकडे येते त्याला आता मी काय करू. तिला तूच सांग असं घरी येत जाऊ नका म्हणून. मग तर झालं? आणि हे

बघ तुझ्यासारखी सुंदर बायको घरात असताना मला तिच्याकडे बघावं तरी वाटेल का?" तिची स्तुती केल्यावर तरी ती प्रसन्न होईल असा माझा अंदाज होता.

"त्याचं काही सांगू नका, द्रौपदीसारखी सुंदर स्त्री असताना भीमाला हिडिंबा आवडलीच होती ना?" तिच्यासमोर माझा कसलाही युक्तिवाद चालत नाही हे मात्र खरे.

त्यानंतर गुंडाप्पाच्या आईने माझा पिच्छाच पुरवण्याचे ठरवले की काय कोण जाणे. एक दिवस तर तिने घरी फोन केला व त्यावेळी फोन नुकताच आलेला असल्याने मी लगेचच घेतला,

"आहात का घरी सर, मी राधिका बोलतेय, जरा तुम्हाला भेटायचे आहे. "

"राधिका कोण राधिका? " गोंधळून जात मी विचारले.

असं काय करता सर, मी राधिका कुंदगोळ, तुमच्या विद्यार्थ्याची आई. "

" गुंडाच्या आई, " खरं तर मला माझे आईच म्हणायचे होते, पण तस म्हणणं योग्य दिसले नसते. आणि राधिका म्हटले असते तर माझ्या राधिकेने फोन माझ्या हातून हिसकावून घेऊन माझ्या टाळक्यात घातला असता.

"अहो, माझे तुमच्या मुलाकडे लक्ष आहे आणि त्याचा अभ्यास चांगला चालू आहे. तुम्ही मुळीच काळजी करू नका" असे म्हणून तिची ब्याद टाळण्याचा मी प्रयत्न केला पण तरी तिने येण्याचा हेका कायम ठेवला व माझ्या भिडस्त स्वभावामुळे मला तिला एकदम तोडून बोलणे जमले नाही. शेवटी ती आलीच व बराच वेळ बडबड करत आपल्या मुलाकडे लक्ष देण्याचा विनंतीवजा हुकूम करून गेली.

त्यानंतर शहाणा होऊन मी फोन घेण्याचे काम सौ. वरच सोपवले व तिचा फोन आल्यास मी घरात नाही असे सांगण्यास मी तिला बजावले त्यामुळे तिचा घरी येण्याचा उपक्रम बंद झाला तरी शिवाजी महाराजांनी शाइस्तेखानावर अचानक हल्ला केला तसा फोन न करता तिने एकदोनदा माझ्या घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला पण मी घरात नसल्याने तिच्या तावडीतून बचावलो. त्यामुळे एकदोनदा तिने महाविद्यालयातच मला भेटण्याचा प्रयत्न केला. पण आवारात ती दिसताच मी कॅन्टीनमध्ये पळ काढत असे.

त्याच वेळी आमच्या महाविद्यालयात तात्पुरत्या व्याख्यात्यांच्या नेमणुका झाल्या आणि त्यात इलेक्ट्रॉनिक्स विभागात एकजात पोरींचाच भरणा झाला. माझ्याकडे ट्रेनिंग व प्लेसमेंट विभाग होता आणि मला सहाय्यक म्हणून त्यातील

सुजाताला नेमण्यात आले. नव्याने नियुक्त झालेल्या या मुली आमच्या महाविद्यालयाच्याच विद्यार्थिनी होत्या त्यामुळे सुजाताही माझी विद्यार्थिनी नसली तरी तिच्या विद्यार्थीदशेतल्या सवयीमुळे मला सरच म्हणे. त्यामुळे मोकळा वेळ असला तर कधी कधी गप्पा मारत बसे.

एकदा मी कॅन्टीनमधून परत येताना कार्यशाळेच्या आवारात गुंडाप्पाची आई मला दिसली. मी तिची नजर चुकवून दुसऱ्या प्रयोगशाळेत शिरलो ती नेमकी इलेक्ट्रॉनिक्सचीच निघाली आणि सुजाता विद्यार्थ्यांना प्रयोग समजावून खुर्चीवर बसली होती. ती मला पाहून उठून "अहो सर इकडे कसे काय तुम्ही? काही काम होतं का, मग मला बोलवायचं होतं मीच आले असते "म्हणत माझ्यासाठी खुर्ची आणायला तिन गड्याला सांगितलं.

तेवढ्यात गुंडाची आई गेल्याचे पाहून मी बाहेर पडलो व माझ्या केबिनमध्ये येऊन कामाला लागलो. गुंडाच्या आईवर लक्ष केंद्रित झाल्यामुळे सुजाताकडे माझे इतके दुर्लक्ष झाले की ती समोर आल्याचेही मी विसरून गेलो. पण सुजाताला ही गोष्ट चांगलीच लक्षात राहिली त्यामुळे नंतर काही कामासाठी माझ्याकडे आल्यावर तिने " अहो सर, काल तुम्ही आमच्या प्रयोगशाळेत आलात आणि मी बसा, म्हणेपर्यंत निघूनही गेलात. "

"अरेच्चा! असं झालं काय? तू समोर होतीस हे माझ्या ध्यानातच आलं नाही. " मी जरा ओशाळूनच म्हणालो.

" पण तुमचं लक्ष तरी कुठं होतं? तुम्ही आमच्या विभागात आलात एक मिनिट उभे राहिलात आणि लगेचच निघून गेलात? "

तिला काहीतरी थातुरमातुर सांगून कटवायचं माझ्या मनात असलं तरी ते जमले नसते त्यामुळे सरळ सगळा प्रकार सांगावा व तिलाच त्यावर काही उपाय करायला सांगावा असं माझ्या मनात आलं म्हणून मी गुंडाच्या आईची कहाणी तिला सांगितली.

"अहो सर, ती सगळ्याच सरांना भेटून असेच बोअर करत असते, त्यात इतके घाबरायचे काय कारण आहे? " ती मला धीर देत म्हणाली.

गुंडाच्या आईला मी घाबरतोच पण त्यापेक्षा तिच्यामुळे आमच्या घरात निर्माण होणाऱ्या संशयकल्लोळाला मी जास्त घाबरतो हे तिला मी कसे सांगणार म्हणून मी तिलाच म्हणालो,

"तुझ्याकडे काही उपाय आहे का याच्यावर? "

" तुमची इच्छा असली तर बघते प्रयत्न करून " मला धीर देत ती म्हणाली.

सुजाताने त्यानंतर काय कळ फिरवली कुणास ठाउक पण त्या दिवसानंतर गुंडाची आई माझ्याकडे महाविद्यालयात आणि घरीही

काही फिरकली नाही. त्यामुळे मी आपल्या घरातच दहशतीच्या वातावरणात बसण्याचे माझे नष्टचर्य संपले. कॉलेजात तर ती दिसली तरी मला टाळून दुसरीकडेच गेली. त्यामुळे सुजाता नंतर भेटल्यावर मी तिला विचारले,

"अगं तू अशी काय कळ फिरवलीस की गुंडाची आई परत माझ्याकडे फिरकलीच नाही आणि दिसली तरी मला टाळते. "पण सुजाताचा चेहरा एकदम गोंधळात पडल्यासारखा वाटला, "मी? मी काहीच नाही केल सर"

"मग काय झाले काही कळत नाही पण आज गुंडाप्पाची आई मला पाहून पालीला पाहून पळणाऱ्या विंचवासारखी पळाली एवढे मात्र खरे.

" पण सर तुम्हीच जरा तिला दमात घेतल असतं तरी काम झालं असतं. पण जाऊदे आता तुमच्या मागची कटकट मिटली ना. तेच महत्वाचं "

" हे मला करता आले असते हे खरं," मी विचार करत म्हणालो, " पण तुला सांगू का सुजाता, मला अशी भीती होती की ती विचित्र बाई माझ्यावरच काहीतरी उलट कुभांड आणायची, आणि कायदे सगळे असे विचित्र की तिकडे सरळ सरळ बलात्कार

करणारे मोकळे सुटतात आणि आमच्यासारख्याना मात्र पकडायला वेळ लागत नाही’ म्हणून मी गप्प बसलो "

" अहो सर, आजच दुसऱ्याच कामासाठी मी तुमच्या घरीही आले होते त्यावेळी काकूंनाच काहीतरी करा म्हणून सुचवले मी, पण काकूना काही माझे येणे आवडले नसावे. "

" का बरं असं का वाटतं तुला? ती कदाचित काहीतरी महत्त्वाच्या कामात असेल त्यामुळे तुझ्याशी फार बोलली नसेल"

" असेल असेल "

एका प्रश्नाची तड लागली म्हणून जरा आनंदात घरी आलो तर दारातच सुमतीने आकाश कोसळल्यासारखा चेहरा करत स्वागत केले. मी शांतपणे बूट काढीत घरात शिरलो,

"आज ती आली होती! " सुमतीने सुरवात केली.

"आता ती कशाला येईल तिचा बंदोबस्त केलाय मी " मी मोठ्या ऐटीत म्हणालो

" ती, तुमची नेहमीची नाही आणि तिचा बंदोबस्त तुम्ही नाही, मी केला आहे. "

" काय केलेस तरी काय असं, कौतुकच करायला पाहिजे तुझं माझी त्या हिडिंबेच्या तावडीतून मुक्तता केल्याबद्दल! "

" मनात असलं ना की सगळं जमतं, "सुमतीन आपला ठेवणीतील स्वर काढला.

" काल ती दारात दिसल्यावरच तिला असा सज्जड दम भरला की विचारू नका. मी म्हटल, सर तुझ्या गप्पांना भुलतील पण मी जर त्याना सांगितलं, तर मात्र तुझ्या पोराला नापास केल्याशिवाय रहाणार नाहीत आणि फक्त यावर्षीच नाही तर कायमची त्याला या कॉलेजातच ठेवायला लावीन, आता काय बिशाद आहे तिची तुमच्या पुढे येण्याची" त्याचा अनुभव मी घेतलाच होता.

"पण आज दुसरीच कुणीतरी सुजाता की फिजाता आली होती. "

"अग ती माझी असिस्टंट, काही तरी काम असेल म्हणून आली असेल. "

"असेल असेल आम्हाला काय कळणार त्यातलं "

"आता मात्र कमाल आहे तुझी, सुजाता तरी मला म्हणालीच काकूंना मी आलेलं आवडलं नसावं"

"शहाणी आहे "

" पण तू इतकं काय मनावर घेतेस? ती केवढी मी केवढा, ती आपल्या मुलीसारखी आणि तू असा विचार करतेस कमाल आहे"

"काही सांगू नका त्याच, विश्वामित्र केवढे आणि मेनका केवढी पण विश्वामित्र चळलेच ना? "

"पण माझ्यासारखा सभ्य ----" संतापाने माझ्या तोंडातून शब्द फुटेना

"खर आहे, तुम्ही सभ्य आहात यात काही वादच नाही आणि माझा त्यावर पूर्ण विश्वास आहे, विश्वामित्र काय सभ्य नव्हते? अगदी सर्व संग परित्याग करून तपालाच बसले होते ना? आणि मला सांगा बिल क्लिन्टन तर अमेरिकेसारख्या देशाचा प्रेसिडेंट तो काय सभ्य नव्हता? आणि त्याची बायको काय कमी सुंदर आहे.?"

" अग ते अमेरिकेतलं, तिथं असंच चालतं. "

"आणि आपल्याकडं काय चालतं? तो श्रीनिवास की कोण तो काही सभ्य नव्हता का? मला एकच माहीत आहे 'साप म्हणू नये धाकला आणि नवरा म्हणू नये आपला' "सुमतीने समारोप करत म्हटले. त्यावर गप्प रहाणे एवढे एकच उत्तर होते.

# २. मोलाचा सल्ला आणि सल्ल्याचे मोल

*(तिचा सल्ला नेहमीच मोलाचा असतो आणि*
*त्याचे मोलही तितकेच असते!*
*- एक अनुभवी नवरा (अर्थात मीच))*

परिस्थिती माणसाला किती बदलायला लावते पहा! जोपर्यंत दूरदर्शन आमच्या शहरात आले नव्हते तोपर्यंत त्यामुळे मुंबईतले लोक कसे माणुसघाणे झाले आहेत. दूरदर्शनवर काही कार्यक्रम चालू असताना कोणी भेटायला आले की त्यांचा चेहरा कसा वाकडा होतो. त्यांचे बाहेर जाण्याचे वेळापत्रक कसे दूरदर्शनच्या तालावर बेतलेले असते. अशा गोष्टी एकमेकाना सांगून "आपण नाही बुवा त्यातले" अशा आम्ही आपापल्या पाठी थोपटून घेत होतो पण तेच दूरदर्शनने आमच्या शहरात प्रवेश करताच आमच्यापैकी ज्यानी त्या लाटेत प्रवेश केला तेही मुंबईच्या लोकांच्याच पावलावर पाउल ठेऊन तसेच चालू लागले. सुरवातीला बराच काळ मी मात्र त्या लाटेत प्रवेश केला नव्हता. अर्थात त्याचे कारण मी दूरदर्शन संचच घेतला नव्हता हे होते.

अलीकडे मात्र आपणही एकादा संच घ्यावा असा विचार माझ्या मनात डोकावू लागला होता आणि तिथेच माझा आणि सुमतीचा वाद सुरू झाला होता. खरं म्हणजे तिचा स्वभाव हट्टी आहे असे मी म्हणणे योग्य ठरणार नाही(अर्थात असे उघड म्हणण्याची कोणत्या नवऱ्याची छाती असते?)पण एकादी गोष्ट तिने डोक्यात घेतली की ती माझ्या मताचा विचारही करत नाही ही माझी मोठी अडचण असते.

ज्यावेळी आम्ही दूरदर्शन संच घेण्याची शक्यता नव्हती तोपर्यंत रंगीत संचच घेणे बरे असे आम्हा दोघांचेही मत होते म्हणजे तसे तिचे एकटीचेच असले तरी त्याला मी विरोध दर्शवत नव्हतो त्यामुळे माझेही मत तसेच आहे असे ती समजत होती. पण आता प्रत्यक्ष घ्यायची वेळ आल्यावर मात्र सध्या साधा कृष्णधवल संच घ्यावा आणि पुढे जरा किमती कमी झाल्या की रंगीत घेता येईल असे अर्थशास्त्रावर आधारित मत मी व्यक्त करू लागलो. याउलट तिच्या मते मी इतके दिवस तिला उगीचच आशेवर झुलवत ठेवले आणि याचाच तिला जास्त राग आला होता. त्यामुळे आता घ्यायचाच झाला तर रंगीतच घ्यायचा नाहीतर नकोच असा वटहुकूम निघाला होता.. थोडक्यात म्हणजे आता हा प्रश्न जरा प्रतिष्ठेचा (अर्थात तिच्या)झाला होता. तिच्या बहुतेक मैत्रिणींकडे रंगीत संच होते हे त्यामागचे खरे कारण होते. माझ्या मते इतके

दिवस आपण कृष्णधवल चित्रपटही अगदी चित्रपटगृहात जाऊन पाहिले मग त्यामुळे त्यांचा आस्वाद घेण्यात कधीकाही उणीव भासली नाही ते चित्रपट रंगीत दूरदर्शनवरही रंगीत थोडेच दिसणार आहेत? शिवाय त्यावेळी आजच्यासारख्या शेकडो वाहिन्याही नव्हत्या एकच एक दूरदर्शन त्यामुळे दिवसातून तास दोन तासच मिळणाऱ्या करमणुकीसाठी जादा पैसे खर्च करणे मला पटत नव्हते. हा बऱ्याच मोठ्या रकमेचा प्रश्न असल्याने ती नेहमीप्रमाणे मला न विचारता आपली पैशाची थैली घेऊन दूरदर्शन संच खरेदी करून आणू शकत नव्हती नाहीतर मला विचारण्याच्याही फंदात ती पडली नसती.

त्यामुळे तो प्रश्न तसाच अधांतरी राहिला होता आणि आमचे संबंध जरा ताणल्यासारखे झाले होते कारण आता माघार कोणी घ्यायची?

अशात आमच्या महाविद्यालयाचे स्नेहसम्मेलन उपटले त्यावेळी आमच्या कॉलेजच्या स्नेहसंमेलनात माझी भूमिका कार्यक्रमाचा मार्गदर्शक प्राध्यापक म्हणून पडद्यामागेच असायची. पण एक दिवस आमचे एक प्रयोगशाळा सहाय्यक विचारे अचानक माझ्याकडे आले आणि त्यांच्या नेहमीच्या खास अदबीच्या सुरात विचारते झाले. "सर, आपल्याकडे एक काम होते." त्यांच विचारणं

इतक्या हळुवार स्वरात असत की बहुधा वामनान बळीला तीन पावले जमीनच काय ती या सुरात मागितली असेल "बोला" त्यांना तेवढ्याच हळुवारपणे नाही तरी शक्यतो तसा प्रयत्न करीत मी म्हणालो. आणि त्यानी विचारलेला प्रश्न ऐकून मी तीन ताड उडालोच कारण त्यानी विचारल,

"सर आपल्या स्नेहसंमेलनाच्या नाटकात तुम्ही भाग घेऊ शकाल का? "

मी नाटकात काम करावे अशी कल्पना कोणी करू शकेल यावर मी कधीच विश्वास ठेवला नसता, म्हणजे तसा माझा चेहरा इतका टाकाऊ नाही आणि दररोज वर्गात तासभर मी मुलांचे मनोरंजन करत असल्यामुळे रंगमंचावर उभा रहायला मी घाबरणार होतो अशातला भाग नव्हता. पण वर्गात ठराविक विषयावर बोलणे वेगळे आणि नाटकात भाग घेणे वेगळे. रंगमंचावर चढण्याचा माझा लहानपणीचा पूर्वानुभवही बव्हंश एरंडोऽपि द्रुमायते या प्रकारातील होता. म्हणजे केवळ वर्गातील हुशार मुलगा म्हणून मला शाळेतील नाट्यप्रवेशात भाग घ्यावा लागे. त्यात माझ्या नाट्यगुणांपेक्षा पाठ्यगुणांचाच अधिक वाटा होता म्हणजे हा कमीतकमी नक्कल तरी चोख पाठ करील अशी खात्री गुरुजींना असल्याचा. त्यामुळे

विचाऱ्यानी असा अविचार का केला असावा याचा मला विचारच पडला.

विचाऱ्यांनी अविचार केला असला तरी अशी पार्श्वभूमी असणाऱ्या मला त्यांच्या विचारणेला अनुकूल प्रतिसाद देण्याचे खरे तर काहीच कारण नव्हते. पण पण माझा एक दुर्गुण (वा इतरांच्या दृष्टीने गुण म्हणा हवा तर) असा की मला कुणालाही नकार देण्याचे फार जिवावर येते, (त्याचमुळे मी सांगून आलेल्या पहिल्याच मुलीशी लग्न केले आणि तिचा घात केला नाहीतर कित्येक चांगल्या चांगल्या स्थळांकडून तिला होकार येत होते ही गोष्ट सुमतीन त्यानंतर कितीवेळा मला बजावून सांगितली याची मोजदाद ठेवणे मला तरी शक्य झालेले नाही अर्थात ही गोष्ट नंतरची). अगदी कोणी पैसे मागायला आला तरी माझा हात चटकन खिशात जातो (आणि त्यात काही नसल्याने तसाच बाहेर येतो ती गोष्ट वेगळी) त्यामुळे विचाऱ्यांना नकार देऊन नाराज करायचे माझ्या जिवावर आले. आणि मी होकार देऊन बसलो.

"मग सर आणखी एक रिक्वेस्ट आहे "तेवढ्याच मृदु स्वरात विचारे. आता हे मलाच नाटकही लिहायला सांगतात की काय अशी भीती मला पडली कारण मागे एकदा स्त्रीपात्रविरहित नाटक न सापडल्याने मी ते लिहिण्याचा प्रयत्नही केला होता. पण

विचाऱ्यांचा प्रश्न वेगळाच निघाला, "सर तुमच्या शेजारी रहाणाऱ्या जोशी मॅडम नाटकात काम करतात असे ऐकले आहे त्यांना आपल्या नाटकात काम करण्याविषयी तुम्ही विचाराल का? " अच्छा तर मला प्रथम नाटकात भाग घेण्याची संधी देण्यामागे विचाऱ्यांचा हा कावा होता तर!

त्यावेळीपर्यंत अभियांत्रिकी कॉलेजमध्ये विद्यार्थिनी अगदी तुरळक म्हणजे सगळ्या कोलेजात एक अथवा दोनच प्रवेश घेत असल्यामुळे त्यांना रंगमंचावर येण्याचे मुळीच धैर्य नसे किंवा ज्यांच्यात असे धैर्य असे त्यांना रंगभूमीवर आणण्याचे धाडस आम्ही करू शकत नसू. त्यामुळे नाटक करायचेच झाले तर स्त्रीपात्रविरहित करावे लागे किंवा स्त्रीपात्रांसाठी शोधाशोधच करावी लागे. माझ्या मध्यस्थीने जोशी मॅडमनी काम करायला होकार द्यावा म्हणून मला प्रथम विचारण्याचे चातुर्य विचाऱ्यांनी दाखवले होते त्यामुळे जोशीमॅडमनी होकार दिला तर मी नाटकात काम केले नाही तर चालणार होते. ही गोष्ट लक्षात न येण्याइतका मी दुधखुळा नव्हतो, त्यामुळे मी विचाऱ्यांना म्हणालो,

"अच्छा, जोशीवहिनीनी काम करायला होकार दिला तर मग मी काम करायला हवेच असे काही नाही असेच ना? "

"काय हे सर माझी अगदी लाजच काढताय आम्हाला तुम्ही तर हवेच आहात"विचारे जरा लज्जित झाल्यासारखे दाखवत म्हणाले. "ठीक आहे बघतो जमतेय का. " असा मी त्यांचा निरोप घेतला.

मी घरात शिरताच सुमतीने मला लगेचच विचारले, "काय हो काय म्हणत होते विचारे? "मी घरी जाण्यापूर्वीच माझ्या अंगावर पडलेल्या या कामगिरीचा सुगावा तिला कसा लागला कुणास माहीत. ती जर शिवकाळात जन्मास आली असती तर बहिर्जीचीही तिने छुट्टी केली असती याची मला खात्री आहे. तिचे गुप्तहेरखाते अगाथा ख्रिस्तीच्या मिस मार्पलपेक्षाही अधिक विस्तृत असावे. "आता तुला विचाऱ्यांनी माझी गाठ घेतल्याचे कळलेच असेल तर त्यानी काय विचारले हे तुझ्यापासून थोडेच लपून राहिले असणार? "तिचा डाव तिच्यावरच उलटवण्याचा प्रयत्न करत मी म्हणालो.

"हे बघा तुम्हाला सांगून ठेवते उगीच नसत्या फंदात पडून त्या भटकभवानीच्या नादी लागू नका"

"ही भटकभवानी कोण आणि मी कोणाच्या नादी लागणार (तू समोर असताना)? " कंसातील भाग मनातल्या मनात बोलत मी म्हणालो

आणि जोशी वहिनी या तिच्या लेखी भटकभवानी आहेत अशी माझ्या ज्ञानात भर टाकण्यात आली.

"हे बघ तसले काही मी करणार नाही मला फक्त त्यांना आमच्या कॉलेजच्या नाटकात काम कराल का हे विचारायच आहे बस्स! "

"मग मला हे सांगा की विचाऱ्यांना काय झाले होते स्वत: विचारायला, का ते घाबरतात त्या पोळाला? " आता हा पोळ कोण हे मला समजेना. "अग हा पोळ कोण आणि ---"

"मिस्टर जोशी, इतकेही माहीत नाही का?" माझ्या सामान्यज्ञानाची कींव करत सुमती.

"हे बघ आता मला ही कामगिरी पार पाडणे भागच आहे कारण मी विचाऱ्यांना तसा शब्द दिला आहे. "

"हो हो तुमचा शब्द कसा खोटा ठरेल, तुम्ही म्हणजे अगदी हरिश्चंद्राचे अवतारच! मात्र एकदा रंगीत--"

"पुरे पुरे तो विषय आता येथे नको "तिला मध्येच थांबवत मी म्हणालो.

"ठीक आहे जाताना अंगावर चिलखत वगैरे घालून जा, म्हणजे बरे"

सुमतीने मला असे घाबरवण्याचे काय कारण होते हे जोशींच्या घरात शिरेपर्यंत मला कळले नाही. जोशी कुटुंब आमच्या शेजारी दोन घरे सोडून रहात होते आणि कधीतरी श्री. जोशी आणि मी कामासाठी बाहेर पडल्यावर एकमेकास पाहून ओळखत होतो तीच गोष्ट जोशी वहिनींची! एवढ्या थोड्या ओळखीवर मी ही कामगिरी कशी काय स्वीकारली याचे आता मलाही आश्चर्य वाटू लागले होते पण एकदा काम हाती घेतल्यावर माघार घ्यायची नाही हा माझा बाणा नडला आणि मी धाडस करून जोशींच्या घरात शिरलोच.

मी घरात शिरताच श्रीयुत जोशींनीच "या" असे म्हणून माझे स्वागत केले. त्यांचा चेहरा नेहमीपेक्षा उग्र वाटला कदाचित तो नेहमी उग्र असेल पण त्याचे कारण ते कामावरून नुकतेच घरी आले असावेत आणि तेही ऑफिसात त्यांच्या वरिष्ठांच्या शिव्या खावून असा मी समज करून घेतला किंवा सुमतीने मला अगोदर घाबरवून सोडण्याचा जो प्रयत्न केला होता त्याचाही मानसिक परिणाम असावा.

एवढ्यात जोशीवहिनी बाहेर डोकावल्या आणि "अगबाई सुधीर भावजी तुम्ही? " असे त्यांच्या नाटकात काम करून कमावलेल्या लाडिक स्वरात त्या उद्गारल्यावर माझा ताण बराच

हलका झाल्यासारखे मला वाटले पण लगेचच श्रीयुत जोशींनी त्यावर बोळा फिरवला आणि आपल्या उग्र चर्येपेक्षा उग्र सुरात "तुम्ही आत जा" असा हुकूम त्यांनी बायकोला सोडला आणि त्याही निमुटपणे आत गेल्या. यापुढील कामगिरी म्हणजे संताजी धनाजीनी मोगलांच्या तंबूचे कळस कापून न्यावे तितकीच वाचायला रोमहर्षक पण करायला अवघड होती आणि माझी अवस्था मात्र उत्तरगोग्रहण मधील उत्तर किंवा मानापमानातील लक्ष्मीधर यांच्या पंक्तीत बसण्याच्या लायकीची होती.

मी उसने अवसान आणून काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी जोशींनीच, "कसे काय बरे आहात ना? " असा प्रश्न विचारून वातावरण मोकळे करण्याचा प्रयत्न केला अर्थात त्या प्रश्न विचारण्यामागे माझ्या तब्येतीपेक्षा त्यांच्या घरात प्रवेश करण्यामागे माझे डोके ठिकाणावर आहे ना याचाच शोध घेण्याचा तो प्रयत्न असावा असे मला वाटले कारण ते पुढे म्हणाले, "काही नाही आज अचानक आमच्या घरी आलात म्हणून विचारले "अर्थात त्या काळी फोन वगैरे करून पूर्वपरवानगी घेऊन कोणाच्या घरी जाण्याचा प्रघात नव्हता,

आता ताकाला जाऊन भांडे लपवण्यात अर्थ नव्हता म्हणून लगेच मी सरळ सरळ मुद्द्याला हात घातला,

"बरका जोशी साहेब, एक काम आहे तुमच्याकडे"

"माझ्याचकडे ना? "आपल्या स्वरात उगीचच मार्दवबिर्दव न आणता जोशी.

"हो म्हणजे तसे तुमच्याकडेच कारण तुमची हरकत नसेल तर वहिनींना एक विनंती करायची होती. "

"कसली? "जोशींनी हे शब्द अशा आवेशात उच्चारले की आता काहीही न बोलता पळ काढणेच बरे असे मला वाटू लागले पण शिक्षणप्रसारक मंडळाचे(मी स. प. चा विद्यार्थी ना!) "हाती घ्याल ते तडीस न्या" हे ब्रीद पुरेपूर माझ्या अंगी बाणलेले असल्यामुळे तशाही स्थितीत मी धीर धरून विचारलेच.

“काहीनाही फक्त आमच्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात आम्ही एक नाटक करायचे म्हणतोय त्यात काम करणे वहिनींना जमेल का एवढेच विचारायचे होते. "

पण त्यानंतर दगडांचा वर्षाव झेलण्याची तयारी असताना गुलाबपाण्याचा शिडकावा अंगावर व्हावा अशी माझी परिस्थिती झाली कारण माझे वाक्य पुरे होताच, "हात्तीच्या एवढेच ना? ती जशी इतर नाटकात काम करते तशी तुमच्या नाटकातही करेल त्यात काय विशेष? "असे जोशींनी त्यांच्यापरीने हसतहसत म्हटल्यावर माझा जीव एकदम भांड्यात पडला. "थॅन्क्स

जोशीसाहेब, मग तसे मी निश्चित समजूना? " असे म्हणून मी खुंटा हलवून बळकट केला. "अगदी शंभर टक्के मग तर झाले ना" इति जोशी.

"अच्छा तर निघतो मी, " म्हणून मी निघू लागलो तर जोशींनी मला हाताला धरूनच बसवले आणि म्हणाले,

"अहो हे काय तसेच जाताय आज आमच्याकडे पहिल्यांदाच येताय आणि चहा सुद्धा न घेता कसे जाल"आणि सौ. जोशींना हाक मारत

"अग, काका निघालेत त्यांना चहा वगैरे काही देणार की नाही? " असे त्यानी म्हटल्यावर जोशी वहिनीही हसत हसत पुढे आल्या आणि म्हणाल्या,

"तर चहा करते ना" आणि मी चहा पिऊनच घरी आलो आणि सुमतीला अगदी जोरात हाक मारून म्हणालो "बघ उगीचच मला घाबरवून सोडलस, जोशीवहिनींचा होकारच काय पण चहादेखिल घेऊन आलो आहेस कुठ? " यावर आपल्या ठेवणीच्या सुरात तिने,

"असं का? बरेच झाले, पण पहा बाई, घी देखा पण बडगा नही देखा असं होऊ नये म्हणजे झालं"असं म्हटल्यावर मी गप्प थोडाच बसणार

. "हे बघ आता पुढे काय होणार ते विचारे पाहून घेतील""पण शेवटी ही जबाबदारी तुमचीच आहे, लक्षात ठेवा"असा तिने शेवट केलाच.

दुसऱ्या दिवशी विजयी मुद्रेने मी विचाऱ्यांना ही बातमी सांगितली आणि त्याचबरोबर मी नाटकात काम करणार नाही असेही सांगितले, मग मात्र विचाऱ्यांनी, "असे कसे सर, जोशीमॅडमनी होकार दिला नसता तरी तुम्हाला आम्ही सोडणारच नव्हतो, "असा आग्रहाचा सूर काढल्यावर मी "मग आता जोशीमॅडमनी माझ्या ऐवजी काम केले असे समजा"असा युक्तिवाद करून त्या संकटातून माझी सुटका करून घेतली. त्यामागे आता या झेंगटातून विचाऱ्यांनी मला मोकळे करावे हाही उद्देश होताच. म्हणजे पुढे यदाकदाचित काही भानगड उपस्थित झाली तर त्यात विचाऱ्यांनी मला अडकवू नये.

पण मी कितीही आत्मविश्वासाने एकादी गोष्ट केली तरी त्यात सुमतीने शंका घेतली तर तिची बत्तिशीच खरी ठरण्याची धाकधुक माझ्या मनात होतीच. नाटकाच्या तालमी सुरू होऊन आठ दिवस होतात न होतात तोच महाविद्यालयाच्या प्रांगणात विचारे समोरून येताना दिसले मला पाहून त्यांचा चेहरा उजळल्यासारखा दिसला.

"बर झालं सर तुम्हीच भेटलात ते, मी तुमच्याकडेच चाललो होतो" ते म्हणाले आणि आता हे काय सांगतात या कल्पनेने माझे काळीज धडधडू लागले. "जरा एक अडचण निर्माण झाली आहे सर, "

"हे बघा विचारे, नाटकाविषयी काही असेल तर मला काही विचारू नका, कारण मी त्यातून अंग पूर्णपणे काढून घेतले आहे. "मी त्यांना झटकण्याचा प्रयत्न करत म्हणालो.

"असं कस सर, काही झालं तरी स्नेहसम्मेलन आणि नाटक हे आपल्या सगळयांचच नाही का? "मला चुचकारत विचारे. पण मी आता या भानगडीत परत अडकायचे नाही असा निश्चयच केला होता आणि त्यामुळे "हे बघा विचारे, मला आता तासाला जायच आहे, तेव्हां नंतर बोलू या"म्हणून माझी सुटका करून घेतली. पण विचारे माझ्यापेक्षाही सवाई निघाले, कारण मी तास संपवून आलो तेव्हां प्राचार्यांचा शिपाई मुरलीधर माझी वाट पहातच उभा होता. . "सर आपल्याला साहेबांनी बोलावल आहे"असं नमस्कार करीत त्याने मला सांगितले.

प्राचार्यांना माझी का आठवण झाली याचा अंधुकसा अंदाज मला तासाला जाण्यापूर्वी विचाऱ्यांची गाठ पडली असल्यामुळे आलाच होता. मी त्यांच्या दालनात प्रवेश करताच"या या

सुधीरजी" म्हणून त्यानी माझे स्वागत केले. आमच्याच विभागात माझ्याच आद्याक्षराचे आणि आडनावाचे आणखी एक प्राध्यापक असल्याने ते आमचा उल्लेख असा नावाने करत. त्यानी त्यांच्यासमोरील खुर्चीवर बसायला सांगितले. मी प्रश्नार्थक मुद्रेने त्यांच्याकडे पहात राहिल्यावर फारशी प्रस्तावना न करता ते म्हणाले, "अहो आपल्या स्नेहसम्मेलनाच्या नाटकाची गाडी काही रुळाला लागत नाही. "

"पण सर, मी नाटकाशी संबधित नाही. ते खाते प्रा. सोमलवार संभाळतात. "

"हो बरोबर आहे पण संपूर्ण स्नेहसंमेलनाचे प्रभारी प्राध्यापक तुम्ही आहात त्यामुळे तुम्हाला असे म्हणून अंग झटकता येणार नाही. तुम्ही प्रा. सोमलवार आणि विचारे बसून काय अडचणी आहेत त्यावर विचार करून काय ती तोड काढा, काहीही झाले तरी नाटक उत्तम झाले पाहिजे. "

विचाऱ्यांच्या तावडीतून जशी सुटका करून घेऊ शकलो तसे येथे काही जमणार नव्हते त्यामुळे

"ठीक आहे सर बघतो मी " म्हणून मी बाहेर पडलो. बाहेर विचारे माझी वाटच पहात जणु थांबले होते.

"अहो, विचारे, नाटकाचे सोमलवार सर सोडून तुम्ही माझ्यामागे काय हे शुक्लकाष्ट लावून दिलय? "

"माफ करा सर अडचणच अशी आहे जी तुम्हीच फक्त सोडवू शकता. "

"बर बोला"

"असं करूया सर, कॅंटीनमध्ये जाऊन बसू या का? शांतपणे चहा पीत बोलू या. सोमलवार सरही येतीलच एवढ्यात.. "

"बर झालं सर, तुम्ही आलात, "मला पाहून सोमलवार सरांनी उद्गार काढला, "अहो ते जोशीं आपल्या नाटकाची अगदी वाट लावायला लागलेत. "

"का काय झालं? "मी विचारले

"चला, कॅंटीनमध्ये बसून तेथेच बोलू. "

"हं आता बोला"चहाचा पहिला घोट घेत मी विचारले.

"अहो सर, ते जोशी काय स्वत: नाटकात काम वगैरे करतात का? "

"काही कल्पना नाही बुवा. अगदी खरं सांगू का सोमलवार, विचाऱ्यांनी विनंती केली म्हणून मी या फंदात पडलो नाहीतर तुमच्या नाटकाच्या भानगडीत मी काही पडलो नसतो. आणि

आताही मला पुन्हा त्यात ओढू नका "मी अंग झटकण्याचा प्रयत्न केला.

"अहो सर असं कस म्हणताय? ते काय सांगतात ते ऐकून तरी घ्या" मला पुन्हा आखाड्यात खेचण्याचा प्रयत्न करीत विचारे.

"बर सांगा सर, काय अडचण जोशींनी उपस्थित केलीय? "

"अहो सर ते जोशी प्रत्येक दिवशी नाटकाच्या तालमीला अगदी अथपासून इतिपर्यंत बसतात. "

"बरोबरच आहे, आपल्या बायकोची त्यांनी काळजी घ्यायची नाही तर कोणी? "

"बरोबर आहे, त्याविषयी आमची काही तक्रार नाही. सर्वांच्याबरोबर ते चहाफराळही भरपेट करतात त्यालाही आमची काही ना नाही. "

"मग गाडे कुठे अडलेय? " मी आश्चर्याने विचारले.

"अहो ते मुलाना एक वाक्य नीट बोलू देत नाहीत, सारखे मधे मधे त्यांना अडवून हे वाक्य असे म्हणायला हवे आणि या ठिकाणी अशी हालचाल करायला हवी असे त्यांचेच दिग्दर्शन चालू असते."

"मग तर बरेच झालं, त्यांच्याकडेच दिग्दर्शनाचा भार सोपवा म्हणजे तुम्हीही मोकळे आणि मीही"

"अहो सर, मला तसे करायलाही वाईट वाटणार नाही, पण मग जोशी आणि आपल्या विद्यार्थ्यांची मारामारी होऊन कोणालातरी दवाखान्यात पोचवायला लागले तर नाटक उभे करायची जबाबदारी तुमची"

"ठीक आहे मग जोशींना का सांगत नाही, तुम्ही येऊ नका म्हणून. "

"अहो मी तसे सुचवून पाहिले, त्याना म्हटलेदेखील की तुम्ही उगीच येण्याचा त्रास घेऊ नका आम्ही सौ. जोशींना न्यायला आणि परत घरी सोडायला स्वत: येऊ म्हणून पण तो गृहस्थ ऐकायला तयारच नाही" सोमलवार हताशपणे म्हणाले.

"आता तुम्ही सांगून काही परिणाम होतो का पहायचे" विचाऱ्यांनी आपले विचारी मन खुले केले.

"म्हणजे पुन्हा तुम्ही माळ माझ्याच गळयात घालताय म्हणजे लग्न कर म्हटल तर तूच बायको हो असच झालं हे. इथ तर मी नाटक करायलाही सांगितले नाही "वैतागून मी म्हणालो.

"असं काय करता सर, आता तुम्हीच ही नाटकाची नाव पैलतिरी लावू शकता"काव्यात्मक भाषेचा आधार घेत विचारे. ते स्वत: नाटकात काम करत असल्याचा परिणाम असावा हा.

"बर ठीक आहे काय जमते ते बघतो" उठून आम्ही बाहेर पडलो.

मी घरी आलो तेव्हां माझा चेहरा बराच चिंताक्रांत दिसत असावा, कारण मला पाहून सुमतीने विचारलेच.

"काय हो असा का चेहरा पडलाय. तब्येत ठीक आहे ना? "

"काही नाही"तिला काय सांगायचे हा पेच मला पडला कारण या भानगडीत न पडण्याचा इशारा तिन मला दिला होता. तिने भाकित केल्याप्रमाणेच बडगा आता मला दिसू लागला होता.

"हे बघा, माझ्यापासून काही लपवू नका. तरी मी अगोदरच सांगत होते त्या जोशींच्या भानगडीत पडू नका"

आता तिन विषय काढलाच होता म्हणून मी तिला आमच्या नाटकात उद्भवलेला समरप्रसंग सांगितला. माझे सगळे ऐकून झाल्यावर जरा विचार करत ती म्हणाली, "समस्या अवघड आहे पण काहीतरी तोड काढता येईल असे वाटते"तिच्या मुद्रेवरील भाव मी ओळखले,

"तुझा रंगीत टी. व्ही. घ्यायचा विचार बरोबर होता असे आता मला वाटू लागले आहे. "

"मग तुमचा प्रश्न सुटलाच म्हणून समजा." सुमतीने मला आश्वासन दिले, "उद्यापासूनच जोशी तालमींना येणार नाहीत" तिने

इतक्या आत्मविश्वासाने सांगितले तरी मला काही खात्री वाटत नव्हती. पण आश्चर्य म्हणजे दुसऱ्या दिवशी मी महाविद्यालयातून परत येताना वाटेतच जोशी मला भेटले म्हणजे त्यांनी मला गाठलेच म्हणणे योग्य ठरेल. आणि कसानुसा चेहरा करत म्हणाले,

"आजपासून मिसेसला नाटकाच्या तालमीला घेऊन जाण्यासाठी काहीतरी व्यवस्था करू शकाल का? "

"का बरे तुम्हाला येणे जमणार नाही का? " मी

"हो मला येणे जमणार नाही तेव्हां तिला नेण्यासाठी आणि परत सोडण्यासाठी तुम्हाला काहीतरी व्यवस्था केली पाहिजे"

जोशींचे हे वाक्य ऐकून सुमतीचा आत्मविश्वास काही खोटा नव्हता याविषयी माझी खात्री झाली..

"काही काळजी नका करू. आमच्या ग्रंथपाल सौ. बिडकर त्यांना न्यायला येतील"मी त्यांना आश्वासन दिले.

मी घरात पोचताच सुमतीने लगेचच विचारलेच, "काय सुटला ना तुमचा प्रश्न? "मी आश्चर्याने अगदी थक्कच झालो होतो. म्हणजे तिनेच हा तिढा सोडवला होता एकूण. कौतुकाने तिला गदगदा हलवत मी म्हणालो,

"कमाल आहे तुझी, काय जादू केलीस जोशींच्यावर? "

"काही नाही मिसेस टेमकरांना सांगितले आणि काम फत्ते! "

"मिसेस टेमकरांचा काय संबंध यात? " मी आणखीच गोंधळात पडून विचारले.

"अहो एवढी साधी गोष्ट कशी कळत नाही, मिसेस टेमकर म्हणजे जोशींचे बॉस टेमकर त्यांची बायको. त्यानी सांगितल टेमकरांना जोशींचा बंदोबस्त करायला. "

"मग काय टेमकरांनी जोशींना सांगितले का नाटकाच्या तालमीला जाऊ नका म्हणून? "

" ते कशाला तस सांगताहेत? त्यांनी जोशींना उद्यापासून दररोज संध्याकाळी ऑफिसात ओव्हरटाइम करावा लागेल म्हणून सांगितलेय. आता जोशी कसे येतील नाटकाच्या तालमीला? "

विजयी मुद्रेन माझ्याकडे पहात सुमती उत्तरली. तेवढ्यात दाराची घंटी वाजली. दार उघडताच दारात एक मोठे खोके घेऊन एक माणूस उभा होता.

"कुळकर्ण्यांच घर हेच ना? वॉचलॅन्डकडून हे घेऊन आलोय."

हे म्हणजे काय असेल हे मी न सांगताच ओळखले.

"अरे वा आलाच वाटत, मिसेस टेमकरांचा फोन आल्यावर लगेचच मी वॉचलॅंडमध्ये जाऊन ओनिडा पाठवून द्या म्हणून सांगून आले होते, आपण तसेच ठरवले होते, की नाही? "

"माझ्या प्रश्नांकित मुद्रेकडे पहात सुमतीने खुलासा केला. तिच्या सल्ल्याचे मोल आता माझ्या ध्यानात आले होते.

# ३. अक्कलदाढ आली पण ---

सकाळी एकदम जाग आली आणि काहीतरी बिघडल्याची जाणीव झाली. तसंही सकाळी जाग येताना माझं काहीतरी बिघडलेलं असतंच. कधी डोके ठणकत असतं, तर कधी कानातून आवाज येत असतो, तर कधी नाक सुरसुरायला लागतं. काहीच नसलं, तर निदान माझा मूड तरी बिघडलेला असतो असं सौभाग्यवती सुमतीचे मत! "माझ्या मूडकडे इतकं कसं काय लक्ष देऊ लागलीस? " असं विचारायला गेलं तर तिचाच मूड बिघडायचा म्हणून, तसं विचारत नाही. त्यामुळे या नियमित बिघाडापेक्षा खरेच काही अधिक भयंकर होत असेल तरच तिकडे लक्ष द्यायचे, असं मी ठरवून टाकले आहे. त्यादिवशीची परिस्थिती गंभीर या सदरात मोडण्यासारखी असली, तरी नेमके कारण लक्षात येईना. पण दात घासण्यासाठी टूथपेस्टसह टूथब्रश तोंडात घातला मात्र, एकदम चारशे व्होल्टचा तीव्र झटका बसावा असे झाले. आणि मग लक्षात आले की दुखण्याचे उगमस्थान दातात आहे.

अशावेळी दंतवैद्याकडे जाणे योग्य असले, तरी तो आपले क्लिनिक उघडे ठेवून यावेळी माझी वाट पाहत बसला असण्याची

शक्यता नसल्यामुळे शेजारीच राहणाऱ्या डॉक्टर मित्राकडे जावे, असे ठरवून त्याच्याकडे धाव घेतली. त्याच्या घराची घंटी दाबली, पण दरवाजा न उघडल्यामुळे ती वाजली नसावी म्हणून पुन्हा जोरात दाबली आणि मला बाहेर स्पष्ट ऐकूही आली. पण माझ्या मित्राच्या घोरण्याच्या आवाजापुढे ती कदाचित नगाऱ्यापुढे टिमकीच ठरली असावी. "त्यामुळे आता काय करावे? " म्हणून गालावर हात (दात दुखत असल्यामुळे) दाबून उभा राहिलो. पण या संकटातून त्याच्याकडे येणाऱ्या दूधवाल्या भय्याने माझी सुटका केली. कारण, त्याला माझ्या मित्राची अथवा त्याच्या पत्नीची अथवा त्या दोघांच्या संयुक्त घोरण्याची पट्टी आणि त्यावर मात करण्यासाठी आपला आवाज किती चढवावा लागतो, याची परिपूर्ण कल्पना असल्यामुळे, त्या पट्टीत त्याने "दूऽऽध!!" अशी आरोळी ठोकताच काही क्षणातच दरवाजा थोडासा किलकिला झाला. आणि त्या फटीतून एक हात पातेल्यासह बाहेर आला. त्यावेळी प्रसंगावधान राखून भय्याने मला मागे खेचले नसते, तर शिवरायाच्या वाघनखाने अफझलखानाची जी अवस्था केली तीच माझी झाली असती आणि दुसऱ्याच हॉस्पिटलात मला दाखल करावे लागले असते. भय्याने मला त्या संकटातून वाचवले येवढेच नव्हे तर बाहेर आलेल्या हाताच्या मालकाला झोपेतून शुद्धीत आणून त्याच्या पुढ्यात ढकलण्याचे महत्कार्यही पार पाडले.

अशा अवेळी मला आपल्या दारात पाहूनही माझा मित्र मात्र अगदी शांत होता. रोग्याला कितीही भयंकर रोगाने पछाडले असले, तरी डॉक्टराने मात्र कसे शांत राहावे, याचा आदर्शच जणू तो मला दाखवत होता. आत शिरून कोचावर स्थानापन्न झालो आणि मित्रमहाशय आत अंतर्धान पावले ते एकदम हातात चहाचे दोन कप घेऊनच बाहेर आले. माझ्या पुढ्यात चहाचा कप ठेवत त्याने विचारले, " बोल! आता, इतक्या सक्काळी सक्काळी काय काम काढलंस? " मी सकाळपासून मला होणाऱ्या भयंकर त्रासाचे वर्णन करू लागलो तर मला सहानुभूती न दाखवता हा पठ्ठ्या चक्क हसू लागला अन् वर म्हणतोय कसा, " उगीच थापा मारू नकोस माझा नाही विश्वास बसत तू काय सांगतोस त्यावर. " अर्थात प्रसूतितज्ज्ञ असल्यामुळे त्याला याहून खरच अधिक वेदना होणाऱ्या रोग्यांना पाहण्याची सवय असण्याचा तो परिणाम! त्यामुळे मी त्याला माफ करून त्याच्या हास्याची उकळी थांबण्याची वाट पाहत बसलो. पण मग आपल्या पेशाला जागून त्याने मला 'आ' करायला सांगितल्यावर जो 'आ' मी केला त्याचा परिणाम होऊन त्याचा बहुतेक माझ्या सांगण्यावर विश्वास बसला असावा. कारण पुराणातील राक्षसाने अथवा मगरीने समोरील प्राण्यास गिळण्यासाठी 'आ' वासावा, तसा मी जबडोद्घाटन केले होते. डॉक्टर लोकाना तोंड उघडायला सांगितल्यावर असेच तोंड

उघडण्याची सवय मी लावून घेतली आहे. कारण आपला साधा 'आ' त्याना मुळीच पसंत पडत नाही. रुग्णाच्या तोंडात शिरून त्याला काय होतेय, याचा शोध त्यांना घ्यायचा असतो की काय न कळे. माझ्या मित्राने मला तोंड बंद करायला सांगितले. श्रीकृष्णाच्या तोंडात विश्वरूप दर्शन झाल्यावर यशोदामय्याने केला असेल तसा गंभीर चेहरा करीत, मान हालवीत ' ओ, टेरिबल ' म्हणून मला न कळणाऱ्या अगम्य इंग्रजीत तो काहीतरी बडबडला. दुखण्याचे निदान करताना हे लोक बहुधा इंग्लिशचा आधार घेतात, त्यामुळे त्याना काही कळले नाही हे रोग्याला कळत नाही अशी त्यांची समजूत असावी. अर्थात, मातृभाषेतही ते अशाच अगम्य शैलीत बडबड ते करू शकतात म्हणा. काही डॉक्टर पेशंटला काय होते, हे विचारण्याचे श्रम घेतात. तर काही मात्र ते काम पूर्णपणे आपलेच आहे असे समजतात. माझा हा मित्र त्या वर्गात मोडत असल्याने त्याने ताबडतोब निदान जाहीर केले, "तुझ्या टॉन्सिल्स खूपच वाढल्या आहेत. त्याचाच हा परिणाम. तेव्हा डॉ. देशपांडेकडे जा मी चिठ्ठी देतो तो लगेच ऑपरेशन करून तुला मोकळे करील. "

"पण मग माझ्या दातांच काय? त्यावर काही तडकाफडकी इलाज केला नाही, तर टॉन्सिल्स काढण्यासाठी तरी मी जिवंत

राहीन की नाही शंका आहे, " माझ्या आवाजाला उपरोधाची धार लावत मी उद्गारलो.

" अच्छा, तर मग तुला टॉन्सिल्स वाढून मरण्याची इच्छा आहे तर!" मित्राने आपणही उपरोधिक बोलू शकतो हे दाखवत म्हटले.

" नाही. त्यापूर्वी तुला मारून मग काय होईल ते पहावं असा विचार करतोय," माझ्या सहनशीलतेचा अंत झाल्यामुळे मी म्हणालो." शांत हो मित्रा असा धीर सोडू नको, दातांचंही काय करायचं ते आपण बघूया. आता परत एकदा तोंड उघड बरं," आपला शांतपणा न सोडता मित्र वदे. पुन्हा जबडोद्घाटन व विश्वरूपदर्शन झाले. मी तोंड मिटल्यावर, समाधानाने मान हालवीत मित्र म्हणाला, " गुड न्यूज." माझ्या तोंडात पाहून याला काय चांगली बातमी मिळाली? मला समजेना. हिंदी चित्रपटात वा कुठल्याही दूरदर्शन मालिकेतील 'आता बरी होती की नव्हती' असे म्हणावे अशी बहू अथवा बेटी एकदम चक्कर येऊन पडते, की तिचे आईवडील सासू सासरे इ. जे हजर असणारे लोक तिला धावत-पळत डॉक्टरकडे नेतात. काय भानगड झाली असावी? हे आपल्यासारख्या दररोज मालिका बघणाऱ्या अथवा कधीही न बघणाऱ्या चाणाक्ष दर्शकांच्या झटकन लक्षात येते. पण ही मंडळी मात्र आता डॉक्टर हा प्राणी काय बातमी आणतोय याची चिंतातुर

मुद्रेने वाट पाहत असतात. तेवढ्यात तो डॉक्टर एखादी सोन्याची खाण सापडल्यासारखा चेहरा करत तेथे येऊन एकदम "गुड न्यूज " असे गोड शब्द उच्चारतो आणि सर्वांना "ती" गोड बातमी देतो.

कधीकधी मुलीचे लग्न झालेले नसल्यास ही गुड न्यूज बरीच धक्कादायकही ठरू शकते ही गोष्ट वेगळी. पण माझ्या बाबतीत हा डॉक्टर मित्र काय "गुड न्यूज" देतोय याची मला उत्सुकता वाटू लागली. " अरे चांगली बातमी म्हणजे तुला अक्कल येऊ लागलीय, " मित्रवर्यांनी स्पष्टीकरण केले.

"म्हणजे आत्तापर्यंत नव्हती की काय? आणि हे तुला माझ्या तोंडात पाहून कसे कळले? " आता माझ्या मित्राच्याच अकलेविषयी मला शंका येऊ लागली. "अरे मूर्खा, याचा अर्थ तुला अक्कलदाढ येऊ घातलीय, सॉरी पण त्याचा तुझ्या अक्कल येण्याशी संबंध लावल्याबद्दल माफ कर, कारण त्यामुळे तुझ्या अकलेचा दुष्काळ मात्र थोडाही कमी झालेला दिसत नाही." माझ्या दुःखात भर टाकत तो म्हणाला.

"पण माझ्या या दुखण्याचे काय, त्यावर काही उपाय करणार आहेस का?" मी गालावर हात दाबत विव्हळलो. "ते मात्र इथं शक्य नाही " मित्र तेवढ्याच शांतपणे.

"मग तुझ्या नावापुढे लिहिलेल्या त्या लंब्याचवड्या पदवीच्या अक्षरांचा उपयोग काय?" रागारागाने मी तणतणलो.

"मी येथे काही करू शकत नाही, म्हणजे त्यासाठी आपल्याला माझ्या दवाखान्यात जावे लागेल. मग तेथे मी तुला जालिम विषदेखील देईन," मित्राने मुक्ताफळे उधळली. "पण त्यामुळे माझी दाढदुखी थांबणार का? " मी त्याचा उपरोध दुर्लक्षित केला. "अरे दाढदुखीच काय सगळयाच यातनांतून तुला मुक्ती मिळेल!" आता माझ्या मित्रात आसारामबापू अथवा अशाच बापूचा, वा बाबाचा संचार झाल्याचा भास मला झाला.

घराच्याच शेजारी असणाऱ्या आपल्या दवाखान्यात नेऊन, त्याने माझ्या दुखणाऱ्या दातावर कसल्याशा द्रवात कापूस बुडवून, बोळा माझ्या दाताच्या पोकळीत ठेवल्यावर हळूहळू माझा ठणका व संताप जरा कमी झाला." पण हा तात्पुरता इलाज आहे, जमेल तेवढ्या लवकर देशपांडेकडे जाऊन दात वाचतो का बघ, "मित्राने मला सल्ला दिला.

आता मी बराच ताळयावर आलो होतो. त्यामुळे मघाशी टॉन्सिल्स काढण्यासाठी त्याने देशपांडेची शिफारस केली होती, हे मी त्याच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर त्याने "तो देशपांडे वेगळा," असे सांगितल्यावर आपण दातांऐवजी टॉन्सिल्स

गमावणार नाही, अशी खात्री होऊन मी निर्धास्त झालो व इतकावेळ त्याला दिलेल्या बऱ्याच शिव्या व त्रास याची भरपाई करण्याच्या हेतूने म्हणालो, "अरे, तुझ्या वहिनीने जेवायला बोलावले आहे तुम्हा दोघाना, केव्हां येताय बोला."

"ते तुझ्या वहिनीला विचारून कळवतो," मित्राने माझ्याच भाषेत उत्तर दिले.

दुसऱ्याच दिवशी दातांच्या डॉ. देशपांडेंकडे जाणे, हे क्रमप्राप्तच होते. खरं तर सौ. सुमतीचा आधार बरोबर असावा, अशी इच्छा होती. पण असं म्हटल्यावर " आता काही कुक्कुलंबाळ राहिला नाहीत" अशा शब्दांत माझी बोळवण झाली. शिवाय लग्नापूर्वी ती नाकातलं हाडसुद्धा एकटी जावून काढून आली होती, अशी तिची कीर्ती तिच्या आईबाबांनी माझ्या कानावर घातली होती. अशा धाडसी स्त्रीचा नवरा शोभण्यासाठी, अगदी कारगिल युद्धात भाग घेतला नाही, तरी निदान स्वतःचा दात काढायला तरी एकट्यानं जावं, अशी तिनं अपेक्षा करणं तसं काही अयोग्य नव्हतं. तसा दात काढून घेण्याचा अनुभव माझ्या गाठीस नव्हता, असे नाही. यापूर्वीही दोन दातांचा बळी गेलेलाच होता. पण त्यावेळीही आमचा पिंटू (अर्थात, त्यावेळीच त्याला आम्ही 'पिंटू' म्हणत होतो. आता त्याला अनिरुद्ध असेच म्हणावे लागते.)

छोटा होता आणि खरे सांगायचे झाले, तर त्याचाच दात दुखतोय, म्हणून आम्ही दातांच्या डॉक्टरकडे गेलो होतो. आणि त्याचा दात डॉक्टरने हसतहसत (म्हणजे पिंटूसुद्धा हसत होता, डॉक्टर तर काय आम्ही दवाखान्यात पाय ठेवल्यापासून हसतच होता.) काढलेला पाहून मी पण धाडस करून माझाही दात काढून घेतला. म्हणजे अगदी एखाद्या लग्नात घरातल्या लहान मुलाची मुंज उरकून घेतात तशीच परिस्थिती. फक्त येथे मुलाच्या मुंजीत घरातल्या मोठ्या माणसाचे लग्न उरकून घ्याव असा प्रकार झाला एवढेच!

डॉ. देशपांडेच्या दवाखान्याच्या रस्त्यावर जवळजवळ एकूणएक इमारतीत दवाखाने होते आणि त्यापैकी एकूणएक दातांचे होते. डॉक्टरांची संख्या फारच वाढल्याचे यावरून सूचित होत होते. एवढे दवाखाने चालत असतील, तर त्यावरून एकूणच जनतेचे आरोग्य फारच बिघडले असावे किंवा मग लोक आपल्या आरोग्याविषयी खूपच जागरुक झाले असावेत, असे मला वाटून गेले. डॉ. देशपांडे यांच्या क्लिनिकचे नाव वाचून मात्र माझ्या छातीत धडकी भरली. कारण, नाव होते एकदंत क्लिनिक. आता हे विघ्नहर्त्या गजाननाचे नाव असलं तरीही पेशंटच्या दातांच्या भावी परिस्थितीचे अगदी अयोग्य दिग्दर्शन त्या नावातून सूचित होत होते. म्हणून अथर्वशीर्षाचाच जप करत मी वरच्या मजल्यावरील क्लिनिककडे जाणाऱ्या पायऱ्या चढू लागलो. इमारत दोन मजली

असल्याने त्याला लिफ्ट नव्हती आणि तो जिनाही इतका अरुंद होता, की त्यावरून घसरून पडून बऱ्याच लोकांचे दात दवाखान्यात प्रवेश करण्यापूर्वीच पडत असतील, अशी शंका मनात चमकून गेली. त्यामुळे हायवेवर ज्याप्रमाणे प्रवेश करतानाच टोल वसूल करण्याचा नाका असतो, तसे जिन्याच्या खालच्या पायरीवरच दात पाडण्याचे बिल वसूल करायला डॉक्टरनी एखादा असिस्टंट ठेवावा, अशी सूचनाही करण्याचा विचार मी केला. पण, पुढे मात्र मला तो विचार तहकूब करावा लागला. कारण मी वर पोचल्यावर 'डॉक्टर आज येणार नाहीत' अशी पाटी क्लिनिकच्या दारावर लावलेली पहायला मिळाली.

डॉ. देशपांडेच्या दवाखान्यातून मी थोड्याशा सुटकेच्या भावनेनेच बाहेर पडलो. कारण बायको भांडू लागली म्हणजेच जसा संन्यास घ्यावा वाटतो, तसा दात दुखू लागला म्हणजेच काढून टाकावा वाटतो. दात दुखणे बंद झाले की मग दाताचा विरह नको वाटेनासा होतो. पण मी जिन्यावरून खाली पाय ठेवताच माझा एक दुसरा मित्र समोर अचानक दत्त म्हणून उभा राहिला. आणि दुर्दैवाने याची बायकोच डेंटिस्ट होती. आमच्या सर्व मित्रमंडळीतील कोणाच्याही दाताकडे त्याचे बारीक लक्ष असे. त्यामुळे आम्ही दोस्त त्याच्यापुढे दाताचा विषय चुकूनही निघणार नाही याची दक्षता घ्यायचो. चुकून एखादा गालावर जास्त माया करतोय, असे

त्याच्या निदर्शनास आले की झालेच! नुसत्या संशयावरून गुन्हेगारास अटक करून गजाआड दाखल करणाऱ्या पोलिसापेक्षा जास्त चपळाईने, तो त्याला आपल्या बायकोच्या दातखान्यात दाखल करीत असे. मग आता तर मी अगदी रंगे हात पकडला गेलो होतो. त्यामुळे माझी सुटकाच नव्हती.

"काय डॉ. देशपांडॅकडं गेला होतास की काय? " आता तर त्याला माझा पुळका येणं स्वाभाविकच होतं. त्याला टाळणं मला आता शक्यच नव्हतं." अरे, मग घरच्या डॉक्टरला सोडून त्याच्याकडे कशाला गेला होतास? परवा विन्याचं रूट कॅनाल करता-करता त्याच्या चांगल्या दातांची त्यानं पार वाट लावली. माहीत आहे ना? " हा बहुतेक सगळया दंतवैद्यांच्या कुंडल्या घेऊन फिरत असावा. "बरं झालं सुटलास त्याच्या तडाख्यातून, चल आता माझ्याबरोबर. सीमा आता अगदी एक्स्पर्ट झालीय बघ. बघ आता तुला दात काढलेलं कळणार सुद्धा नाही. " चला, 'आलिया भोगासी असावे सादर' म्हणत, कसायाच्या बरोबर जाणाऱ्या बोकडासारखा, मी त्याच्या पाठोपाठ त्याच्या बायकोच्या दातखान्यात शिरलो.

सीमावहिनीनी फारच प्रेमळ विचारपूस केल्याने मला बराच धीर आला. आणि त्यांनी अगदी योग्य तोच दात काढायचा सल्ला

दिल्यावर आपली परिस्थिती अगदी चिमणराव आणि गुंड्याभाऊसारखी होणार नाही, याची खात्री पटली. खरं तर त्या दाताजवळचे दोन दात अगोदरच स्वर्गवासी झाले होते. त्यामुळे वहिनींनी भुलीचे इंजेक्शन दिल्यावर, कदाचित मी आपल्या हातानेसुद्धा उपटून माझा दात काढू शकलो असतो. पण, तज्ज्ञाला मान द्यायचा म्हणून, मी त्यांना ते काम करू दिले. या वहिनींच्या हातचलाखीमुळे माझा त्यांच्यावरचा विश्वास बराच वाढला. आपण उगीचच घाबरत होतो आणि इतक्या चांगल्या डॉक्टराविषयी उगीचच गैरसमज करून घेत होतो, असे मला वाटूही लागले.

"आता तुम्ही त्या चार दातांच्या जागी डेंचर का बसवत नाही? एवढ्या मोठ्या पोकळीमुळे तुम्हाला त्या बाजूने खायला अडचण होणार," वहिनींनी सल्ला दिला. अर्थात मीही नेहमीच्या पद्धतीने हा सल्ला शिरोधार्य मानला आणि त्यांच्या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी यायचे कबूल केले. खरं तर, एकदा मित्राच्या आग्रहाचा मान राखून मित्रकर्तव्य बजावल्यामुळे, दुसऱ्या दिवशीही जाण्याचे बंधन माझ्यावर नव्हते. पण शब्दाला जागण्याच्या माझ्या घातक सवयीला अनुसरून, मनात नसूनही, माझे पाय सीमावहिनींच्या दातखान्याकडे वळलेच. मित्राची पत्नी असल्यामुळे मला दवाखान्यात खास दर्जा असल्यामुळे, फारशी वाट न पाहता मला

लगेचच प्रवेश मिळत असे. मी आत जाताच त्या प्रशस्त खुर्चीत स्थानापन्न झालो. मग एका विशिष्ट प्रकारचे रोगण तयार करून, त्यावर दातांचे ठसे घेण्याचे काम मित्रपत्नीने केले आणि तीन चार दिवसात डेंचर तयार होईल, असे सांगितले आणि मला घरी जाण्याची परवानगी मिळाली. चौथ्या दिवशी मला दूरध्वनीवरून डेंचर तयार झाल्याची खबर मिळाली आणि मी तडकाफडकीने ते बसवूनही आलो आणि इतके दिवस 'घी देखा, लेकिन बडगा नही देखा' याचा अनुभव आला कारण डेंचर हा प्रकार केवळ शोभेचाच असतो हे प्रत्ययास आले. डेंचरमुळे टाळ्याचा बराच भाग झाकला गेल्याने चव घेऊन जेवणे वा खाणे शक्यच नसायचे. पण खरी डोकेदुखी आणखीच वेगळी. म्हणजे डेंचर जरा सैल असल्यामुळे, जेवताना घासाबरोबर डेंचरही गिळले जाऊन, कदाचित श्वास कोंडून आपला जीव जाण्याची धास्ती मला वाटू लागली. म्हणून मग जेवताना ते काढून ठेवणेच मी पसंत करू लागलो. माझे वडील आणि आई पण, खास जेवण्यासाठी कवळी तयार करून, शेवटी जेवतानाच का काढून ठेवायचे याची थोडीफार कल्पना मला येऊ लागली. शेवटी काही दिवसांनी शोभा म्हणूनही ते डेंचर वापरणे बंद करून टाकले.

पण माझा हा निर्णय पसंत न पडणारी बरीच माणसे जगात होती. उदा. सौ. सुमती! तिच्या मते अशी वस्तू वापरायची नसेल

तर आणायचीच कशाला! पण तिचा विरोध मुख्य ज्या कारणाने होता, ते म्हणजे मी डॉक्टरणीच्या डोंबलावर जे काहीशे रुपये खर्चून आलो होतो, त्याचा मोबदला मला मिळायलाच हवा. त्यामुळे ते डेंचर परत करून पैसे परत आणावे किंवा ते बदलून तरी आणावे असे तिला वाटत होते. आणि नेहमीप्रमाणे तिच्या इच्छेला बळी पडून मी पुन्हा त्या दातखान्यात पाऊल टाकले. मी वहिनींना माझी अडचण सांगताच त्यानी कुठलीच अडचण उपस्थित न करता ते डेंचर बदलून किंवा दुरुस्त करून देण्याची तयारी दाखवली. पुन्हा एकदा, माप घेण्यासाठी, त्यांनी त्या रोगणाचा लेप माझ्या हिरड्याना देऊन, दातांचा ठसा त्याखाली ठेवून जोरात दाबून, काही वेळ बसायला सांगितले. मी आज्ञाधारकपणे हाताची घडी तोंडावर बोट ठेवून बसलो आणि तोच माझा घातक्षण ठरला. कारण वहिनीना मला परत 'आ' करण्यास सांगायला थोडा उशीर झाला आणि तेवढ्यात त्या रोगणाने आपले काम अगदी नको तितके चांगले बजावले होते. माझ्या उघडलेल्या तोंडातून दातांचा ठसा काढण्यासाठी त्यानी जंग जंग पछाडले, पण तो ठसा "नाही मी सोडत नाथा " म्हणून जो काही माझ्या हिरड्यांना चिकटून बसला तो काही सुटायला तयार होईना. अनेक वेगवेगळे उपाय करून वहिनी थकल्या, त्याही घामाने चिंब झाल्या. मी म्हटले, "आता राहू दे हेच दात." पण त्यात धोका होता हे त्यांना माहीत

असल्यामुळे, शेवटी मला नको होती तीच वेळ माझ्यावर आली. म्हणजे वहिनींनी मला सांगितले आता कापूनच काढावे लागतील. झाले! मग इंजेक्शन देणे, बधीर करणे, पुरेशी भोके पाडणे अशा सर्व संकटातून पार पडलो, तेव्हा कोठे त्या दातांच्या तावडीतून माझी सुटका झाली.

दुसऱ्या दिवशी माझे सुजलेले तोंड पाहून मला डॉक्टर मित्राने विचारले, " अरे असा का दिसतोस? " मी काहीही न बोलता 'आ' करून दाखवल्यावर तो आश्चर्याने म्हणाला, " अरे हे काय इथे तर तुला दातच नव्हते. " त्याला मला सांगावे लागले, " हो बाबा, लोक असलेले दात काढतात मी मात्र नसलेले दातच काढून आलो आणि त्याचाच हा परिणाम! "

‘‘एकूण काय, अक्कलदाढ आली, तरी अक्कल मात्र आलेली दिसत नाही" मित्राने मारलेला टोला मी आ वासून ऐकत राहिलो. तेवढेच मला शक्य होते.

# ४. कहाणी माझ्या ध. रो. मु. ची!

पूर्वी रोगांच्या साथी यायच्या. (*आठवा १८९८ चा प्लेग*!) त्यात केवळ भारतीय जनताच नाही तर एका ब्रिटिश अधिकाऱ्यासही बळी पडावे लागले होते. (अर्थात ते प्लेगमुळे नाही) साथी आजही येत नाहीत असे नाही पण त्यावेळी त्यात मरणाऱ्यांची संख्या लक्षणीय असायची. कारण आजच्या इतके प्रभावी उपचार तेव्हां नव्हते आणि दक्षता घेणारी शासकीय यंत्रणा तर नव्हतीच. त्याबाबतीत आजच्या शासकीय यंत्रणेवर भाष्य करणे अवघड आहे., आणि करोनाच्या काळात तर पंतप्रधानांपासून रक्षक मालिकेतील शेवटची कडी म्हणजे वहातुक नियंत्रक पोलिसांपर्यंत प्रत्येकजणच इतका सतर्क झाला आहे की सध्या चालू असलेल्या महापुरासारख्या आपत्तीत वाहून जाणाऱ्या माणसानेदेखील मास्क परिधान केला की नाही याचा अगोदर शोध घेतला जातो व नंतरच त्याला वाचवण्याचा विचार केला जातो.

शिवाय अश्या सतर्कतेच्या वातावरणात टाळया, घंटा बडविणे अश्या साध्या उपायांपासून लसीकरणापर्यंतच्या सर्व अभियानात भाग घेऊन लोकही जागृत झाले आहेत. तरीही

अलीकडेही स्वाइन फ्लूसारख्या साथी येऊन त्यात मरणाऱ्यांचे आकडे त्या काळात प्रसिद्ध होत असतातच पण आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आकड्यापेक्षा ते कमी असल्यामुळे शिवाय त्यात दररोज अपघातामुळेही मरणाऱ्यांची भर पडत असल्यामुळे "रोज मरे त्याला कोण रडे" अशी परिस्थिती होऊन शासनाचा व मने बधीर झाल्यामुळे इतर लोकांचा त्याकडे फार गंभीरपणे पहाण्याची आवश्यकता नाही असा दृष्टिकोण झाल्यासारखे आहे. पूर्वी भयंकर वाटणाऱ्या उदा:देवी किंवा प्लेग अश्या रोगांचे आजकाल जवळ जवळ उच्चाटणच झाले आहे तर काही त्यावेळी भयंकर वाटणारे रोग चांगल्या उपचारांमुळे फारच सौम्य वाटू लागले आहेत उदा. मलेरिया, टी. बी. उलट कर्करोगासारखे काही भयंकर रोग अगदी साथ असल्यासारखे पसरत चालले आहेत. त्यात आता करोना या रोगाने भार घातली आहे आणि तीही अगदी जागतिक स्तरावर! पूर्वी रोगांची साथ असे, पण हल्ली रोगातून बचावलेल्या रोग्यांनी त्याविषयी लिहिण्याची साथ पसरत चालली आहे. मीही त्या साथीचाच एक बळी म्हणायला हरकत नाही. कारण माझ्या मोतिबिंदू, दाढदुखी अश्या क्षुल्लक रोगांच्याबाबतीत लिहून या माझ्या रोगाच्या संसर्गाला बळी पडलेल्या वाचकांच्या संख्येत भर टाकण्याचा मीही मनोगतवरच प्रयत्न केला आहे. पूर्वी साथीमध्ये रोगीच बळी पडत

असल्याने रोगवर्णन करण्याच्या साथीतून मात्र ते व त्यांचे न झालेले वाचक वाचत. (वाचाल तर वाचाल याच्या विरुद्ध परिस्थिती) अर्थात याला अपवाद म्हणजे हसरी किडनी, माझा साक्षात्कारी हृदयरोग, किंवा कॅन्सर माझा सांगाती अशी पुस्तके लिहून अनेक रोगग्रस्तांच्या हृदयात आशेचा नंदादीप उजळविणारे पद्मजा फाटक, डॉ. अभय बंग आणि डॉ. बावडेकर असे काही लेखक आहेत हे मात्र खरे. माझ्या बाबतीत मात्र रोग होणे आणि त्याचे निवारण होणे हे फारसे गंभीर वळण घेत नसले तरी किंवा त्याचमुळे हसत हसत त्याविषयी सांगितले की मला अधिक बरे वाटते कदाचित या निवेदनामुळे वाचकातील काहीजणांचा फायदा झालाच तर उत्तम हाही दृष्टिकोण त्यामागे असतो. काहीच नाही जमले तरी, "हात्तेच्या इतकेच तर झाले होते ना मग उगीचच त्याचा एवढा गाजावाजा कशाला " अशी काही वाचक मनातल्या मनात (कारण तसे मनोगत फारच सभ्य असल्यामुळे)माझी फिरकी घेतही असतील तरीही कोणत्या का निमित्ताने वाचकाच्या चेहऱ्यावरील एकादी स्मितरेषा उमटण्याइतपत परिणाम झाला तरी पुरे अशी माझी माफक अपेक्षा असते.

ध. रो. मु. शस्त्रक्रिया हे शीर्षक वाचून काहीच अर्थबोध न होण्याची शक्यता असली तरी माझी धमनी रोध मुक्ति शस्त्रक्रिया इतके मोठे शीर्षक लिहिले असते तर त्यानंतर पुढे वाचण्याचे धाडस

तरी वाचकापैकी काहीनी केले असते की नाही शंका आहे, शीर्षक वाचूनच हृदय क्रिया बंद पडल्यासारखे वाटणे असा परिणाम शीर्षकाच्या लांबीत व शब्दयोजनेत अभिप्रेत नाही मग वाचक बुचकळ्यात पडले तर हरकत नाही हा दृष्टिकोण! मात्र कदाचित त्या ऐवजी सरळसरळ ऍन्जिओप्लस्टी म्हटले असते तर मात्र एकदम हात्तेच्या एवढेच होय असे वाटले असते आणि श्वास मोकळा झाला असता ना? खरे तर धमनी (अव)रोध मुक्ती हा शब्द उच्चारायला लांबलचक असला तरी ऍन्जिओप्लास्टीपेक्षा कमी जोडाक्षरे असणारा व माझ्या मते सोपा आणि सरळ आहे. (जसे पु. ल. देशपांडे यांच्या मते शरद तळवलकर अगदी सरळ माणूस आहे). नुसताच सोपा नाही तर अर्थवाहीही आहे. उच्चारून पहा आणि ते त्या शत्रक्रियेचे वर्णनही आहे. या शब्दाची निर्मितीही मीच केली आहे (अशी माझी कल्पना आहे, नाहीतर असला फालतू उद्योग करायला वेळ कुणाला आहे?) पण एवढा सगळा उपद्व्याप कशासाठी? कारण उघडच आहे ही मुक्ती नुकतीच मला मिळाली म्हणून!

त्याचे काय झाले, वयाची पंचाहत्तरी उलटली तरी आपण व्यवस्थित वागून आपली प्रकृति अगदी औषध नलगे मजला असा सल्ला देण्याइतकी व्यवस्थित ठेवली आहे, अश्या भ्रमात मी वावरत होतो. तसे यापूर्वी काही अवयवांची कापाकापी करण्याचे

प्रसंग अगदीच आले नाहीत असे नाही. पण ते कोठे दाताचे मूळ कालवा (रूट कॅनाल), तर कधी डोळ्याचा मोतिबिंदु(कॅटरॅक्ट) अगदीच कमाल म्हणजे अंतर्गळ (हर्निया) येथपर्यंत माझी मजल गेली होती. आणि या सर्व शस्त्रक्रियांमध्ये माझ्या शरीराच्या कमीतकमी भागास दुखापत करण्यात आली होती. आणि अगदी स्थानीय बधीरीकरणच केल्यामुळे माझ्या शरीरावर काय उपचार वा अत्याचार होत आहेत हे मला समजत होते, तरी वेदना होत नसल्यामुळे दु:ख नव्हते.

पण सर्व काही ठीक चालले आहे असे वाटत असतानाच एके दिवशी सकाळी उठल्या उठल्या पाठीत दुखल्यासारखे वाटू लागले. पण मला वातविकार असल्यामुळे हा त्याचाच प्रकार असावा असे वाटून सकाळचे फिरणे पार पडले असूनही पुन्हा एकदा बाहेर चक्कर मारून आलो. त्याच अवस्थेत जेवण केले. बहीण आणि तिचे यजमान पाहुणे असल्यामुळे त्याना घेऊन संध्याकाळी नुकतेच जवळ रहायला आलेल्या मित्रांकडेही जाऊन आलो पण तरी चिन्हे काही बरी नाहीत असे मला जाणवत मात्र होते कारण यापूर्वी माझ्या आत्तेभावाचा मुलगा माझ्यापेक्षा तीन चार वर्षांनीच लहान पण असाच "पाठीत दुखतेय पाठीत दुखतेय" म्हणत "होईल बरं" करता करता एकदम चक्क गेलाच असं त्याच्या बायकोकडून कळालं होतं त्यामुळे माझ्या चेहऱ्यावरील भाव

वाचण्यात पटाईत बायकोला काहीतरी मोठा बिघाड झाला आहे असे वाटलेच. पूर्वी (कदाचित हल्लीदेखील) वैद्य नाडी पाहून रोगाचे निदान करत (नाडीपरीक्षा?)त्यानंतर फॅमिली डॉक्टर असत तेही नाडी आणि फार तर स्टेथो लावून व नंतर फारतर जीभ बाहेर काढून दाखवायला लावत आणि तेवढ्यावरून काहीतरी निदान करत हल्ली मात्र दुखणे समजून घेण्यासाठी अनेक तपासण्या करून आणण्यास सांगितले जाते व त्या सर्व पाहून रोगाचे अचूक निदान नाही तर केवळ अंदाजच केला जातो व तोही बरोबर असेलच अशातला भाग नाही. पण माझ्या बाबतीत मात्र माझ्या केवळ चेहऱ्याकडे पाहूनच बायकोला माझ्यात काहीतरी बिघाड झाल्याची वर्दी कशी मिळते कुणास ठाऊक! तर सांगायचे कारण म्हणजे माझ्या चेहऱ्याचा अंदाज घेऊन सौभाग्यवतीने ताबडतोब निर्णय घेतला आणि तिच्या परिचित डॉक्टर(णी)ला फोन लावला सुदैवाने तिचा नवराही डॉक्टरच होता आणि हृदयरोग शल्यविशारदच होता त्यामुळे तिने तडक तो ज्या हॉस्पिटलमध्ये काम करत होता तेथेच मला घेऊन येण्यास सांगितले. आमचे चिरंजीव त्यांच्या कामावर गेले होते त्याना फोन लावला व त्यांच्या येण्याची वाट न पहाता आम्ही बाहेर पडलो. आमच्या शेजारी याही सौच्या मैत्रीणच आणि सुदैवाने त्यांचे चिरंजीव घरात होते त्यामुळे आम्हाला पाहून व आम्ही कशासाठी बाहेर पडतोय हे ऐकून

ताबडतोब आपली गाडी काढायला चिरंजीवांना त्यानी फर्मावले. सूनबाई कोथरूडलाच रहात असल्यामुळे व आम्हाला सह्याद्री रुग्णालयात जायचे असल्यामुळे तिने पुढे जाऊन माझ्या रुग्णालय प्रवेशाची पूर्वतयारी करून ठेवल्यामुळे रुग्णालयात प्रवेश करताच मला एकदम टेबलावरच घेण्यात आले व योग्य त्या तपासण्या केल्यावर व हृदयभागाचे एक क्षकिरणचित्र (अन्जिओ(ग्राम की)ग्राफी)काढून त्याची पाहणी केल्यावर रक्ताच्या धमनीत अडथळा आल्याचे निदान झाल्यावर मला काही बोलण्याचीही तसदी (संधी म्हणत नाही)न देता अर्थात माझ्या बरोबरीच्या सौभाग्यवती आणि सूनबाई या दोघींना विचारून तो अडथळा दूर करणारी शस्त्रक्रिया पार पाडण्यात आली तीच ही जिला मी ध. रो. मु. हे नाव दिले. आणि हे सगळ लिहायला जितका वेळ लागला त्याहूनही कमीच वेळात पार पडले.

माझा मुलगा रुग्णालयात आला तोपर्यंत माझी शस्त्रक्रियोत्तर विभागात रवानगीही झाली होती. या शस्त्रक्रियेसाठी जांघेतूनच स्टेन्ट टाकावा लागल्यामुळे तेवढाच भाग बधिर करण्यात आल्यामुळे जे काय चालले होते ते मला समजतच होते. शिवाय या रुग्णालयातील शस्त्रक्रियोत्तर विभागात शांततेचा मुळीच पत्ता नव्हता. (इतरत्रही तसाच नसतो काय ही मला कल्पना नाही). माझ्या चार बाजूला पडदे लावून आडोसे करून माझा कक्ष निर्माण

केला होता असे अनेक कक्ष एका मोट्या हॉलमध्ये होते सर्व कक्षातील डॉक्टर व परिचारिका यांची धावपळ सापशिडीच्या खेळातील कोणत्याही घरातून कुठल्याही घरात दान पडेल तसे उड्या मारणाऱ्या गोट्यांसारखी आणि एकमेकांच्या कक्षातून चालू होती. आधीच झोप यायला झोपेची गोळी घ्याव्या लागणाऱ्या मला तश्या गोंधळ साम्राज्यात झोप येणे शक्य नव्हतेच शिवाय माझा स्टेन्ट (की बलून?) रात्री दोन किंवा तीन (अश्या मध्यरात्रीच्या मुहूर्तावर) काढायचा आहे अशी सूचना (की ताकीद?) मला अगोदरच देण्यात आलेली असल्यामुळे तर मी जणु त्यांचीच वाट पहात होतो.

रात्री दोन किंवा तीन वाजता खरोखरच ते डॉक्टर आले आणि त्यानी "आता मी अगदी जोरात दाबणार आहे (तेव्हां तशी मानसिक तयारी ठेवा आणि उगीच ओरडू नका) अशी ताकीद मला देऊन खरोखरच जेथून स्टेंट टाकला होता त्या भागावर अतिशय तीव्र दाब देऊन काहीतरी (बहुधा तो बलून असावा) बाहेर काढले व नंतर मला झोपा (अथवा झोपू नका कारण आजूबाजूचा गोंधळ कमी करणे त्यांच्या किंवा कुणाच्याच हातात नव्हते) म्हणून ते निघून गेले.

यापुढील माझा मुक्काम अतिदक्षता विभागात होता. शस्त्रक्रियेनंतर माझे तपमान, रक्तदाब, हृदय क्रिया वा आणखीही काही डॉक्टरमंडळींना आवश्यक वाटणाऱ्या गोष्टींची नोंद करणारी व आवश्यक इतरही उपकरणे माझ्या शरीराच्या निरनिराळ्या भागास जोडून मला स्थानबद्ध करण्यात आले होते. तेथील दोन दिवसांच्या मुक्कामानंतर माझे गाडे रुळावर आल्याचा निर्णय घेऊन तेथून साधारण रुग्णकक्षात नेण्याचा विचार जरी डॉक्टरांनी केला होता तरी तेथे सध्या रिकामी जागा नसल्यामुळे निम्न अतिदक्षता विभागात एक दिवस काढून माझी प्रकृती योग्य प्रमाणात सुधारत असल्याचे पाहून माझी घरी म्हणजे सौ. च्या अतिअतिदक्षता विभागात रवानगी झाली. रुग्णालयातील अतिदक्षता विभागात अनेक डॉक्टर थोडा थोडा वेळ येऊन जात पण इथे मात्र एकच महाडॉक्टर सतत माझ्यावर नजर ठेऊन असायची. माझ्या ध. रो. चे निदान तिला करता आले असते तर तिच्या त्या दृष्टीक्षेपानेही माझी ध. रो. मुक्ती झाली असती असो.

माझी धमनी रोध मुक्ती झाल्यावर काहीही करण्याच्या शारीरिक व मानसिक स्थितीत मी यायच्या पूर्वीच एका मित्राचा मला फोन आला. "काय कसा आहेस? तुझी ध. रो. मु. शस्त्रक्रिया झाली म्हणे अर्थात त्याने ऍन्जिओप्लास्टी हा सोपाच शब्द वापरला होता व मी काही उत्तर देण्यापूर्वीच "काही काळजी करू नकोस.

माझीही दहा वर्षापूर्वीच झाली आणि आता मी त्यावेळपेक्षा ठणठणित आहे"असा दिलासा दिला. मी काहीसा बरा झाल्यावर आपल्या मित्रांना आपल्या या नव्या साहसाची कल्पना द्यावी म्हणून प्रथम ज्या मित्राला फोन केला त्यानेही "अरे माझी पण पाच वर्षापूर्वीच झाली आणि आता मला काहीच त्रास नाही" असे मला उत्तेजन देणारे उद्गार काढले. एकूण ही शस्त्रक्रिया म्हणजे आयुष्यात (सुदैवाने जर जास्त जगला तर) एकदा तरी पार पाडावी लागणारी परीक्षा असावी असा माझा समज झाला. या प्रकाराच्या शस्त्रक्रियेची परिस्थिती पुन्हा पुन्हा उद्भवण्याची शक्यता नसेल असे वाटत असतानाच माझ्या नात्यातीलच गृहस्थांना दोन वर्षानंतर पुन्हा धरो (धमनी रोध) झाला आणि पुन्हा या शस्त्रक्रियेस तोंड द्यावे लागले अशी माहितीही मिळाली इतकेच काय पण त्याच काळात रूसी लाला या पत्रकारांनी लिहिलेल्या Celebration of cells" या पुस्तकाच्या वाचनाने जे. आर. डी. टाटा यांना तीन महिन्यात चार वेळा या मुक्तीला शरण जावे लागले असा उल्लेख वाचला. (अर्थात त्यावेळी जे. आर. डी. नव्वदीत होते.) याचे कारण म्हणजे बऱ्याच रक्तवाहिन्या असल्यामुळे अवरोध होण्यासाठी अनेक जागा असू शकतात पहिल्या शस्त्रक्रियेतही एकापेक्षा अधिक अवरोध आढळू शकतात. अशी माझ्या ज्ञानात भर पडली. डॉ. बंग यांचे पुस्तक पुन्हा वाचताना त्यांचीही ध. रो. मु. च करावी लागली

होती व त्यात बऱ्याच अडचणी (म्हणजे स्टॅन्ट टाकताना धमनीच फाटणे इ.) उपस्थित झाल्या होत्या असे त्यांनी लिहिलेले आढळून आले. म्हणजे कोणतीही शस्त्रक्रिया अगदी क्षुल्लक अथवा अतिशय कठीण या सदरात मोडू शकते असे अनुमान निघते. माझ्या बाबतीत परिस्थिती या दोन्हीच्या मध्यात असावी.

या शस्त्रक्रियेनंतर रक्त जलद साकळू नये म्हणून देण्यात येणाऱ्या गोळयांमुळे रक्त अधिक प्रवाही बनते त्यामुळे जर चुकून शरीरास जखम झाली तर रक्तप्रवाह थांबण्यासाठी ताबडतोब खबरदारी घ्यावी लागते. नाही तर ध. रो. ऐवजी रक्त अधिक वाह्यल्यामुळे मुक्ति मिळायची. असेही शल्यतज्ञांनी सांगितले होते त्यामुळे अगोदरच दाढी करताना मी निष्काळजीपणा दाखवणे अपेक्षित नव्हते पण त्याउपरही रक्तप्रवाह थांबण्यासाठी पण मी नेहमीच्या पद्धतीने ते थोडा वेळच दाबून नंतर त्यावर कागदाचा कपटा लावून भागेल अश्या समजुतीत असताना रक्तप्रवाह तसाच चालू आहे हे अगदी नको त्या व्यक्तीच्या नको तेव्हां निदर्शनास आलेच. तिच्या निदर्शनास आल्यावर मात्र तिच्या कडक शब्दात त्या सूचनेचा तिने असा काही पुनरुच्चार केला की ती समोर असेपर्यंत त्या जागेवर जोरात दाबून तर धरलेच आणि बराच वेळ मी माझा हात त्या जागेवरून हलू दिला नाही. थोड्या वेळानंतर रक्त थांबले तरी मी हात काढला नाही हे पाहून पुन्हा "अहो असा

जन्मभर धरून ठेवायचा नाही " असा इशाराही मला देण्यात आला. भाग्यच माझे की माझा हात झटक्यात ओढून तिने जागेवर आणण्याचा प्रयत्न केला नाही नाहीतर संधि रोपण शस्त्रक्रियेसही तोंड द्यायची पाळी माझ्यावर आली असती.

अशा प्रसंगी भेटायला येणाऱ्यांचा उपद्रव होण्याची शक्यता टाळता येत नाही पण त्यावेळी फारसे न बोलण्याचा मी निश्चय केला. अर्थात भेटायला येणारे बहुधा त्यांचाच अनुभव सांगण्याच्या तयारीत आल्यामुळे मला ऐकण्याचेच काम करावे लागले ही एक त्यातल्यात्यात जमेची बाजू. असेच एक नातेवाईक बऱ्याच दिवसांनी भेटायला आले. त्यानीही अश्या स्वरुपाच्या दुखण्यास तॉंड दिले होते असे ऐकिवात होते त्यामुळे माझ्या इतर मित्रांप्रमाणे "काही काळजी नको माझीही झालीय आणि मी आता ठणठणीत आहे असा दिलासा त्यांच्याकडून मिळेल असे वाटत असताना त्याऐवजी त्यांनी माझी उलटतपासणीच सुरू केली म्हणजे त्यांनी मला एकदम विचारले, "काय हो ऑपरेशनपूर्वी त्यांनी तुम्हाला विचारले होते का? " या प्रश्नाचा रोख मला कळला नाही. त्यांनी म्हणजे मला रुग्णालयात घेऊन जाणाऱ्यांनी की डॉक्टरांनी असा पहिला प्रश्न मला पडला व ‘डॉक्टरांनी‘ असे त्यांना अभिप्रेत असल्याचे त्यानी "काय बावळट आहात हो " असा चेहरा करून मला सांगितल्यावर शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णालाच शस्त्रक्रिया कशी करू

असे शल्यतज्ञ विचारतात आणि नंतर त्याच्याच सल्ल्याने शस्त्रक्रिया पार पाडतात अशी प्रश्न कर्त्याची भूमिका आहे की काय असा माझा समज झाला. आणि त्यांच्यासारखे रुग्ण असतील तर ते खरोखर तसाच आग्रह धरतात हे पुढे त्यानी आपला अनुभव सांगून त्यांच्या प्रश्नामागचा उद्देश माझ्या निदर्शनास आणला तेव्हां माझ्या लक्षात आले..

त्यांच्या मते अश्या (च काय पण एकूण सगळयाच)शस्त्रक्रिया जरुरी नसताना पार पाडल्या जातात आणि रोग्याकडून पैसे उकळले जातात त्यामुळे त्यांना असाच प्रसंग जेव्हां त्यांच्यावर आला तेव्हां शस्त्रक्रिया करायची असे सांगण्यात आल्यावर त्यानी त्यास साफ नकार देऊन प्रथम माधवबाग योग शिबिरास भेट देऊन मगच ध. रो. मु. शस्त्रक्रिया करायची की नाही हे ठरवणार असे शल्यतज्ञास सांगितले होते आणि महत्वाची गोष्ट म्हणजे त्यानी त्या योगोपचारावर भर देऊन शस्त्रक्रिया टाळलीही असे त्यानी विजयी मुद्रेने सांगितले. मीही तसेच करायला, निदान प्रथम त्या योगोपचारकेंद्रास भेट देऊन मगच हा निर्णय घ्यायला हवा होता असे त्यांचे मत पडले. आता आमच्याकडे कोणतेच निर्णयस्वातंत्र्य मला नाही हे मी त्यांना कसे सांगणार? त्यामुळे याबाबतीत मला विचारण्यात आले होते काय हा त्यांचा प्रश्न मला लागू पडणाराच नव्हता. शिवाय माझा डॉक्टर या संस्थेवर अंधविश्वास नसला तरी

घरातच अनेक डॉक्टर्स असल्यांने त्यांचाही सल्ला घेऊनच पुढचा निर्णय घेण्याची माझी प्रथा आहे व माझ्या डॉ. बंधूचाच मी सल्ला प्रथम घेतो आणि हा शल्यतज्ञ त्याचा विद्यार्थीच असल्यामुळे तो उगीचच मला कापणार (दोन्ही अर्थाने)नाही असे मला वाटत असल्याचे त्यांच्या कानावर घातले. तरीही माधवबागेचा त्यांचा हट्ट त्यानी सोडला नाही. शेवटी पुन्हा तशी पाळी आली तर मात्र अगोदर माधवबागेतच जाईन असे आश्वासन त्यांना देऊन मी त्यांच्या तावडीतून माझी मुक्ति करून घेतली.

पण त्यानंतर जालावर ध. रो. मु. विषयी पहाण्याची दुर्बुद्धि मला झाली व खरोखरच बऱ्याच ठिकाणी या शस्त्रक्रियेची जरुरी नसते कारण आपल्या शरीरातच अशी एक यंत्रणा कार्यरत असते की एक रक्तवाहिनी रुद्ध झाली तरी त्याला समांतर इतर वाहिन्या निर्माण होतात असे मत व्यक्त केलेले आढळले. त्याच काळात Whatsapp वर आलेल्या एका संदेशात (आणि त्या काळात असे संदेश पहायला वेळच वेळ असल्यामुळे तो पाहीला ही) एका तज्ञ डॉक्टरने तर हदयावरील कोणतीच (म्हणजे ध. रो. मु. आणि बायपास सुद्धा) शस्त्रक्रिया आवश्यक नसते असे ठामपणे बजावून रोग्याला त्या शस्त्रक्रियेनंतर बरे वाटणे हा केवळ प्लासिबो परिणाम म्हणजे आता आपण दीड दोन लाख खर्च केलेत ना मग आता आपल्याला बरे वाटायला(च?) पाहिजे ही भावना आपल्याला बरे

वाटायला लावते असे ठाम प्रतिपादन केले होते. तो गुजराती शस्त्रवैद्य असूनही त्याने असे विधान केले हे मला पटले नाही कारण गुजराती भाईंना उलट पैसे जाण्याच्या कल्पनेनेच धमनी अवरोध होण्याची शक्यता आहे अशी माझी समजूत! माझ्या बाबतीत पैसे माझ्या किंवा मुलाच्या खिश्यातून न जाता त्याच्या आरोग्य विमा योजनेतून गेले असल्याने त्या शक्यतेवर विचार करण्याचे कारण नव्हते. तरीही आता उगीचच आंतर्जालावर जाऊन "मी नाही त्यातला" सिद्ध करण्याची आवश्यकता नाही असे मी मनाला बजावले हो नाहीतर उगीचच आणखी काहीतरी वाचायला मिळायचं.

---------. पण तरीही डॉ. अभय बंग स्वत: डॉक्टर असतानाही त्यानी शस्त्रक्रिया केली होती व ती ध. रो. मु. चीच होती ही माझ्यासाठी त्यातल्या त्यात समाधान देणारी गोष्ट होती.

# ५.. दोन तज्ञ एक अज्ञ आणि एक विशेषज्ञ

***(अवघड काम करण्यासाठी तज्ञाकडे जावे असे म्हणतात यात थोडा बदल केल्यास हेच वाक्य काम अवघड करण्यासाठी तज्ञाकडे जावे असेवाचता येईल. या प्रकारचा एक अनुभव केवळ गम्मत म्हणून वाचावा)***

जागतिकीकरणामुळे पैसा टाकला की चुटकीसरशी सर्व सुखे हात जोडून उभी असतात हे खरेच आहे पण माझ्यासारख्या टंचाईग्रस्त काळात आयुष्याचा बराच काळ घालवलेल्या माणसाला त्यामुळे जीवन फारच गुंतागुंतीचे झाल्यासारखे वाटते. त्याचमुळे फार पूर्वी बांधलेल्या घराला रंग द्यायचा प्रश्न उपस्थित झाल्यावर त्यासाठी जगातील रंगांच्या संख्येइतके पर्याय उपलब्ध असल्याने निवडीस म्हणजे माझ्या आणि माझ्या पत्नीच्या म्हणजे सुमतीच्या वादविवादास अमर्याद वाव होता. त्यातच भर म्हणून तिचा बंधु विद्याधर ऊर्फ बाबू आमच्याच शहरात रहात असल्यामुळे या विषयावर त्रिसदस्य समिती तयार होऊन चर्चा होणे

हे ओघाने आलेच. बाबू स्वत:स चित्रकार समजत असल्याने या समितीत तो तज्ञ सभासद म्हणूनच काम करणार हेही उघडच होते.

रंग देण्याचा प्रश्न उपस्थित होताच आपल्याला या संकटाला तोंड द्यावे लागणार याची पूर्वकल्पना त्यामुळे मला होतीच. आणि रंगाचा विषय निघताच सुमतीने आपल्या लाडक्या बंधुराजाना दूरध्वनी वरून आवाहन करताच द्रौपदीच्या मदतीला श्रीकृष्णाने धावत यावे तसाच बाबूही उड्या मारत येईल अशी माझी कल्पना होती. पण त्यादिवशी माझे ग्रह उच्चीचे असावेत, कारण तिच्या निमंत्रणावर आपला चेहरा दु:खी करत (अंदाज माझा)तो म्हणाला, " माफ कर सुमती, पण मला सिंगलिंग आर्ट गॅलरीत सुमाटो आकाबाकाचे ऍबस्ट्रॅक्ट आर्ट एक्झिबिशन पहायला जायचय " हे ऐकून जो कोणी आकाबाका होता तो नकानका म्हणाला तरी त्याच्या पाया पडावे असं मला वाटू लागल तरीही सुमतीला खट्टू झालेले पाहून तिला बरे वाटावे म्हणून तरी आपण बाबूला विनंती करावी नाहीतरी आता बाबू येणारच नाही तर आपणही बोलून तिला दिलासा द्यायला काय हरकत आहे या सुविचाराने प्रेरित होऊन मी म्हणालो, "काय हे बाबू आपल्या बहिणीपेक्षा तो सुमाटो की टमाटो त्याची चित्र पहाणे तुला महत्त्वाच वाटावे ना? "आणि मग मात्र आपल्याला अशी दुर्बुद्धी सुचल्याचा मला पश्चाताप झाला कारण माझे बोलणे ऐकताच बाबूचा चेहरा एकदम उजळला

(अर्थात हा माझा अंदाज आहे कारण बोलणे दूरध्वनीवर चालू होते) आणि तो म्हणाला, "आता अप्पासाहेब, तुम्ही असं म्हटल्यावर माझा नाइलाज झाला मी रविवारी सकाळीच येतोय"

अशा रीतीने चांगली बसलेली पाचर काढून आपली शेपटी अडकवून घेणाऱ्या माकडाची हुषारी दाखवून मी हळहळत बसलो. सुदैवाने आम्ही तिघेजणच असल्यामुळे तीनच रंगांपैकी कुठलातरी एक निवडावा लागेल अशी स्वत:ची गोड समजूत करण्याच्या प्रयत्नात मी असतानाच वादळासारखा रविवारी सकाळी बाबू घरात शिरला आणि म्हणाला "चला "

"कुठे" आश्चर्याने आ वासून मी म्हणालो. कारण रंगचर्चा सुरू होताच मी पिवळा किंवा हिरवा असं काहीतरी बोलू लागताच सुमती ईऽऽऽ पिवळा (अगर हिरवा? खरं म्हणजे मी कोणत्याही रंगाचे नाव काढले असते तरी तिची प्रतिक्रिया ही अशीच असणार होती) असं विंचू चावावा अशा सुरात ओरडणार. त्यावर हे आकाशातील बापा आता या पाप्याला तूच क्षमा कर असा जो भाव ख्रिस्ती धर्मोपदेशक आपल्या चेहऱ्यावर आणतात तोच आणून बाबू " अप्पासाहेब, तुम्हाला नाही कळायच त्यातल काही, आपण सरळ यलोइश सिल्वर्ड कलर भिंतीच्या वरच्या भागाला, सोक्टर्ड तेडार्ड खिडक्याना, लेथर्स फिटशॉ दाराना आणि फेंट

सेलॉसो भिंतींच्या खालच्या भागाला देऊ" असं मला अजिबात न समजणाऱ्या नावाचे रंग उधळणार (त्यावेळी सुमती आपल्या भावाच्या रंगज्ञानाने दिपून त्याला कुठे ठेऊ आणि नको अशा भाविक मुद्रेने त्याच्याकडे बघणार असा नेहमीच्या अनुभवावर आधारित तर्क मी केला होता पण तो खोटा ठरल्यामुळे फाउस्टला सैतानाऐवजी देवाचे दूत नरकाऐवजी स्वर्गात न्यावयास आल्यावर आश्चर्याचा जेवढा धक्का बसला नसेल तेवढा मला बसला

"कुठ म्हणजे कलर कॉर्नर मध्ये " अगदी सहजतेने बाबू म्हणाला.

'पण तरी निघण्यापूर्वी रंग कुठले द्यायचे हे ठरवलेले बरे नाही का " असं म्हणून पारडं माझ्या बाजूने वळवण्याचा दुबळा प्रयत्न मी केला अर्थात दुकानाबाहेर घेतलेल्या निर्णयामुळे खरेदी सुलभ होणार होती अशातला भाग नव्हताच. कारण यापूर्वीही एक साधी कॉटन साडी आणि त्यावर मॅचिंग टू बाय टू ब्लाउज पीस घ्यवयाचे ठरवून दुकानात शिरल्यावर सुमतीच देहभान हरपून जात असे आणि बाहेर पडताना फक्त एक मलई सिल्क, एक विपुल किंवा पराग किंवा अशाच नावाची साडी, एकादीच कांजीवरम, एकादी गार्डन सिल्क अशा थोड्याच साड्या केवळ दुकानदाराला बरे वाटावे म्हणून खरेदी करूनच ती बाहेर पडत असते शिवाय

साड्यामध्येच ब्लाउजपीसेस असल्यामुळे बरेच पैसे आपण वाचवल्याचे मला सुनावल्याशिवाय ती रहात नसे. हा माझा नेहमीचा अनुभव. तरीही संवयीप्रमाणे मी बोलून गेलो आणि त्यावर त्या दोघांची प्रतिक्रिया काय होते पहात राहिलो. "अप्पासाहेब, अहो रंग देणं म्हणजे एक शास्त्र आहे. " आपली प्रतिक्रिया नोंदवीत बाबू म्हणाला.

"त्यात कसलं आलं आहे शास्त्र? पाण्यात अगर तेलात रंग मिसळायचे आणि ते भिंतीवर चोपडायचे यात कसले शास्त्र? " मी जोरदार विरोध करण्याचा क्षीण प्रयत्न केला. यावर अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख म्हणणाऱ्या कवीच्याच थाटात बाबू माझ्याकडे कीव भरला दृष्टिक्षेप टाकत म्हणाला, "अप्पासाहेब, काय हे उद्या तुम्ही पेंटिंगबद्दलही असच म्हणाल. "यावर मी गप्प थोडाच बसतोय, , "नाहीतरी हल्ली पेंटिंग ही त्याहून सोपी गोष्ट झाली आहे" मी तावातावाने बोलू लागलो, "अंगाला रंग चोपडून कापड वा कागदावर गडबडा लोळले की झाले पेंटिंग मग बसा अर्थ लावत त्याचा. मागे एका प्रदर्शनात तर म्हणे कुत्र्याच्या शेपटीला रंग लावून त्या कुत्र्यालाच तिचे फटकारे कॅनव्हासवर मारायला लावून तयार झालेल्या ऑइलला म्हणे पहिले बक्षिस मिळाले"आणखीही मी बरेच बोलण्याच्या विचारात होतो पण आपल्या भावाचा असा मामा केलेला कोणत्या

बायकोला आवडणार त्यामुळे" अहो ते राहू द्या तुमचं सामान्यज्ञान किती आहे ते आहे माहीत आम्हाला. तो भिंतीला रंग देण्याविषयी काय म्हणतोय ते ऐका. "असा फटकारा मारत सुमतीने मला भानावर आणले.

सुमतीचा भरभक्कम पाठिंबा असल्याने बाबूने माझे म्हणणे मुळीच मनावर न घेता आपले रंगविश्लेषण तेवढ्याच उत्साहाने चालू ठेवले सुदैवाने हिमालय कलर कार्पोरेशन तेवढ्यात आल्यामुळे तो मारा टाळणे शक्य झाले.

हिमालय कलर कॉर्पोरेशन हे रंगाचे दुकान न वाटता एकाद्या बहुराष्ट्रीय कंपनीचे कार्यालय असावे असा भास होत होता. नाहीतर पूर्वी कसं दुकानात शिरण्यापूर्वीच रंगांच्या पेटाऱ्यांचं आणि त्यातून डोकावणाऱ्या रंगांचं दर्शन घडायच. दुकानात शिरेपर्यंत गिऱ्हाइकाच्या डोक्यात आपल्याला कोणता रंग हवा आहे याचा गजर होऊ लागे आणि दुकानात शिरल्याशिरल्या दुकानाच्या मालकाला हव्या त्या डब्याकडे बोट दाखवून, " मालक हा रंग पाहिजे आम्हाला" असा खुल्लमखुल्ला कारभार असे. इथे तर रंगाचा मागमूसही नव्हता तर अशा परिस्थितीत रंगचर्चा कशी होणार अशी चिंता मला वाटू लागली. आम्ही दुकानात शिरताच एका अत्याधुनिक पोषाक केलेल्या माणसाने 'गुड मॉर्निंग

साहेब"म्हणून दंतपंक्ती दाखवत आमचे स्वागत केले त्यामुळे मला धीर आला.

आमच्या मोहिमेच्या नेतृत्वाची धुरा बाबूने सांभाळली असल्याने भिंतीला लावायचे रंग दाखवण्याचा हुकूम हा आता त्याच्या शास्त्रीय परिभाषेत कसा फर्मावतोय हे पहाण्यास मी उत्सुक होतो. पण ' भिंतीचे रंग आहेत का हो? " असा लाडिक पण अगदीच अशास्त्रीय भाषेत विचारून सुमतीने माझ्या उत्सुकतेच्या त्या फुग्याला टाचणी लावली.

पण प्रश्न जरी अशास्त्रीय भाषेत विचारला गेला असला तरी उत्तर देणारा मात्र महान शास्त्री निघाला. "थांबा थांबा, अशी घाई करू नका बाईसाहेब, "टाय लावलेला माणूस मराठी आणि ते आमच्यापेक्षाही बरे बोलत होता हे पाहून मला आनंद आणि आश्चर्य वाटले. कारण हल्ली लंडनमध्ये मराठी ऐकायला मिळण्याइतकेच महाराष्ट्रात कॉस्मोपॉलिटन शहरातील अशा अद्यावत दुकानात मराठी ऐकायला मिळणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे मी माझे रोखठोक मत आपल्या शुद्ध मायबोलीत व्यक्त केले, " मी सांगतो, आमच्या घराच्या भिंतींना निळा रंग द्यायचा आहे. "

मी असे बोललो मात्र, एकदम व्याधाच्या बाणाने विद्ध झालेल्या हरिणीसारखा चेहरा करीत तो म्हणाला, " कोणताही निर्णय येवढ्या घाईघाईने घेणे योग्य नव्हे साहेब, आणि त्यात तर हा रंग देण्यासारखा महत्त्वाचा निर्णय!" रंग देण हा कावेरी पाणीवाटपाइतका किंवा त्याहूनही अधिक गहन प्रश्न असावा असे त्याच्या स्वरावरून मला वाटू लागले.

"कारण आपण दिलेल्या रंगावरून आपली आणि बाईसाहेबांची अभिरुची व्यक्त होणार. उद्या बाईसाहेबांच्या मैत्रिणी घरात येणार आणि भिंतीना निळा रंग दिलेला पाहून त्याना काय वाटेल?" शहाजीराजाना आदिलशहाने कैदेत टाकले हे मासाहेबाना कळले तर त्याना काय वाटेल हा प्रश्नही शिवाजी राजाना येवढा गंभीर वाटला नसेल

"त्यांच काही ऐकू नका हो तुम्हीच सांगा काय करायचे ते "सुमतीने चहातून माशी बाहेर काढावी यसे संभाषणातून मला बाहेर काढत म्हटले.

" इटस व्हेरी सिंपल' मृदु हास्याची कमाल करत टायवाला म्हणाला" त्या बाबतीत आमचे रंगतज्ञ तुम्हाला मार्गदर्शन करतील" आणि एका नोकराला त्याने हुकुम सोडला, "अरे. वाकणकराना पाठवून दे बरं"

वाकणकरांच्या कपड्यांचे रंग पाहून ते रंगांध असावेत असाच माझा ग्रह झाला पण तज्ञ आणि अज्ञ यातील फरक हाच असावा. त्यांची ओळख टायवाल्याने करून दिली, "मीट आवर कलर एक्स्पर्ट वाकणकर, नुकतेच ते कलर मॅचिंग या विषयाचा शास्त्रीय अभ्यास पूर्ण करून फ्रान्समधून परत आलेत." ते फ्रान्समध्येच का राहिले नाहीत असा प्रश्न क्षणभर माझ्या डोक्यात घोळू लागला.

" गुडमॉर्निंग मशेर, गुडमॉर्निंग मादाम---" हस्तांदोलनासाठी हात पुढे करत वाकणकर पुढे आले पण एकदम जीभ चावत म्हणाले, "अरे, सॉरी हं फ्रान्समध्ये राहिल्यामुळे हे मशेर, मादाम एवढे तोंडात बसले आहे की ---"

"की अगदी चर्चिलच्या तोंडात चिरूटच!" मी त्याला उत्तेजन देण्यासाठी आणि आपलं भाषाचातुर्य दाखवण्याच्या हेतूनं म्हटले. पण सुमती बरोबर असली की माझ्या वाक्चातुर्याचा विशेष प्रभाव पडत नाही तसेच आताही होऊन माझ्या चर्चिल चिरूट उपमेकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत वाकणकरनं "हं मग आपल्या रंगसमस्येवर बोलूया मादाम, "असे येथील महत्त्वाची व्यक्ती सुमतीच असणार हे ओळखून विचारले.

" हे पहा आमच्या पोर्च आणि दिवाणखान्यास रंग द्यायचा आहे "

" ओ के, पण त्यासाठी आपल्या बंगल्याचा प्लॅन, तो केव्हा बांधला, त्यात कोण कोण रहातात आणि काय करतात इ. माहिती असती तर बरे झाले असते तरीही लेट असं स्टार्ट फ्रॉम पोर्च "

" हे पहा वाकणकर माझ्या मते पोर्चला लाइट प्रशियन ब्ल्यू अन् ड्रॉइंगरूम अप्पर हाफला लेमन -----"बाबूने या विषयावरील तज्ञ म्हणून आपण येथे आलो आहोत या गोष्टीकडे वाकणकराचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला

" प्रशियन ब्ल्यू, लेमन काय कुठल्या जमान्यात वावरताय साहेब आपण" बाबूच्या तज्ञपणावरच हल्ला करत वाकणकर उद्गारला आणि त्याचे पारिपत्य परस्परच होत असल्याने मलाही जरा बरेच वाटले.

"आता आपण ट्वेंटिफर्स्ट सेंच्युरीत प्रवेश करतोय आणि आपण तर अठराव्या शतकातील राजामहाराजांच्या महालाला रंग देण्याच्या पद्धतीने विचार करताय. कलर टेक्निक या विषयावर इतक्या काही मॉडर्न कन्सेप्टस या फ्रान्सच्या टूरमध्ये शिकायला मिळाल्या की काही विचारूच नका शिवाय कलरचा

सायकॉलॉजिकल इफेक्ट, कलरमॅचिंग या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. तुम्ही आपले यलो ऑकर घ्या पोर्चसाठी. "

" यलो ऑकर पोर्चसाठी?" धैयधराने "धिक्कार मन साहिना" म्हणावे तशाच आवेशात बाबू उद्गारला. "यलो ऑकर डायनिंग रूमला सूट होतो कारण त्यामुळे पचनशक्ती वाढते हे परवाच्याच colour digest मधील चिर्केसोच Animal Digestion and colour या लेखातील मत वाचलं नाही वाटत तुम्ही " आपल्या अपमानाचा थोडाबहुत वचपा काढता आल्याचा झालेला आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. पण वाकणकरच्या पुढील वाक्यामुळे तो क्षणभंगूरच ठरला.

" वा साहेब Animal Digestion म्हणजे गाय बैल अशा प्राण्यांविषयी ते चिर्केसोन लिहिल आहे माणसांविषयी नव्हे, तेव्हा गोठ्याला यलो ऑकर दिला तर त्यांची पचनशक्ती वाढून ते भरपूर दूध देऊ लागतील"

" अस्स! मग पोर्चला यलो ऑकर दिल्यामुळे साहेबांची कार जास्त दूध द्यायला लागेल काय?" त्याला विनोदी टोमणा मारून खजिल करायच्या उद्देशाने बाबू बोलला. पण वाकणकर तेवढ्याने हार थोडाच मानणार होता, त्याने अधिकच उत्साहाने बोलायला सुरवात केली "आपल्याला राग येईल कदाचित साहेब, पण

चिकॅसोला रंगाच ज्ञान काडीमात्र नाही असं कालच्याच American color मध्ये जॉर्ज मसीडोचं आर्टिकल आलं आहे त्यात आले आहे अर्थात आपल्याला प्रशियन ब्ल्यूच हवा असेल तर मला काही म्हणायच नाही पण चिकॅसोच्या कलर नॉलेजवर फार भरवसा ठेऊ नका, तेव्हा आपलं काय म्हणणं आहे बाईसाहेब?" येथे सर्वात महत्त्वाची व्यक्ती कोण आहे हे वाकणकरनं बरोबर हेरलं होतं.

"पण वाकणकर आमच्या गाडीचा रंग लाईट ग्रीन आहे तेव्हा पोर्चचा रंग त्याला सूट होईल ना? " खरे तर आमच्याकडे त्यावेळी कसलीच गाडी नव्हती तरी सुमतीन हा प्रश्न कुठून काढला मला कळेना. म्हणून मी म्हणालो, "अग ही लाइट ग्रीन गाडी कुठून आणलीस? " झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवण्याची अक्कल मला जरा कमीच. पण सुमती अशी थोडीच गप्प बसते, तिन लगेच "अहो असं काय करताय आपल्या गाडीला लाइट ग्रीन कलर द्यायला सांगितला नाही का वशिंड्यांच्या गॅरेजमध्ये सर्व्हिसिंगला टाकली तेव्हा? फारच विसराळू बाई तुम्ही "त्यावर अधिक बोलणे शक्य नसल्यामुळे मी गप्प राहिलो आणि मग वाकणकरला अधिकच स्फुरण चढले.

" मग तर बाईसाहेब. पोर्चसाठी यलो ऑकरच घ्या लाइट ग्रीन गाडी पोर्चच्या यलो ऑकर बॅक्ग्राउंडवर अशी काही खुलून दिसेल म्हणता" वाकणकर आनंदातिशयाने नाच वगैरे करू लागतो की काय असे क्षणभर मला वाटून गेले.

मात्र पोर्च हातचे गेलेच पण ड्रॉइंगरूम मात्र कुठल्याही परिस्थितीत जाऊ द्यायची नाही असा ठाम निश्चय करून वादात उतरण्याच्या तयारीत बाबू दिसला पण तेवढ्यात सुमतीच्या डोक्यात कुठून किडा शिरला कुणास ठाउक आणि ती म्हणाली,

"अहो पण त्या मिसेस चिटणिसानी प्रत्येक भिंतीला वेगवेगळा रंग दिलाय तसे आपण केले तर?" आता मात्र या सूचनेचा विचार झालाच तर चार भिंतींच्या चार रंगांविषयीच्या वादाचा निकाल बाबू आणि वाकणेकर यांच्या मुष्टियुद्धानेच लावावा लागेल अशी भीती (आणि मुष्टियुद्ध पहायला मिळणार याचा आनंदही) मला वाटू लागली. पण सुमतीच्या दृष्टीने योग्य असे चार रंग शोधून शिवाय ते घरातील पडद्यानाही मॅच होतील असे पाहून त्याला योग्य दारेखिडक्यांचे रंग शोधणे हे म्हणजे अगदी रेल्वे टाइमटेबल बनवण्याइतके किचकट काम झाल्यामुळे दोघेही तज्ञ त्यातून माघार घेतील असेही मला वाटू लागले पण झाले

भलतेच! चार रंगांचे नाव घेताच वाकणकरच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडू लागला.

" अहो ती कोलीन बँटमची कलर सिस्टिम! ती तर फारच छान आणि सोपीही! आता तुमच्या पसंतीचा कुठलाही रंग निवडा बाकीचे तीन भिंतींचे रंग, त्याना योग्य दारांचे खिडक्यांचे इतकेच काय पण मॅचिंग पडद्यांचे रंग याचे टेबलच दिले आहे बँटमने "

"त्याबद्दल बँटम या महापुरुषाचे आभार मानावे तितके थोडेच आहेत." अगदी भारावून जात मी म्हणालो. पण माझा तेवढाही आनंद वाकणकरला पहावला नाही. व " बँटम ही बाई आहे पुरुष नाही साहेब" माझी चूक सुधारत तो म्हणाला "तेव्हा साहेब ड्रॉइंगरूमच्या एका भिंतीसाठी प्रेग लॅकी द्यायचा आणि त्याप्रमाणे बाकीचे कलर पहायचे ना? " बाबूकडे पहात तो म्हणाला.

"नो नो, प्रेग लॅकी नाही लाइट प्रशियन ब्ल्यूच " आता आपला गड ढासळू द्यायचा नाही या दृढनिश्चयाने बाबू म्हणाला.

"तेच तेच साहेब बँटम ही फेंच स्त्री आहे आणि फ्रेंचमध्ये लाइट प्रशियन ब्ल्यूलाच प्रेग लॅकी म्हणतात. "आणि बाबू विजयोन्मादाने हसला व वाकणेकरबरोबरच टेबल पाहू लागला.

"हे पहा, प्रेग लॅकी, युलिस अपोपो, व्हेलो मॉनरो, पीटट केकी, हे चार रंग भिंतींना आणि खिडक्यांना सेकँट पॅमिलो. पडद्यांचे रंग नंतर ठरवू "

यापैकी एकाही शब्दातून रंगविषयक माझ्या ज्ञानात मुळीसुद्धा भर पडली नाही येवढेच काय पण बाब्या आणि सुमतीला तरी काही कळले असेल असे मला वाटले नाही.

" मग काय ठरले ना हे पक्के? " वाकणकरने खुंटा हलवून बळकट करण्याच्या उद्देशाने विचारले. पण पक्के हा शब्द ऐकताच एकदम सुमतीला काहीतरी आठवले आणि तिने विचारले, "पण हे सगळे रंग पक्के असतात ना हो? "

" अगदी पक्के बाईसाहेब एक वेळ भिंत पडेल पण रंग जाणार नाही" वाकणकर अति नम्रतेने! हाच प्रश्न मी विचारला असता तर मात्र वाकणकरन कुत्सित हास्य करत मलाच विचारले असते, "साहेब, यापुढे घराला कधीच रंग द्यायचा नाही का? "

"आता तुमच्या खोल्यांची डायमेन्शन्स द्या म्हणजे त्याप्रमाणे कॉप्यूटरवर बिलाचा आकडा कळेल. तेवढ्या रकमेचा चेक तुम्ही आम्हाला द्या मग आमचे कारागीर तुमच्याकडे येऊन रंगाचे काम करतील"

आम्ही खोल्यांची आणि पोर्चची मापे सांगितल्यावर वाकणकरनी सर्व माहिती कोम्प्यूटरला फीड केली आणि आलेला आकडा उच्चारला, "एटवनटूथ्रीफाइव म्हणजे आठ लाख एक्याऐंशीहजार दोनशे पस्तीस फक्त. त्यावर टॅक्स नियमाप्रमाणे जो बसेल तो. "

"काय आठ लाख एक्याऐंशी हजार?" मी शॉक बसल्यासारखा ओरडलो. आता सुमती त्यावर रंग द्यायचे रद्द करून बाहेर पडण्याचा काय तोडगा काढते इकडे माझे लक्ष होते. पण तो आकडा ऐकून तिने "काय फक्त आठ लाख एक्याऐंशी हजार? " असा उद्गार काढल्याचा भास मला झाला आणि भंरवशाचा बुरुजच ढासळल्याची खात्री पटली. इतकेच काय पण यावेळी घासाघीस करण्यातील आपले नेहमीचे कौशल्य न दाखवता सरळ तेवढ्या रकमेचा चेक फाडून देऊन तिच्या या क्षेत्रातील आतापर्यंतच्या उज्वल यशावरही तिने पाणी फिरवले. आणि दोनच दिवसानी रंगाचे काम सुरू करण्याचे आश्वासन घेऊन आम्ही घरी परतलो.

दोन दिवसानंतर मी ऑफिसमधून घरी परतलो तर आमच्या घराच्या पोर्चमध्ये एक व्यक्ती हातात भिंग घेऊन एकाद्या रहस्यकथेतील डिटेक्टिवप्रमाणे भिंतीची पहाणी करत असल्याच माझ्या निदर्शनास आले. भिंगातून पाहून तो भिंतीवर पेन्सिलीने मधून मधून खुणा करत होता. मी आत शिरताच मला पाहून "गुड

इर्व्हिनिंग सर" म्हणून तो उभा राहिला तेव्हा तो कलर कॉर्पोरेशनचाच माणूस असल्याचे समजले. "भिंत फार खराब आहे रावसाहेब" असं त्यान म्हटल्यावर तो रंग देण्याच्या दृष्टीने तो भिंतीची पहाणी करत होता हे माझ्या लक्षात आले.

" पण लोक थोडेच भिंत सूक्ष्मदर्शक भिंगातून बघणार आहेत? आणि उघड्या डोळ्याने भिंत काही एवढी वाईट दिसत नाही. " असं मी त्याला समजावण्याच्या उद्देशाने बोललो, पण तेवढ्यात " अहो" अशी माझ्या काळजाचा थरकाप उडवणारी चिरपरिचित हाक कानावर आली आणि मी आत गेल्यावर " अहो थोडेथोडके नाही चांगलोअठ लाख एक्याऐंशीहजार हजार रुपये त्याच्या डोंबलावर घातलेत तेव्हा त्याने सूक्ष्मदर्शक यंत्रातून पाहूनच भिंत रंगवायला हवी, तुम्ही उगीच मधे पडू नका. " असा सज्जड दम मला भरण्यात आल्यावर, 'बर बाई, सूक्ष्मदर्शक भिंगातून पाहून दाढीच्या ब्रशने रंग दिला तरी माझी काही हरकत नाही"म्हणून मी माझ्या खोलीत शिरलो.

काम शक्यतो लवकर आटपा असा मी इशारा दिला त्यामुळे दुसऱ्या दिवशी काम सुरू करून रात्रंदिवस काम करून काम त्याच रात्री पुरे करू असे वाकणकरनी फोनवरून सांगितले. त्या दिवशी रात्री त्यांच्यावर मी देखरेख करावी असा सुमतीचा प्रेमळ आग्रह होता पण मी त्यासाठी तज्ञ बाबूलाच बोलावण्याची सूचना मी केली

आणि नऊ वाजताच पांघरूण घेऊन घोरू लागल्यावर सुमतीचा नाइलाज झाला.

सकाळी मी जागा होतो तो श्रीकृष्णाच्या उशापायथ्याशी बसलेल्या दुर्योधन अर्जुनाप्रमाणे बाबू , वाकणकर आणि सुमती याना पाहून मला मोठे आश्चर्य वाटले पण मग वाकणकरने "गुडमॉर्निंग" म्हणून रंगाचे काम पूर्ण झाल्याचे जाहीर केले आणि मी तसाच उठून बाहेर गेलो.

येवढ्या गहन चर्चेनंतर व मला न समजणाऱ्या भाषेत झालेल्या निर्णयानंतर खरोखर रंग कुठले लावले गेलेत हे पहाण्याची मलाही उत्सुकता होतीच.

मोठ्या उत्सुकतेने मी पोर्चमध्ये पाउल टाकले तो काय पोर्चला साधा पिवळट रंग दिलेला. "हाच का तो यलो ऑकर? " "हाच का तो शिवाजी? " असे मिर्झा राजा जयसिंगला विचारणाऱ्या औरंगजेबासारखे मी वाकणेकरला विचारले. व त्यानेही तेवढ्याच आदबीने "येस सर" असं उत्तर दिले. दिवाणखान्यात प्रवेश केल्यावर मात्र तेथील रंगसंगती पाहून कुठल्याही शहाण्या माणसाला वेड लागल्याशिवाय रहाणार नाही असे मला वाटले. पण याही बाबतीत इतर सर्व बाबींप्रमाणेच सर्व हक्क सुमतीस्वाधीन असल्यामुळे काहीच न बोलणे मी पसंत केले.

आज सुमतीच्या सख्या रंग पहायला येणार होत्या. त्यामुळे मी ऑफिसमधून येताच तिचा "मेरावाला क्रीम" म्हणणाऱ्या बाईसारखा फुललेला चेहरा पहायला मिळेल आणि मैत्रिणीनी रंगाचे केलेले कौतुक ऐकायला मिळेल अशी अपेक्षा होती. पण पहातो तो काय भरताऐवजी रामास राज्याभिषेक करण्याचा निर्णय दशरथाने घेतल्यावर कैकेयीने धारण केल्यासारखा चेहरा तिचा दिसत होता. काय झाले असावे याचा अंधुक अंदाज मला होताच पण त्याला मी जबाबदार नसल्याची खात्री असल्यामुळेच आवाजात अधिकच प्रेमळपणा आणत मी विचारले, "काय गं काय झालं? "

" सगळ्या सटव्या मेल्या, एकीला बँटम, चिकॅसो ही नावसुद्धा माहीत असतील तर शप्पथ, पण सगळ्यानी येवढ्यासुंदर स्कीमवर टीका करून माझा जीव अगदी बेजार केला"

"जाऊदे तू कशाला येवढ मनावर घेतेस त्यांच"

"ते काही नाही मी वाकणकराना फोन करून कळवलय! "

"काय कळवले आहेस? "धडधडत्या अंत: करणाने मी विचारले.

" काहीनाही तुमचच म्हणण बरोबर होत हॉलला सौम्य निळा रंगच योग्य. बाबूनसुद्धा तसाच आग्रह धरला होता. "

" हो पण तुझा नवऱ्यापेक्षा त्या वाकणकरावर जास्त विश्वास"

"चुकलच माझ! म्हणूनच वाकणकरला हा रंग बदलून सौम्य निळाच रंग द्यायला सांगितल सुद्धा. "

""बघ"मी खूष होऊन "माझ अगोदरच ऐकल असतस तर? "

"नाहीतर काय त्या मेल्या वाकणेकरान या निळा रंग देण्याच्या कामाचा एक लाखाचा चेक नेला आहे. "

आता बेशुद्ध पडायची पाळी माझी होती.

यातील रंगांची नावे कोणत्याही भाषेच्या कोशात शोधण्याचा प्रयत्न करू नयेत. सापडलीच तर तो योगायोग समजावा.

# ६.. नाच रे पोरा!

## *(प्रस्तावित आत्मचरित्राची प्रस्तावना)*

अनेक स्त्रीलेखिकांनी लिहिलेली आत्मचरित्रे आमच्या वाचनात आली. त्यातील "रमाबाई रानडे यांच्या "आमच्या आयुष्यातील काही आठवणी" सोडल्यास अगदी लक्ष्मीबाई टिळकांचे "स्मृतिचित्रे"' काय सुनीताबाईंचे "आहे मनोहर--" काय किंवा कमल पाध्ये यांचे "बंधअनुबंध" काय सर्वांनी त्यांच्या पुरुषोत्तमांवर अगदी संधी मिळेल तेथे टीका केली आहे असे दिसते. इतकेच काय काही लेखिकांनी तर त्या एकमेव कारणासाठीच आत्मवृत्त लिहिण्याचा घाट घातला असावा असे आमचे प्रामाणिक मत झाले. अगदी अलीकडे "नाच गं घुमा " हे माधवी देसाई यांचे आत्मवृत्त वाचल्यावर तर आता मात्र आपणही लेखणी हातात धरून त्यांच्या तोडीस तोड असे आमच्या काळातील पुरुषांचे एक प्रातिनिधिक आत्मचरित्र (म्हणजे आमचे स्वत:चेच)आपण का लिहू नये असे वाटलेच व " नाच ग घुमा "च्याच चालीत बसेल असे "नाच रे पोरा " असे शीर्षकही त्याबरोबर सुचले. कारण पुरुषाच्या जन्माला आल्यापासून " ऊठरे पोरा बस रे पोरा " असेच शब्द ऐकण्याची आमच्या पिढीला संवय.

मात्र लग्न झाल्यावर तरी आपण कुणाला तरी हुकूम फर्मावू शकू अशा गोड स्वप्नात राहिलेल्या आमची खरी दुर्दशा गळयात माळ पडल्यापासूनच सुरू झाली याची जाणीव व्हायला लागली आणि आपल्या लग्ना अगोदरच्या "नाच रे पोरा " या अवस्थेत फारसा बदल झाला आहे असे वाटले नाही, उलट लहानपणी हात पाय आपटून, त्रागा करून सांगितलेले न ऐकण्याची थोडीफार असलेली मुभाही आता राहिली नाही अशी जाणीव झाल्यामुळे त्याच तालावर या प्रातिनिधिक आत्मचरित्रास " नाच रे पोरा (की पोऱ्या?)" (त्यातले बायकोच्या तालावर हे अध्याहृत), असे नाव शोभून दिसेल असे आम्हाला वाटते. तसेही पोरगा कितीही आईची आज्ञा पाळत असला तरी लग्न झाले की "लागला नाचायला आपल्या बायकोच्या तालावर" हा ताशेरा त्याला ऐकावा लागतोच आणि तेही जिने त्याच्याच बापाला आपल्या तालावर नाचवलेले असते त्याच आईकडून! त्याही दृष्टीने हे नाव समर्पक राहील असे वाटते.

आजच्या म्हणजे आमच्या पुढच्या पिढीतल्या पुरुषांच्या बाबतीत लग्नाअगोदरच्या आत्मवृत्तात थोडाबहुत बदल असेलही कारण अगदी दोनच पोरे असल्यावर, फार नसली तरी थोड्यातरी लाडाची असल्यामुळे अगदीच ऊठ रे पोरा किंवा बस रे पोरा म्हणण्याइतके त्यांचे अवमूल्यन झालेले नसते. (उलट आजकाल

कधीकधी बापालाच ती ऊठ रे बाबा, बस रे बाबा असे म्हणण्याची शक्यता नाकारता येत नाही). पण लग्नानंतर मात्र त्यांची अवस्था आमच्याही पेक्षा बदतर होत असते म्हणजे आमच्या काळात "अहो " हे बहुमानात्मक पण ज्याच्या उच्चारणात मानापेक्षा अवमानाचाच अधिक समावेश असतो असे संबोधन तरी वापरले जात होते तेही आता गायब झाले आहे. कोठे ते माधवराव रानड्यांच्या काळातील अगदी नाजुक आणि ऐकू येईल न येईल इतक्या हलक्या आवाजात उच्चारलेले "स्वत:" आणि कोठे अंगाचा थरकांप होईल अश्या स्वरात मारलेली आजची एकेरी हाक!

मुलगी पहायला जातानाच मला मित्रांनी बजावून सांगितले होते, की जरा खडसावून प्रश्न विचार. काय प्रश्न विचारायचे ते नव्हते सांगितले, पण त्यांना वाटले की याला आयत्या वेळी सुचेल काही तरी म्हणून. कारण प्राध्यापकाच्या पेशात असल्यामुळे नाही म्हटले तरी विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षेत प्रश्न विचारण्याचा आमचा दांडगाच अनुभव, तो थोडाच असा वाया जाणार? पण कसले काय मौखिक परीक्षेत मुले जशी उत्तर न देता गप्पच बसतात तोच अनुभव येथेही आला पण कारण मात्र वेगळे. कारण मुलीचा बाप असला खट की मुलीला कोणताही प्रश्न विचारला की मधल्यामध्ये झेलायचा आणि उत्तर तोच द्यायचा आणि ती मात्र गालातल्या

गालात हसून आमची होणारी फजिती पहायची. त्यामुळे मुलगी पहायचा सोहळा तिच्या तोंडून आम्ही काहीही उत्तर न ऐकताच पार पडला. बरं बरोबर आलेला स्थानिक मित्रही इतका शहाणा की तिच्या त्या हसण्याला उद्देशून "तुझ्याकडे पाहून मुलगी अगदी गोड हसत होती " असे माझ्या मनात भरवू लागला. म्हणजे माझ्या होणाऱ्या फजितीला ती हसत होती, तर हा शहाणा म्हणतोय, की ती माझ्याकडे पाहून गोड हसत होती. आता आम्हीही इतके बुद्धू की त्याचेच म्हणणे खरे मानून अरे, खरंच गोड हसत होती की, म्हणून त्या गोड हास्यालाच"सुहास्य तुझे मनास मोही"म्हणत अशी गोड हसणारी मुलगी कुणाला आवडणार नाही? " असा प्रश्नार्थी होकार तिच्या बापाला देऊन बसलो. त्यावर आमच्या होऊ घातलेल्या सासऱ्यांनीही "तशी आणखी बऱ्याच जणांना आवडली होती पण तिचं भाग्य थोर (इथं खरं तर तुमचं भाग्य असं त्यांना म्हणायचं असावं) म्हणून तुमच्या पदरात पडली (की मी तिच्या पदरात?)असे आमच्या कानावर घालून आमच्या होकाराचे सार्थक केले. तिचे ते गोड हसणे नंतर कधीच मला पहायला मिळाले नाही. अगोदर ती हसली होती की नव्हती येथूनच वाद सुरू झाला व या बाबतीत मी माझ्या मित्राचे हे मत असे सांगून आत्मघात करून घेतला होता! शिवाय त्या गोड हसण्याचा अर्थ मी तिला आवडलो

असा जो मी घेतला होता तो मात्र तद्दन चुकीचा होता हेच ती मला पुढे आयुष्यभर बजावत राहिली.

थोडक्यात काय माझा स्वप्नाळूपणाच मला नडला आणि "नवरंग" मध्ये कविराज आपल्या बायकोसच जसा मोहिनी समजत होता तसे समजण्याचा मी अट्टाहास करत होतो. तर ती मात्र हवेत तरंगणारे माझे विमान लगोलग खाली आणत होती. आमचे लग्न टिकण्याचे ते एक महत्त्वाचे कारण असावे. आता ते विमान तरंगण्याचे दिवस गेले, आता ते लॅंड होऊन खुरडत खुरडत चालले आहे, Opposite poles attract each other असे म्हणतात आता attract राहिले, निदान attach तरी म्हणता येईल असे वाटले होते पण ते चक्क attack मध्ये रूपांतरित कसे झाले कळत नाही.

खरे तर मुलगी पहायला जाताना असलेला, निदान त्यावेळी तरी असलेला, नकाराधिकाराचा पर्याय एकदा तरी मी वापरून बघायला हवा होता असे सर्वांचेच मत पडले. आमच्या मातोश्रीही म्हणाल्या "कसला आमचा बंड्या, बघितली पहिलीच मुलगी आणि बसला तिलाच होकार देऊन. " आमच्या बहिणींनी तर किती मनोरथ केले होते की येणाऱ्या मुलीला असे प्रश्न विचारीन, आणि तसे प्रश्न विचारीन आणि झाले भलतेच म्हणजे त्यांचा

भाऊराया मुलीच्याच गावी जाऊन मुलगी बघून काय आला आणि वर होकारही काय दिला. अरेरे ठरवलेले सगळे मुसळ अगदी केरात गेले. त्याना म्हणे डॉक्टर मुलगी हवी होती (कशाला? लग्न म्हणजे काय ऑपरेशन वगैरे वाटले की काय?). आणि गोरीपान, लांबसडक केस असलेले वगैरे वगैरे वर्णनाची आणि मी तर या वर्णनापैकी कोठल्याच गोष्टीकडे लक्ष न दिलेले. यावर ही गोष्ट मी तिला म्हणजे मला आवडली होती तिला सांगण्याचा मूर्खपणा केल्यावर ती म्हणते, "अगोदर आरशात पहा आणि मग माझ्यासारखी तरी मिळाली हे नशीब समजा. "

मी तिला पसंत करण्याचे एकमेव कारण म्हणजे मी विचारलेल्या प्रश्नास उत्तर न देता गप्प बसली हेच. अशी गप्प बसणारी मुलगी लग्नानंतरही तशीच राहील आणि मी जे काय बोलेन ते मला उलट न बोलता ऐकून घेईल, म्हणजे थोडक्यात माझ्या तालावर नाचेल अशी त्यावेळी झालेली खुळी कल्पना, पण कसचे काय तिला पसंत करून निघाल्यावर बसस्टँडवर आमचे भावी सासरेबुवा, सासूमाय आणि आमचे भावी कलत्र आम्हाला सोडायला आलेले. मी बसस्टॅंडवरच्या (त्यावेळी कळकट्ट बाक असत) बाकावर जरा आरामात पाय पसरून बसलो तर एकदम समोरून सूचना आली, "अहो जरा नीट बसाना " आम्हाला शिस्त लावायला आतापासूनच सुरवात झाली होती तर.

लग्न ठरून प्रत्यक्ष होण्यापूर्वीच तिनं अशी दादागिरी सुरू केली की, लग्न होण्यापूर्वीच मला घटस्फोट घ्यावा लागून या बाबतीत माझी पी. जी. वुडहाउसच्या बर्टी (बर्ट्रॅम वुस्टर) सारखीच गत होते की काय असे मला वाटू लागले. पण या बर्टीला bachelorच रहाण्याचीच हौस होती आणि त्यामुळे तो स्वत:स confirmed bachelor म्हणवून घेई. अनेक वेळा त्याला एकाद्या मुलीने गंडवले असे पी. जी. ने दाखवल्यावर वाचक मनातल्या मनात "अरे हा गटला रे गटला" असे म्हणेपर्यंत काहीतरी हास्यास्पद भानगड होऊन त्या दोघांचे फाटते. या बर्टीला त्याचा डोकेबाज बटलर जीवज् इतके सल्ले किंवा सूचना देत असतो की त्यामुळेच बर्टीला सल्ले घेण्यासाठी आणखी एका व्यक्तीची जरुरी नाही, याची खात्री असल्याने लग्नाची जरुरी वाटत नसते. मलाही खरे तर सल्ले देण्यासाठी आई व बहीण ही जोडगोळी उपस्थित होती पण त्यांच्याच मते त्या काय मला जन्मभर थोड्याच पुरणार आहेत, म्हणून मी लग्न करून घ्यावे हा त्यांचा एकमेव सल्ला मला जन्मभर नडला

माझे एक अगदी जवळचे मित्र होते (गेले बिचारे) त्यांच्याकडे मी एकदा म्हटले, "काय रे तुझी ऐट, घरात एकाद्या राजासारखे वागतोस. अगदी चहाचा पेला उचलत नाहीस की पाण्याचा पेला सुद्धा बायकोनेच हातात आणून द्यायचा, त्यावर तो म्हणाला "अरे

त्याच्यासाठी लग्नानंतर लगेच मांजर मारावे लागते" "ही मांजर मारायची काय भानगड आहे? " मी कुतूहलाने विचारले. "अरे त्याची एक गोष्ट आहे. "आमच्या मित्राने सुरवात केली,

"एका राजाची एक भयंकर तापट मुलगी होती. ज्याच्या त्याच्यावर गुरगुरायची, राजाला काळजी पडली हिचं लग्न कसं होणार. तिची ही कीर्ती ऐकून एक राजपुत्र त्या राजाकडे आला आणि म्हणाला 'मला तुमच्या मुलीशी लग्न करायचेय' राजाने अगोदरच सांगितले, "बघ बुवा ही पोरगी फारच तापट आहे कधी चिडेल आणि ओरडेल काही सांगता येत नाही. हो उगीच मागून तक्रार नको. तशी ती राजकन्या दिसायला वगैरे बरी होती त्यामुळे हा पठ्ठ्या म्हणाला, करू आपण सरळ तिला. आणि राजाला म्हणाला "आहे माहीत सगळे मला, तरी लग्न तिच्याशीच करायचे ठरवले आहे मी. " राजाला काय बरेच झाले. आयता जावई घरी चालून् आला आणि लग्न ठरले आणि झालेसुद्धा.

त्या काळाप्रमाणे सर्व विधी झाल्यावर पहिल्या रात्रीसाठी जोडपे शयनगृहात शिरले. त्याच्यापाठोपाठ एक मांजरही आत शिरले, त्याबरोबर मोठ्यांदा आवाज करून तो राजपुत्र त्याच्यावर ओरडला, "'अरे काळ्या बेट्या, आता आलास ते आलास पण आणखी काही करशील तर खैर नाही तुझी'" पण मांजरास ते कसले

कळायला, ते लाडीगोडी लावून बिछान्यातच लागले शिरायला. त्याबरोबर हा राजपुत्र ओरडला, "एकदा सांगून कळत नाही? थांब तुझी खोड मोडतो"म्हणून कमरेची तरवार काढून खाडकन त्या मांजराच्या पाठीत घालून त्याने त्याचे दोन तुकडे करून टाकले, आणि राजकन्येकडं पाहून म्हणतो, "आपलं हे असं आहे सगळं काम, कोणी माझं ऐकलं नाही आणि मला राग आला तर लगेच एक घाव दोन तुकडेच! " राजकन्या मनातल्या मनात हबकली आणि तिनं मनात विचार केला, या माणसाचे काही खरे नाही आपण जर काही आगळिक केली आणि हा रागावला तर हा आपलेपण दोन तुकडे करायला मागेपुढे पहाणार नाही. आणि त्यामुळे ती अगदी निमूटपणे त्याच्या तालावर नाचायला लागली. तर अशी आहे ही पहिल्या रात्री मांजर मारण्याची गोष्ट. पहिल्यांदाच बायकोला अशी दहशत घालून ठेवायची की मग पुढे तिनं आपल्या तालावर नाचायलाच पाहिजे. "मित्राने समारोप करत म्हटले..

मित्राने दिलेला हा धडा गिरवण्याचा मी प्रयत्न केला पण झाले मात्र भलतेच. त्याचे काय झाले, माझे वडील भयंकर संतापी म्हणून आम्ही सगळे त्यांच्या धाकात वाढलेलो आणि आई तर काय बिचारी गरीब गाय. वडिलांच्या मनाविरुद्ध काही गोष्ट झाली की ते लगेच जानवे कानाला अडकवून, तांब्या घेऊन व डोक्याला

टापशी गुंडाळून घराबाहेर पडणार. मग आई आम्हा सगळयांना म्हणणार "अरे बघा रे जाऊन कोठे गेलेत ते. त्या ह्यांच्याकडे गेले असतील नाहीतर त्या ठिकाणी असतील आणि आम्ही सगळी मंडळी त्यांच्या शोधार्थ बाहेर पडणार.

दुर्दैवाने आमचे लग्न काही त्यांच्या नजरेसमोर घडायचे नव्हते त्यामुळेच आपल्या लग्नाचा निर्णय आम्हालाच घ्यायला लागला. पण मित्राने सांगितलेली गोष्ट ऐकून वडिलांचा कित्ता तरी आपण गिरवावा म्हणून एकदा माझ्या मनाविरुद्ध बायको वागल्यावर मी घराबाहेर पडून असाच गायब झालो. आई बिचारी, वडिलांचा अनुभव असल्यामुळे माझ्या धाकट्या भावाला म्हणू लागली, "अरे बघ रे तो अण्णा (आता बंड्याचा अण्णा झाला होता) कुठं गेलाय तो" भाऊ बिचारा, आईची आज्ञा पाळण्याच्या तयारीने बाहेर निघाला तर आमची बायको आपल्या दीराला काय म्हणतेय, "काही कुठ्ठ बघायला जाऊ नकोस, भूक लागली की आपोआप येतील घरी, जाताहेत कुठं" आणि आईला म्हणतीय, 'तुम्हाला काय वाटतेय ते घर सोडून जातील, तसे काही होत नाही " आणि आई आपली बिचारी "बर बाई, तुझच खरं, आमचं काय राहिलंय आता, आम्हाला आपलं वाटलं ते सांगितलं" म्हणून गप्प. आणि खरेच की आम्ही थोडावेळ इकडे तिकडे भटकून शेवटी आलोच घरी. जाणार कुठे आणि किती वेळ? मग काय "शेवटी

आलातच ना घरी जाताय कुठे? " हे तिच्या चेहऱ्यावरचे भाव वाचायला काही फार मोठ्या अनुभवाची जरुरी होती अश्यातला भाग नव्हता. म्हणजे मांजर बिचारं फुकटातच मेल आणि जरब मात्र आमच्या बायकोचीच बसली. अश्या प्रकारे आमच्या आयुष्यातील समरप्रसंगांचे म्हणजे त्यातील आमच्या पराभवांचे निवेदन म्हणजेच आमचे हे पुस्तक, "नाच रे पोरा (बायकोच्या तालावर)"त्याचीच ही प्रस्तावना, यात आभारप्रदर्शनास वावच नाही आणि अर्पणपत्रिकेविषयी वाचकांना सांगणे आवश्यक आहे का?

# ७. सापडला म्हणून --!

" आजोबा तुमचा फोन" माझ्या नातीने फोन माझ्या हातात देत म्हटले. सध्या आमच्या घरातील फोन हा आमचा नावापुरताच असतो बहुतांश तो तिच्या मैत्रिणींबरोबर गप्पा मारण्यासाठी, त्यांच्या शाळेत होणाऱ्या कार्यक्रमांविषयी किंवा एकमेकीच्या डिफिकल्टीज सोडवण्यासाठी असून त्यांच्या कानाशी तो नसला तरच आम्हाला हाताळायला मिळतो त्यामुळे तिचा फोन बंद असताना आलेलाही फोन तिचाच असणार म्हणून आम्ही पहिला अग्रक्रम तिलाच देतो आणि तिचा नसलाच तर ती नाइलाजाने तो आमच्या ताब्यात देते. तसेच त्यावेळी झाले. अर्थात ही गोष्ट बी एस एन एल ची मक्तेदारी दूरध्वनि क्षेत्रात होती व घरात एकच श्रवणयंत्र असायचे त्या काळातील आहे.

मी फोन कानाला लावला व " काय आहेत का श्यामराव? " हे उद्गार ऐकल्यावर ही व्यक्ती कोण असावी याविषयी तर्क करू लागलो. त्या व्यक्तीच्या आवाजावरून ती कोण आहे हे मी ओळखावे अशी तिची अपेक्षा असणार हे उघड होते अश्या वेळी माझी पंचाईत होते. थोडा वेळ बोलल्यावर कधी कधी लहानपणी

"संदर्भासह स्पष्टीकरण करा " अश्या प्रश्नासाठी लागणारी बुद्धिमत्ता वापरून मी त्या व्यक्तीचे नाव ओळखू शकतो व मग आमचा संभाषणप्रवाह सुरळीत चालू लागतो.

पण आता फारसा विचार करावा न लागता हा सान्यांचाच फोन हे मी ओळखले कारण परवाच ज्येष्ठ नागरिक संघात त्यांची गाठ पडली होती.. त्यांच्या व माझ्याही एका मित्राच्या सुनेचा नाट्यगीत गायनाचा कार्यक्रम त्या ज्येष्ठ नागरिक संघात त्यांच्या सूचनेवरून ठेवण्यात आला होता. अश्या कार्यक्रमात साथीदार (आणि वाद्ये)ही आपलीच घेऊन जावे लागते. तबल्याची साथ तिचा नवराच करणार होता. पण हार्मोनियमच्या साथीचा प्रश्न होता. तिने मला विनंती केली व अडल्या नडल्याची गरज भागवण्यास नकार देणे मला जमत नसल्यामुळे मी तिला होकार दिला. या सर्व कार्यक्रमाची योजना सान्यांची. पण कार्यवाही ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यवाहांची होती व त्या गृहस्थांना या कार्यक्रमातील कलाकार म्हणजे फक्त आमच्या मित्राची मुलगी असे वाटले की काय कोण जाणे. निदान मंचावर उपस्थित आमचे आणखी एक गायक मित्र व आम्ही साथीदार एवढे लोक आपल्याच विनंतीला मान देऊन आले आहेत हे कळण्याइतपत समजही त्यांना नव्हती असे दिसले. कार्यक्रम झाल्यावर कलाकारांचा सत्कार करण्याच्या वेळी फक्त गायिकेचाच काय तो पुष्पगुच्छ व बंद पाकीट देऊन

त्यांनी सत्कार केला इतरांना पुष्पगुच्छ देण्याचेही सौजन्य दाखवले नाही ही गोष्ट सर्वच उपस्थितांना खटकली. सान्यांना तर ती गोष्ट लागणे स्वाभाविकच होते.

पण तरीही आज परत फोन करून आपली नाराजी ते व्यक्त करतील अशी अपेक्षा नव्हती. कालच त्यानी आपल्या मनातील ही खंत बोलून दाखवली होती. " हा सगळा प्रकार मला फारच लागला. सचिव व अध्यक्षांशी मी बोललो व आता मी ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासदत्वही सोडणार आहे. " असे उद्गार त्यानी काढले त्यावर मी " जाऊ द्याहो एवढे मनाला लावून घेण्याचे कारण नाही. अगोदर मी काही अपेक्षेने आलोच नव्हतो. मित्राच्या मुलीची अडचण सोडवायची एवढाच उद्देश होता. कदाचित त्यांचा पुष्पगुच्छाचा अंदाज चुकला असावा व त्यांच्याकडे उरले नसतील" असे त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला.

आणि आज पुन्हा सान्यांचाच फोन आला पुन्हा त्यानी कालच्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त केला व मी त्याना धीर दिला पण त्यानंतर एकदम त्यानी सुर बदलून वेगळा प्रश्न केला,

"अहो तुम्हाला कोणी तबला शिकवणारा माहीत आहे का? "असा प्रश्न केला अचानक हा प्रश्न कसा उद्भवला याचे मला नवल वाटले.

"का तुमच्या नातवाला शिकावयाचा आहे का? " सान्यांचा नातू दहा बारा वर्षाचा असल्यामुळे बहुधा त्यालाच शिकायचे असेल असा माझा अंदाज होता

"नाही मलाच शिकायचे आहे"सान्यांच्या स्वरात जरा ओशाळल्याची भावना दिसत होती. आता या वयात हा उपद्व्याप याना का सुचला असे मला वाटेल असा त्यांचा समज असावा. होता. तसा मी आश्चर्याने थक्क झालोच कारण आता त्यांचे वय पंचाहत्तर वर्षाचे होते. त्याहून महत्त्वाची गोष्ट ज्येष्ठ नागरिक संघाचा तो कार्यक्रम सोडता आतापर्यंत संगीताच्या कुठल्याच अंगाविषयी त्यानी फारशी उत्सुकता दाखवल्याचे मला आठवत नव्हते. अर्थात हा वयाचा व रस दाखवण्याचा मी लावलेला निकष कदाचित चुकीचा असेल व सान्यांनाही संगीतात रस असू शकेल असा मनाशी मी विचार करत असतानाच सानेच पुढे म्हणाले "अहो आज सकाळी माळा साफ करताना एकदम तेथे तबल्या डग्याची जोडी सापडली. फार वर्षापूर्वी मी शिकत होतो. मध्यंतरी आमच्या जावयांनी नेली होती आणि ती परत आणून देऊनही बरीच वर्षे गेली तेव्हांपासून ती माळ्यावर पडून होती. ती काल सापडली तेव्हा म्हटले उगीच कशाला तशीच पडू द्यायची म्हणून म्हटल आपणच पुन्हा एकदा शिकायला सुरवात करावी"

"वा वा उत्तम! "मी त्यांना शाबासकी देत म्हणालो. "या वयात तुमचा उत्साह मात्र कौतुकास्पद आहे. "

"तस काही नाही" जरा लाजतच ते म्हणाले, "अनायासे सापडला आहे तर म्हटले---- "

म्हणजे तबला हे वाद्य वाजवता येण्यापेक्षा सापडलेल्या तबल्याचा उपयोग होणे ही गोष्ट त्याना महत्वाची वाटत होती की काय अशी शंका मला आली तरीही या वयात या माणसाचा शिकण्यातील उत्साह पाहून मला आनंदच झाला. त्यामुळे मी लगेचच"अहो मग त्याला दुसऱ्या कोणाची काय आवश्यकता आहे, मीच शिकवीन की तुम्हाला" असे म्हणताच सान्यांना खूप आश्चर्य वाटले असे दिसले कारण लगेचच त्यानी आश्चर्य व्यक्त केले. व ते म्हणाले,

"अरे वा तुम्ही तबला पण वाजवता वाटत? काल तुम्ही हार्मोनियम वाजवत होता म्हणून मला वाटले की कोणी तबलावादक तुमच्या माहितीतला असेल. "

"हो खरं तर मी तबलाच वाजवतो, त्या दिवशी हार्मोनियमला कोणी मिळाला नाही आणि मित्राचीच सून होती म्हणून मी साथ केली. तेव्हां काहीच काळजी करू नका" आणि पुढे हसत हसत

"मी तबला शिकवेनच आणि काही फी पण घेणार नाही" असेही सांगून टाकले.

"मग बरेच झाले, "सान्यांच्या स्वरात एकदम मोकळेपणा आला. आणि पुढे तेच म्हणाले,

" मग तुम्हाला कोणता टाइम सोयिस्कर आहे? " त्यानी विचारलं. अशा बाबतीत मला एकूण व्यवहारज्ञान कमीच. त्यामुळे आपली डायरी बघून सांगतो वगैरे म्हणण्याचे कधीच मला सुचत नाही त्यामुळे मी नेहमीच्या बेपर्वाईने म्हणालो,

"केव्हांही या की, आता काय आपण सेवानिवृत्त माणसं त्यामुळे केव्हांही मोकळेच की"

" तसे नाही पण तुमच्या वेळेचा खोळंबा व्हायला नको" इति साने.

"मग सोमवारी येता संध्याकाळी? "मी म्हणालो आणि तेही माझ्यासारखेच मोकळे असल्याने होकार देतील अशी माझी कल्पना पण ती त्यानी फोल ठरवली.

"सोमवारी नको कारण त्यादिवशी आमचा ब्रिज खेळण्याचा वार असतो. "

" मग बुधवारी या " मी उगीचच एकदिवसाचा गॅप घेऊन आपणही अगदीच मोकळे नाही असे दाखवण्याचा प्रयत्न केला.

" तो आमचा दासबोधाचा दिवस असतो. आमचे दासबोधमंडळ त्यादिवशी आनंदनगर गणेश मंदिरात जमते. तुम्ही पण या की एक दिवस " सान्यांनी मलाच त्यांच्या मंडळात ओढण्याचा प्रयत्न केला. पण प्रश्न माझ्या दासबोधमंडळात जाण्याचा नसून त्यांचा माझ्याकडे तबला शिकायला येण्याचा आहे हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करत शेवटी मी म्हणालो, "मग तुम्हीच सांगा तुम्हाला केव्हां शक्य आहे ते "म्हणजे तबला शिकण्याच्या त्यांच्या जरुरीपेक्षा तबला शिकवण्याची निकड आता मलाच असल्याचा भास निर्माण झाला.

" असं करूया मग. मंगळवारी संध्याकाळी पाच साडेपाचच्या सुमारास मी येत जाईन, चालेल ना? "सान्यांनी आपली वेळ जाहीर केली. अर्थात असा सत्शिष्य लाभणार असल्यामुळे शिवाय मला खरोखरच काही अडचण नसल्यामुळे मी होकार दिला. नाहीतरी हा आमच्या दोघामधीलच मामला असल्यामुळे ते फोन करूनच येणार होते आणि माझी काही अडचण असेलच तर मी त्याना तसे सांगू शकत होतो.

"ठीक आहे तर मग. आमचे घर तुम्हाला माहीतच आहे. या फोन करून. "खरे तर त्यांची पत्नी साधना माझ्या बहिणीची वर्गमैत्रिणच होती, त्यामुळे मी पुढे,

" साधनालाही घेऊन आलात तरी चालेल. ती बसेल गप्पा मारत माझ्या बायकोबरोबर आणि आपले तबला शिक्षण होईल. " म्हणून त्याना निरोप दिला.

मध्ये तीन चार दिवस गेले आणि मंगळवारी पाचच्या ठोक्याला फोन वाजला. नेहमीप्रमाणेच मी सानेअध्याय विसरून गेलो होतो, यावेळी नात घरात नसल्याने कोणाचा बुवा फोन असे पुटपुटत मी फोन घेण्यापूर्वीच आमच्या दक्ष पत्नीने नेहमीप्रमाणेच त्यावर कब्जा केला होता व मला फोन न देता " साने येताहेत" असा निरोप देऊन पुढच्या तयारीला ती आत गेली साने कशासाठी येत आहेत हे तिला माहीत असल्यामुळे त्यांच्या आगमनाची तयारी करण्याचे काम तिने स्वत:वरच घेतले कारण सान्यांना जरी माळयावर अडगळ काढताना अगदी विनासायास तबला सापडला असला तरी आमचा तबला मात्र तिने मोठ्या बंदोबस्तात ठेवलेला असतो. त्याचे एक कारण म्हणजे आमच्या सदनिकेत जागेचा अभाव असल्यामुळे त्याच्यावरील आवरणासकट तो एका मोठ्या उभ्या कोठीत ठेवून त्यावर शिलाईचे हातमशीन स्थानापन्न करण्यात आले होते, अशा कडेकोट बंदोबस्तातून तबला काढण्याचे काम मी केल्यास होणारा गोंधळ निस्तरणे हे तिच्या कोष्टकात बसत नसते. शिवाय कोणत्या क्रमाने कोठीवरील व आतील वस्तु काढून त्या कोठे ठेवायच्या याबाबतीत तिची तंत्रे

सांभाळणे हे माझ्या आवाक्याबाहेरचे काम असल्यामुळे तिने तबला काढून बैठक मांडून त्यावर तो सुस्थापित करेपर्यंत साऱ्यांची वाट पहाण्याचे कामच केलेले बरे म्हणून मी स्वस्थ राहिलो.

साऱ्यांचे घर तसे आमच्या सदनिकेपासून फार दूर नसल्याने ते चालतच येणार व फारफार तर अर्ध्या तासात येणार हा माझा अंदाज होता, पण तो खोटा ठरवत ते पाउण तास झाला एक तास झाला झाला तरी आले नाहीत. यापूर्वी ते बऱ्याच वेळा आमच्याकडे येऊन गेले होते त्यामुळे चुकण्याचा काही संभव नव्हता पण सौ. ला काय शंका आली कुणास ठाउक म्हणून ती बाल्कनीत जाऊन उभी राहिली आणि तिने त्याना आमच्या इमारतीच्या आणखी दोन इमारती ओलांडून पलीकडे असलेल्या इमारतीत शिरताना पाहिले. अर्थातच ते आमच्याकडे येत असल्यामुळे त्या इमारतीत त्यांना थारा मिळणार नाही व ते तेथून बाहेर पडणार हा तिचा तर्क (जो चुकणे शक्यच नसते)खरा ठरून ते बाहेर पडून आमच्या बिल्डिंगपुढे आल्यावर त्यांचे लक्ष वेधून घेऊन तिने त्याना बरोबर दिग्दर्शन करून घरात आणले.

या सर्व प्रकारात साने खूपच खजील झाले होते. " अहो तुमची बिल्डिंग पुढे आहे म्हणून पुढेच गेलो" असे म्हणून त्यानी

आपली चूक कबूल केली. "पण तुम्ही यापूर्वी बऱ्याच वेळा येऊन गेलात ते अगदी बरोबर आला होतात. "मी त्याना धीर देत म्हणालो

"त्याचे काय आहे त्यावेळी ही बरोबर होती ना ‘‘

ही गोष्ट मात्र खरी की आतापर्यंत ते एकटे कधीच आले नव्हते, आणि साधना बरोबर नसल्यावर त्यांचीही अवस्था शीड तुटलेल्या नावेसारखी होते ही गोष्ट खरे पहाता स्वानुभवाने माझ्या ध्यानात यायला हवी होती. या गोष्टीचा अधिक खल करून त्यांना अधिक शरमिंदा करण्याची मला इच्छा नव्हती म्हणून मी त्याना तबला स्थानापन्न केलेल्या बैठकीकडे नेले.

" वा छान तबला आहे तुमचा, " त्या त्यांच्या माळ्यावरून काढलेल्या तबल्याच्या मानाने नवा कोराच असणारा तबला पाहून ते उद्गारले. "आमचा माळयावर सापडला. पण अजून चांगल्या परिस्थितीत आहे म्हणून म्हटले त्याचा उपयोग व्हावा अनायासे तुम्हालाच तबला येतो हे कळले हे तर फारच छान झाले. " तबला ही वस्तू घरात आहे म्हणून ती उपयोगात आणण्यासाठी तबला शिकण्याचा त्यांचा संकल्प हा त्यांचा विचार कौतुकास्पद होता. नाल सापडला म्हणून घोडा घेणाऱ्या माणसाने आता घोडाच सापडल्यावर घोड्यावर बसायला शिकावे तसेच हे झाले असे

माझ्या मनात आले तरी तो विचार त्यांच्यापुढे मांडून त्याना खजील करण्याचे मी टाळले.

सुरवात करायला सोपे जावे म्हणून मी त्यांच्यापुढे तबला ठेवून तुम्ही काय शिकला ते जरा वाजवा असे त्याना सांगितल्यावर त्यानी तीन ताल व दादरा असे दोन ताल वाजवून दाखवले. तसे वाजवण्यात सफाई नसली तरी ते ताल ते बऱ्यापैकी वाजवत होते. तरीही आता व्यवस्थितच शिकायचे असा निर्धार व्यक्त करून त्यानी आपल्या पिशवीतून वही पेन्सिल काढून तालाचे बोल उतरून घ्यायला सुरवात केली. सर्व साधारणपणे जे ताल वाजवले जातात त्यांचे बोल मी त्याना उतरून दिले. ते उतरून घेऊन त्यातील काही वाजवण्याचा त्यानी प्रयत्न केला.

त्यांच्या वादनाचा थाट संगीत दिग्दर्शकांच्या वाद्यमेळयातील वादकांसारखा होता म्हणजे वादकांसमोर स्वरलिपी कागदावर लिहिलेली असते त्यानुसार ते वाजवत असतात त्याचप्रमाणे साने वही मांडीवर ठेवून त्यातील बोल पहात वाजवण्याचा प्रयत्न करत होते. त्याना थांबवून बोल पाठ करून व हातावर टाळी वाजवत ताल कसे म्हणायचे याचे प्रात्यक्षिक मी दाखवले बोल पाठच व्हायला पाहिजेत असे सांगितले. त्याचबरोबर तबला वाजवताना

लयीसाठी मेट्रोनोम जवळ ठेवून सराव करायचा सल्ला दिला. इतके सगळे ऐकून

"कोणातरी जाणकाराचे मार्गदर्शन आवश्यकच आहे आणि आता ते तुमच्याकडे मिळेल त्यामुळे आता काही काळजी नाही" असे उद्गार काढीत "आता पुरे झाले" असाही निर्णय त्यानीच घेतला व त्यानंतर चहापानाची तयारी सौ. ने ठेवली होती. "खरे तर याची आवश्यकता नाही मी प्रत्येक आठवड्यात येणारच "असे उद्गार काढले

पुढील आठवड्यात मीच सान्यांच्या घरी गेलो. अर्थात अगोदर फोन करूनच.

"बर झालं तुम्हीच आलात, आमचा तबला कसा आहे तेही कळेल"सान्यांनी हसतमुखाने माझे स्वागत करीत म्हटले. तबल्याकडे लक्ष गेल्यावर तो माळयावरून काढून ठेवणे एवढाच उपचार सान्यांनी पाळलेला दिसला. सौ. सान्यांना त्यांच्या तबलावादनाशी काही देणे घेणे नसल्यामुळे त्यांचा हात त्यावरून फिरवलेला नव्हता आणि सान्यांची अशा बाबतीत सगळी भिस्त आपल्या सौभाग्यवतीवर असल्यामुळे तबल्याला हात लावताच धुळीचा थर माझ्या हातावर चढला. तो अनेक वर्षे माळयावर ठेवलेला असल्याने त्यातून आवाज निघत नव्हता त्यासाठी त्याचे

गट्ठे ठोकणे आवश्यक होते. पण तबल्याबरोबर हातोडी काही माळयावर सापडली नाही त्यामुळे तात्पुरता त्यांच्या इंजिनियर मुलाच्या वर्कशॉपमधील भला मोठा हातोडा "तात्पुरते याच्यावर काम भागवायचे का? "असे संकोचाने विचारत त्यानी माझ्या हातात दिला.

माझी परिस्थिती सौ. साने यानी पाहिली व त्या एक नापसंतीचा कटाक्ष टाकत म्हणाल्या, "अहो त्या तबल्यावर किती धूळ आहे पाहिलीत का? " आणि तबला डग्गा माझ्याकडून घेऊन एका मोठ्या फडक्याने स्वच्छ पुसून त्यानी ते माझ्या स्वाधीन केले.

मोठ्या हातोड्याने तबल्याच्या गट्ट्या ठोकताना माझी बोटे चेपणार नाहीत याची दक्षता मला घ्यावी लागत होती. शिवाय सौ. साने यानी पुसून दिला असला तरी गट्ठे ठोकल्यावर त्यामागे बसलेली धूळ माझ्या नाकात जातच होती अर्थात ती सहन करणे मला भाग होतेच, कारण त्याशिवाय तबल्यातून आवाज निघणे शक्य नव्हते व ते ठोकण्याचे काम सान्यांच्यावर सोपवले असते तर तबला म्हणजेच साने यांना तबला शिकण्यासाठी असलेले एकमेव कारणच नष्ट झाले असते. गट्ठे ठोकताना तबल्याची वादी पण एका ठिकाणी तुटलेली आहे असे मला आढळून आले व त्याची दुरुस्ती

करणे आवश्यक आहे असे मी सुचविले. त्यावर सान्यांनी तत्परतेने हे काम कोठे होईल ही विचारणा केली.

मला माहीत असलेल्या संगीत वाद्यांच्या विक्री व दुरुस्ती केंद्राचा पत्ता मी त्याना दिला व खरे तर ते त्यांच्या घराच्या अगदी जवळच होते. मेट्रोनोमही तेथेच मिळेल असे सांगून त्याना त्यानी मेट्रोनोम अजून आणला नाही याचे स्मरण करून दिले. त्यांचा मुलगा संगणकावर काम करत असल्याने व कारमधून फिरत असल्यामुळे मेट्रोनोम त्याला माहीत असेल व त्याच्या गाडीतून तबला नेऊन दुरुस्ती करता येईल असेही सुचवले.

तबल्यातून ऐकू येण्याइतपत आवाज येऊ लागल्यावर मी त्यात अधिक नादमधुरता आणण्याचा प्रयास सोडून आहे त्या परिस्थितीतच त्याचेवर रियाज करण्यास मी त्याना सांगितले. अर्थात त्यांच्या वाजवण्यात त्यामुळे फारसा फरक पडला नसता. माझा मुलगा त्याच्या लहानपणी तबला शिकायला जात असताना प्रथम रियाज करण्यासाठी त्याला लाकडी तोंडाच्या तबल्यावरच रियाज करायला सांगितला होता असे त्याने मला सांगितले होते त्यामानाने या तबल्याचा आवाज बराच मंजूळ होता असे म्हणावे लागेल. अर्थात त्या प्रकारच्या रियाजाचा उद्देश प्रत्यक्ष तबल्यावरील बोल अधिक स्पष्ट उमटावे हा होता. तशी शक्यता व

आवश्यकता दोन्हीही सान्यांच्या बाबतीत मला दिसली नाही. कारण बोल पाठ करण्यास त्याना त्यांच्या बहुविध कार्यक्रमाच्या दिनचर्येतून वेळ मिळाला नसल्यामुळे आजही त्यानी वही समोर ठेवून त्यातील बोल तबल्यावर काढण्याचा प्रयत्न केला.

त्याना टाळी वाजवून बोल माझ्यासमोरच म्हणण्यास सांगितल्यावर त्यांचे बोल व टाळी यांचे काही जमेना. टाळीचा उद्देश बोलांचा काल दाखवणे हा नसून ते एक स्वतंत्र वादनच आहे असे त्याना वाटत नसले तरी तसे घडत होते त्यामुळे थोड्याच टाळयांचा प्रयत्न करून तो सोडूनच ताल वाजवण्याचा त्याना सल्ला दिला.

"तुम्ही समोर असताना मी बरोबर वाजवतो की नाही हे समजते. मी बऱ्याच वेळा घरात वाजवतो पण ते बरोबर आहे की नाही हे समजत नाही. " असे त्यानी म्हटल्यावर मी नेहमीच त्यांच्या समोर असणार नाही म्हणूनच त्यानी मेट्रोनोम घेणे आवश्यक आहे हे मी त्यांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न केला.

"या आठवड्यात आणायलाच पाहिजे, "त्यानी मला आश्वासन दिले, "कोणत्या दुकानात मिळेल म्हणालात तुम्ही? "पुन्हा त्यांनी मूलभूत प्रश्न विचारला व त्यला मी माहीत असलेले उत्तर दिले. नंतर मला अजूनही खात्री न वाटल्याने मी त्यांच्या

वहीतच मेट्रोनोम हा शब्द व त्या संगीतकेंद्राचे नाव व पत्ता दिला. "शिवाय तबल्याची हातोडीही लागेल" त्यातच भर घालत मी म्हणालो.

"ठीक आहे मग पुढील आठवड्यात या सगळया गोष्टी मिळवण्याचा प्रयत्न करतो. "म्हणजे आजचा त्यांचा रियाजाचा वेळ संपला होता याचे हे सूचक विधान होते.

पुढील मंगळवारी साने मध्यप्रदेशच्या दौऱ्यावर जाणार होते त्यामुळे व त्यानंतरच्या आठवड्यात आम्ही पण गावी जाणार होतो पण मधल्या काळात मेट्रोनोम, हातोडी आणण्याचे व त्यावर रियाज करण्याचे आश्वासन सान्यांनी मला दिले. तबल्याची दुरुस्ती करूनच रियाज करण्याची सूचना मी त्याना केली पण एका महिन्यानंतर आमच्या दोघांच्या यात्रा पार पडून आमची गाठ पडल्यावर त्याना रियाज करता आलाच नाही असे त्यानी सांगितले कारण तबल्याची दुरुस्ती झाली नव्हती त्याचबरोबर माझ्या अपेक्षेप्रमाणेच मेट्रोनोम पण घेण्यास मुहूर्त लागला नव्हता.

मधल्या काळातील प्रगतीचा असा अहवाल सादर केल्यावर माझ्याकडे आल्यामुळे प्रथेला अनुसरून " वा छान आहे तबला तुमचा " अशी तबला प्रशस्ती करून वही समोर ठेवून त्यानी वाजवण्यास सुरवात केली. त्यांचे ठराविक तालवादन झाल्यावर

त्याना मी आणखी काही नवे ताल लिहून दिले व ते कसे वाजवायचे हे दाखवले. त्यानुसार वहीत पाहून त्यानी ते वाजवले व "आता पुरे करूया का? " असा प्रश्न मला विचारला. त्यांना तबल्याच्या परीक्षेला बसवून पास करून घेण्याची जबाबदारी माझ्यावर नसल्यामुळे मी त्याना मान्यता दिली यावेळी सौ. साधनापण बरोबर आल्यामुळे त्या दोघींच्या गप्पा रंगात आल्या होत्या. त्यामुळे आम्हालाही त्याना साथ द्यावी लागली व सान्यांनीही तबलावादनापेक्षा गप्पाष्टकातच अधिक रस घेतला

पुढील वेळेस मी जरा जास्त उत्साह दाखवून त्याना तीनतालात एक अधिक बोल असणारा तुकडा लिहून दिला. त्यात सुरवातीस "धिना धात्रक " असे बोल होते. आतापर्यंत सरळ सरळ धाधिंधिंधा व तातिंतिंता" याच बोलांची पुनरावृत्ती करणाऱ्या सान्यांनी तो बोल वाजवताना धिना धा पर्यंत आले की त्यांचे घोडे पाण्यात संताजी धनाजी पाहून बुजणाऱ्या मोगली घोड्यासारखे बुजू लागले. धानंतर ताबडतोब त्रक वर जाणे काही केल्या त्याना जमेना. मी हातावर ताल धरत व टाळ्या वाजवत तो बोल पाठ करायला सांगितला व त्यानीही दोन तीनदा प्रयत्न केल्यावर आता तबल्यावर वाजवा म्हटल्यावर परत वहीत बघून त्यानी वाजवायला सुरवात केली. पाठ झाल्यावर वहीत पहाण्याचे काम नाही असे म्हटले तरी वहीकडे त्यांची नजर वळायचीच व तोंडाने बरोबर

म्हटले तरी त्यांची बोटे मात्र त्रक पर्यंत जायला तयार नव्हती, धिनाधा झाल्यावर मध्ये विश्रांती घेतल्याशिवात त्यांची मजल त्रक वर जातच बसे. शेवटी तो नाद सोडून त्यानी "सगळे ताल वाजवून पाहू" म्हणत वहीत बघून सगळे ताल वाजवले व त्यानंतर "आता थांबूया का? असे म्हणून थांबले.

त्यानंतर एक दोन वेळा मी सान्यांच्याकडे गेलो व दोन तीनदा ते आमच्याकडे आले पण त्यानी मेट्रोनोम काही घेतला नाही की त्यांच्या वाजवण्यात काही प्रगती झाली नाही. त्यांच्या शिक्षणात प्रथम मला फोन करून आपल्या येण्याची वर्दी देणे हा पहिला पाठ. त्यानंतर न चुकता आमचे घर गाठणे हा दुसरा पाठ. त्यानंतर मी तबला काढून ठेवला असल्यास " वा तुमचा तबला छान आहे बरका" अशी तबलास्तुती करणे हा तिसरा पाठ. एकदा त्यानी वर्दी देऊनही ते न आल्याने तबला काढण्याची आमची मेहनत वाया गेल्याचे मी त्यांच्या कानावर घातल्यामुळे "मी आल्यावरच तबला काढत जाऊ "असे त्यानीच सुचवल्यामुळे तबलास्तुतीपूर्वी तबला बाहेर काढणे हा तिसरा पाठ व नंतर चौथा तबलास्तुतीचा पाठ. नंतर एकदम त्याना माहीत असलेला व न चुकणारा तीनताल वाजवून दाखवणे हा पाचवा पाठ व मध्येच "धिनाधात्रक वाजवण्याचा प्रयत्न करणे व धावर घोडे अडणे हा सहावा पाठ त्यानंतर माझे त्यावर त्याना टाळया वाजवून म्हणण्याचा आग्रहाचा

सातवा पाठ व त्यावर त्यानी " मी घरात प्रॅक्टीस करतो तेव्हां हे कळत नाही असे कोणी तरी सांगणारे असले तर कळते. म्हणून तुमच्यासमोर बसणे आवश्यक आहे"असे म्हणणे हा आठवा पाठ हे ठरलेले असे. या सर्व पाठानंतर एकदा त्याना त्यांच्या लहानपणापासून येणारे सगळे ताल एकदा वाजवून त्यांचा अध्याय समाप्त होत असे. या सगळयाचा शेवट " आपल्याला काही कोठे तबला वाजवायला जायचे नाही किंवा मेहफिल गाजवायची नाही केवळ तबला आहे म्हणून" हे भरतवाक्यही ठरलेले असते. पण त्यासाठी मला शिक्षा का? हा प्रश्न मी मनात ठेवत असे कारण आमच्या मैत्रीचा शेवट त्यामुळे होऊ नये अशी माझी इच्छा असे.

. या शिक्षणाचा शेवट अचानक मला कल्पनाही नसताना झाला व तोही एकदम दोन कारणे उद्भवल्यामुळे. त्यात एक म्हणजे माझ्या अमेरिकेतील मुलाने त्याच्या मुलाला तबला वाजवण्यास शिकवावयाचे ठरवले व त्याच्यासाठी म्हणून घेतलेला तबला घेऊन जायचे त्याने ठरवले. त्याचा उद्देश मुलाला समोर बसवून स्वत: वाजवून दाखववावयाचे व त्यानेही त्याच्याचसोबत वाजवावयाचे अर्थात त्यासाठी लागणारा दुसरा तबला त्याने इकडून घेऊन जायचे ठरवले व आहे तोच तबला घेऊन जावे व मी येथे सवडीनुसार नवा तबला घ्यावे असे ठरले. त्यानुसार आमचा तबला गेला. आता साने यांच्या घरी जाऊन मला शिकवता आले

असते पण त्याच वेळी माझ्या पुण्यातील मुलाने दुसरा मोठा फ्लॅट घेतला व तो सान्यांच्या घरापासून जरा अधिक अंतरावर होता. अशी दोन कारणे एकदम उद्भवल्यामुळे सान्यांचे तबला शिक्षण जसे सुरू झाले तसेच अचानक बंदही पडले. तबलावादन तर कधीच सुरू झाले नाही त्यामुळे ते बंद पडण्याचा प्रश्नबच नव्हता.

मात्र आता अनायासे सापडलेल्या त्या तबल्याचा ते कसा काय उपयोग करतात हेच पहायचे राहिले होते. तोही योग लवकरच आला.

आम्ही जागा बदलली हे कारण झाले आणि परस्पर संबंध न बिघडता माझी त्या शिकवणी शिक्षेतून (शिक्षणास हिंदी भाषेत शिक्षा का म्हणतात ते कळले) सुटका झाली. पुढे कधीही सान्यांकडे गेल्यावर मी भीत भीत तबल्याचा विषय काढला की "नाही हो आता जमतच नाही,? असा खेदपूर्वक उदगार ते काढत आणि पुढे ‘‘तो काय अनायासे घरात सापडला आणि उगीचच पडून राहून वाया चालला होता म्हणून वाटत होतं वाजवावे " असा शेवटही करत. तसे मला आता भीत भीत विचारण्याचे कारण नव्हते कारण आता साने तबला वाजवण्याचे नाव काढतील अशी शक्यता नव्हती पण मी तबला या विषयाला (तबल्याला नव्हे) उगीचच हात घालून सान्यांच्या नाजुक भावना दुखावतो असा

साधनाचा (गैर)समज! पण तरीही मी त्यांच्या नकारामुळे अधिकच प्रोत्साहित होऊन त्यांना, " हे काही बरोबर नाही इतका सराव केलाय तसे मधून मधून वाजवत जा" असा निरर्थक सल्ला देण्याचा प्रयत्न करत असे पण साधना मात्र त्यावर "आता कसले वाजवतात ते, तू भेटलास म्हणून इतका तरी त्या तबल्याला उजेड दिसला " असे बोलून त्यांचा खऱ्याखऱ्या भावना व्यक्त करत असे. सान्यांनी तबला शिकायला सुरवात केली व नंतर आता त्यांच्या शिक्षणावर पडदाही पडला हे जाणणाऱ्या माझ्या काही संगीतप्रेमी मित्रानी मधून मधून त्यानी तबला कोणालातरी विकावा अशी आडून आडून सूचनाही केली आणि साधनाताईनी त्याला दुजोराही दिला त्यावर मात्र एकदम उसळून सान्यांनी एकदम "तसं काही समजू नकोस बर का एकादेवेळ मला पुन्हा तबला वाजवावा वाटला तर मी काय परत विकत घेऊ? " असा तिला दम दिला. खरं तर आता या दोन्ही गोष्टीत म्हणजे त्यांना तबला वाजवावा वाटणे (आणि त्याहीपेक्षा त्यानी तो विकत घेणे) काहीच दम नव्हता हे आम्हा सगळयांनाच कळले होते त्यामुळे सान्यांचा तबला हा असा सगळयांच्या दृष्टीने एक विनोदाचा विषय झाला होता,

पण एका दिवशी या विनोदी विषयाचा कायमचा निकाल लावून टाकण्याचा विचार सान्यांनीच केलेला दिसला कारण त्यांच्याकडे गेल्यावर सर्वसाधारण गप्पा झाल्यावर त्यांनी एकदम

"अहो तुमच्या ओळखीत कुणाला तबला हवा आहे का?" असे विचारले।आणि मी काही उत्तर देण्यापूर्वीच "आता हा तबला विकूनच टाकावा म्हणतो " असा आपला मनोदयही व्यक्त केला. त्यांचा तो विचार योग्यच आहे असे मलाही वाटत होते. पण त्याचबरोबर तबल्याला गिऱ्हाईक शोधणे हा माझ्या अखत्यारीतला विषय नव्हता हेही माहीत होते, तरी "ठीक आहे, विचारुन बघतो " असे नेहमीच्या पठडीतले उत्तर दिले. या उत्तराचा अर्थ ज्याला हवा तसा घेता येतो, तसा सान्यांनी त्यांना हवा तसा म्हणजे होकारार्थी घेतला तर मी त्याचा अर्थ मला हवा तसा घेऊन स्वस्थ बसलो. पण पुन्हा त्यांची गाठ पडल्यावर हा विषय निघाला की मला उत्तर देणे अवघड जाऊ लागले. तबला विकण्याची सूचना देणारे मित्र आता एकदम चुप झाले होते कारण नुसता सल्ला देणे वेगळे आणि प्रत्यक्ष अश्या अवघड व्यापारात भाग घेणे वेगळे त्यामुळे मी त्याबाबतीत तद्न्य व्यक्तीला म्हणजे अर्थातच सौ. ला पुढे करून माझे काम हलके म्हणजे जवळ जवळ नाहीसेच केले आणि ती जणू तिचीच जबाबदारी झाली आणि तिच्या शोधक नजरेने ज्यांची नातवंडे तबला शिकण्याचा प्रयत्न करत आहेत अश्या काही आज्या किंवा अश्या मुलांचे आईबाप यांच्याकडे वळली।

योगायोगाने आमच्याच सोसायटीत असे काही लोक तिला आढळले आणि लगेच तिने त्यांच्याशी बोलणीही सुरु केली. पण पुणेरी आईबाप आपल्या मुलाला तबला शिकवण्यास पाठवत असले तरी त्याला तबला येईल अशी खात्री पटेपर्यंत तबला विकत घेण्यासाठी काही हजार किंवा सान्यांचा जुना असल्यामुळे काहीशे रुपये खर्च करण्यास तयार नसल्याचे तिला आढळून आले. खुद्द सान्यांच्याच घरात तबला असून नातवंडे त्याला हात लावू इच्छित नव्हती. (आमच्याकडेही तरी काय तसेच)त्यामुळे तबला विकला जाणे ही गोष्ट तशी अशक्य कोटीतील नसली तरी अवघडच होती. एवढेच की हे सान्यांच्या कानावर घालून त्यांच्या तबल्याच्या विक्रीत माझा सक्रीय सहभाग आहे हे मात्र मी ताबडतोब सिद्ध केले. त्यासाठी आंतरजालावर किंवा पेपरमध्ये जाहिरात द्यावी असेही सुचवून पाहिले. पण आंतरजालाविषयी सान्याना मुळीच आपुलकी नव्हती तर न खपणाऱ्या तबल्यासाठी जाहिरातीचा उपद्व्याप व खर्च करण्याची त्यांची इच्छा नव्हती. आणि त्यांच्या तबल्यावरील धूळ पुसून साधनाताई मात्र टेकीस येत होती. शेवटी एक दिवस तिच्या तक्रारीला कंटाळूनच की काय कोण जाणे पण साने मला म्हणाले, " तबला तसाच कोणी नेत असेल तरी हरकत नाही, पहा बर कुणाला हवा आहे का? "

या त्यांच्या आवाहनाला मात्र काही तबला शिकाऊ बालकांचे पालक प्रतिसाद देण्याची शक्यता आमच्या खरेदी विक्री तद्न्य सौ. ने तत्काळ व्यक्त केली आणि असे काही पालक असल्याची बातमी मी श्री, साने यांना सांगितली तेव्हां मात्र त्यांनी "मग त्याना ताबडतोब तबला घेऊन जायला सांगा" असे मला सांगितले, बहुधा तबल्यावरील धूळ साफ करण्याची जबाबदारी आता साधनाताईनी त्यांच्यावर सोपवली असावी.

तबला शिकाऊ बालके आमच्या परिचयाच्या दोन घरात होती त्या दोन्ही पालकांना साने यांची ही ऑफर आमच्या सौ, ने देऊन "तबला थोड़ाफार दुरुस्त करून घ्यावा लागेल" ही पूर्वकल्पनाही दिली, त्याचबरोबर सान्यांना फोन करून येऊ शकणाऱ्या त्यांच्या तबलासंकट विमोचकांची माहिती देऊन ठेवली त्यांनीही फोन करून जावे यासाठी श्री, साने यांचा फोन नंबर त्यानाही दिला, आमच्याच इमारतीत वरच्या मजल्यावरील देशपांडे यांनीच पहिला नंबर लावला सुदैवाने त्यांनी फोन केला व साने घरातच होते. त्यांची मुलाखत होऊन लगेच देशपांडे पति पत्नी त्यांचा तबला घेऊन आले व दुरुस्त करून त्यांचा मुलगा प्रॅक्टीस करूही लागला व आमच्या मध्यस्थीने दोन कुटुंबांची गरज भागली याचा आनंदही आम्हाला मिळाला, आता तबला प्रकरणाचा शेवट

झाला अश्या समाधानात आम्ही विशेषत: मी होतो पण तसे होणार नव्हते.

मी जरी सान्यांच्या घरापासून ज़रा अधिक दूर राहायला लागलो असलो तरी मधून मधून सदिच्छाभेटी होतच असत तसा एक दिवशी साधनाचा फोन आला व आम्हाला घरी येण्याचे तिने निमंत्रण दिले पण आम्हाला शक्य नसल्यामुळे त्यांनीच यावे असे फोनवरून मी सुचवले. तसे त्यांनी मान्य केले व संध्याकाळी दोघेही आले. गप्पा खाणेपिणे झाले. निघायच्या सुमारास साने विचारते झाले "ते देशपांडे तुमच्याच बिल्डिंगमध्ये राहतात ना? " "हो, का?" मी विचारले तबलाध्याय आता पुरा झालाय अश्या समजुतीत मी असल्यामुळे मला या चौकशीचे कारण कळेना. "काही नाही त्यादिवशी तबला न्यायला आले तेव्हां मी फारसा बोललो नाही आणि मुलगा प्रॅक्टीस करायला लागला का, तबला कसा काय वाटला अशी सहज चौकशी करायची होती "साने उत्तरले. त्यांच्या या विचारपूस करण्यामागील भावना मी समजू शकत होतो त्यामुळे मी त्यांना ताबडतोब देशपांडे यांच्याकडे नेण्याची तयारी दाखवली पण सौ. च्या नेहमीच्या जागरुकतेनुसार तिने देशपांडे यांच्याकडे फोन लावला व देशपांड्यांची सून तिच्या मुलाला घेऊन तबल्याच्या क्लासलाच निघाली होती असे कळल्यावर जरी साने यांनी पांच मिनिटांत भेटून घेऊ म्हटले व तशी

सुनेने थांबण्याची तयारी दाखवली तरी इतक्या घाईघाईने जाण्याची आवश्यकता नाही असे साधनाचे मत पडले व श्री. साने यांनाही ते पटल्यासारखे दिसले. त्यामुळे आम्ही त्यांना सोडायला बाहर पडलो बाहेर पडल्यावरही "देशपांडे यांचा मुलगा तबला वाजवतो ना? त्यांना तबला आवडला ना? "अशी चौकशी साने करतच होते. त्यामागील हेतु मात्र माझ्या लक्षात येईना पण मग, "हो हो त्या मुलाचे आजोबा मला दररोज भेटतात व तुमचा तबला मिळाल्यामुळे त्यांच्या नातवाला दररोज प्रॅक्टीस करता यायला लागल्यामुळे ते खूष आहेत "असे सांगून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. त्यावर "हो पण त्यांचा नंतर काही फोन आला नाही" अशी प्रतिक्रिया त्यांनी त्यांनी व्यक्त केली त्यावरून आपण तबला काहीही न घेता म्हणजे अगदी फुकट देण्याचे औदार्य दाखवले पण त्याबद्दल पुरेशी कौतुकाची पावती आपल्याला मिळाली नाही अशी नाराजीची भावना त्यातून व्यक्त झाल्यासारखे वाटले. अर्थात त्याबद्दल मी त्यांचे जरी कितीही कौतुक केले तरी त्यामुळे त्यांचे समाधान होणार नव्हते. पण तरीही त्यामुळे तबलाप्रकरण फाइल पुन्हा उघडावी लागेल अशी मात्र मला मुळीच शंका आली नाही.

पण थोड्याच दिवसात सकाळी कधी नव्हे तो सान्यांचा फोन मला आला, तबला शिक्षण बंद झाल्यावर त्यांचा फोन मला येत नसे आणि त्यापूर्वीही तबलाविषयक असेल तरच त्यांचा येत असे

एरवी साधनाच कधी येणार असेल व काही निमंत्रण द्यायचे असेल तर फोन करत असे, त्यामुळे त्यांचा फोन आला म्हणून मला आश्चर्य वाटलेच पण त्याहीपेक्षा आश्चर्य वाटले ते त्यांचे फोनवरील उदगार ऐकून कारण ते म्हणाले, "अहो देशपांड्यांनी तबला परत केलाच नाही" आता या प्रकरणातून मला अंग काढून घ्यायचे होते (आणि तसा बऱ्यापैकी मी निसटलोही होतो) पण तरी माझ्या स्वभावानुसार

"अहो पण तुम्ही त्यांना तो त्यांच्या मुलांसाठी कायमचा दिला होता ना?" असे विचारल्यावर ते म्हणाले,

"तसं काही नाही नाही. त्यादिवशी ते आले त्यावेळी मला न विचारताच हिनं देऊन टाकला आणि थोड्या दिवसांसाठी नेतो असे ते म्हणाले होते, असं मला वाटत होतं"

"पण आता तुम्हाला कशाला पाहिजे? " यावर सान्यांचे उत्तर ऐकून मी आश्चर्याने बेशुद्धच पडण्याच्या बेतात होतो. कारण ते म्हणाले, "मी ज़रा पुन्हा प्रैक्टिस करावी म्हणतोय"

त्याना मी काहीही सांगण्याच्या मनस्थितीत नव्हतो कारण या सगळ्या प्रकरणात माझी भूमिका काय होती हे माझे मलाच कळेनासे झाले, फक्त मी त्याना एवढेच सांगितले "मी तुम्हाला देशपांडे यांचा फोन नंबर देतो तुम्हीच काय ते बोला. "

त्यानंतर मी साधनाला फोन करून विचारले "देशपांडे यांना तुम्ही तबला परत करण्याच्या बोलीवर दिला होता का? "

"नाही" तिने उत्तर दिले व पुढे तीच म्हणाली "का कश्यासाठी विचारतोस? " त्यावर मी तिला तिच्या यजमानांचा फोन आला होता व ते पुन्हा प्रॅक्टीस सुरु करताहेत असे सांगितले त्यावर तिने,

"त्यांच्याकडे काही लक्ष देऊ नकोस. ते काही प्रॅक्टीस वगैरे करणार नाहीत. देशपांडे याना तबला परत करायचे कारण नाही" असे सांगितल्यावर मी निश्चिन्त झालो.

पण त्यानंतर काही दिवसानी साने यांचा पुन्हा फोन आला. साने यांचा फोन म्हटल्यावर मला उगाचच चिंता वाटू लागली. पण सहज भेटायला दोघेही येतो म्हटल्यावर आम्ही त्यांच्या स्वागताची तयारी करून वाट पहात बसलो आणि मग नियोजित वेळी ते आलेही नेहमीसारख्या गप्पा वगैरे झाल्या आणि ते जायला उठले आणि निघता निघता अचानक आठवण झाल्यासारखे म्हणाले, "ते देशपांडे कोणत्या बिल्डिंगमध्ये आहेत?" साने आता वयोमानपरत्वे काही गोष्टी विसरु लागले होते. पहिल्या तबलावादन पाठासाठी ते आमच्या पूर्वीच्या घरात भलत्याच बिल्डिंगमध्ये घुसले होते तसेच आताही देशपांडे आमच्याच इमारतीच्या वरच्या मजल्यावरच राहतात हे ते विसरले होते, मी त्यांना देशपांडे आमच्याच इमारतीत

राहतात या गोष्टीची आठवण करून दिली व त्याचबरोबर ते गावाला गेले आहेत हेही सांगितले. त्यावर

"तरीच मी फोन केला तरी कोणी उचलत नव्हते " असे त्यांनी सांगितल्यावर आम्हा दोघांनाही (साधनाचे काही माहीत नाही) आश्चर्य वाटले व मी त्यांना विचारले "आता फोन कश्यासाठी? "

"अहो त्यांनी तबला परत आणून दिला नाही म्हणून त्यांना आठवण करून द्यायची होती "

"पण तबला तर तुम्ही त्याना कायमचा दिला, त्यांनी तो दुरुस्तही करून घेतला असे साधना सांगत होती" असे मी त्याना ऐकवल्यावर त्यांनी तिच्याकडे वळून " असे तू सांगितलेस? कमाल आहे मला वाजवायला पाहिजे हे तुला माहीत आहे ना? " असे अगदी उच्च स्वरात विचारले. नेहमी (इतर सर्व नवऱ्यांप्रमाणे) साधनाच्या अगदी अर्ध्या वचनात असणारे साने एवढा आवाज चढवून बोलताना आम्ही प्रथमच पहात असल्यामुळे त्यावर काय प्रतिक्रिया व्यक्त करावी हे आम्हाला समजेना. पण साधनालाही त्यांच्यात काहीतरी मानसिक बदल झाल्याचे जाणवले आणि नेहमीप्रमाणे त्यांना न दटावता आवाज आणखीच मृदु करून "अहो पण तो सांगतोयना की ते गावाला गेलेत म्हणून "असे म्हणून निघण्याची तयारी दाखवली व निघता निघता, "ते आता काही तबला वाजवणार नाहीत " असे मला सांगू लागली.

त्यांना रस्त्यापर्यंत सोडण्यासाठी आम्ही दोघेही बाहेर पडलो तेव्हांही आपण पुन्हा तबला वाजवणार आणि कोणते ताल कसे वाजवणार हेही साने मला सांगू लागले इतका तबल्यात त्याना रस उत्पन्न झालेला मी प्रथमच पहात होतो. रस्त्यावर त्याना सोडतानाही त्यांनी पुन्हा पुन्हा देशपांडे यांना आठवण करून देण्याविषयी बजावले व मी त्यांच्या समाधानासाठी त्यांना पुन्हा पुन्हा होकार देत गेलो. त्याना सोडून परत येताना सौ. मला म्हणाली "साने बहुधा तबला घेऊनच जाणार त्याशिवाय त्याना चैन पडणार नाही." मी आचंबितच झालो कारण ती पुढे म्हणाली, "त्याना तबला वाजवण्यासाठी नकोच आहे पण त्यांच्या मनात आपला तबला देशपांडे आपल्या मनाविरुद्ध घेऊन गेले ही भावना घर करून बसली आहे " सौ. ने मानसशास्त्राचा चांगलाच अभ्यास केलेला दिसला.

"मग आता काय? " मी हताश होऊन विचारले,

"आता काय देशपांडे यांना तो परत करावा लागेल " तिने शांतपणे उत्तर दिले.

तेवढ्यात साधनाचाच फोन आला "कालचे त्यांचे बोलणे मनावर घेऊ नकोस. तबला देशपांडे याना आम्ही दिलेलाच आहे. आता तो परत कसा मागणार? "

मी सौ. ला विजयी मुद्रेने हे सांगितले तरी तिने आपला अंदाजच बरोबर आहे आणि साने तबला घेऊन गेल्याशिवाय राहणार नाहीत असे सांगितले।

"मग तबला परत करायला देशपांडे यांना कोण सांगणार?" मी विचारले कारण या प्रकरणात आम्ही दोघे निष्कारणच अडकलो होतो सान्यांचा तबला परत करायला देशपांडे यांना सांगणे मलाही योग्य वाटत नव्हते.

एक दोनच दिवसांनी सान्यांचा फोन आलाच. यावेळी त्यांचा सूरही ज़रा वरच्या पट्टीतला होता.

"कायहो तुम्ही देशपांडे यांचा फोन नंबर दिलेला बरोबर आहे ना?"

" हो. का? " मी विचारले

" नाही ते फोन उचलत नाहीत. " मी देशपांडे यांचा फोन नंबर पुन्हा डायरीत पाहून त्यांना वाचून दाखवला. आता साने भलतेच दक्ष झालेले दिसले. कारण मी पाहून नंबर वाचून दाखवल्यावर ते म्हणाले,

"अहो यात तर आठच आकड़े आहेत. "

"मग किती हवेत?" मी ज़रा चिडूनच विचारले. देशपांडे किंवा आम्ही सान्यांचा तबला चोरला असावा व त्या प्रकरणाचा पोलीस

तपास चालू आहे असे स्वरूप आता या सर्व प्रकरणास येऊ लागल्यासारखे वाटू लागले.

"दहा आकड़े हवेत ना?" साने आपली चिकाटी न सोडता फोनवर बोलले.

" ते मोबाइल फोननंबरसाठी, हा लैंड लाइन आहे " मी माझा आवाज खालच्या पातळीत ठेवण्याचा प्रयत्न करत म्हटले. तबल्याच्या विरहामुळे सान्यांचे मनोस्वास्थ्य फारच ढासळल्याचे दिसत होते.

" मग काय झाले यातही दहा आंकड़े हवेतच की " शेवटी त्याना समजावण्यासाठी मी त्याना म्हणालो,

"असे काय करता? आता माझ्याशी तुम्ही लैंड लाइनवर बोलत आहात तर माझ्या या क्रमांकात किती आंकड़े आहेत मोजा बर "त्रितालच्या मात्रा त्याना मोजायला सांगावे तश्या आविर्भावात मी त्याना सांगितल्यावर त्यांनी खरोखरच फोन नंबरमध्ये आठच आकड़े आहेत व पुण्यातील लैंड लाइनवर फोन करताना तेवढेच वापरावे लागतात हे मान्य केले. त्यानंतर लगेचच त्यांनी तो क्रमांक लावला पण सुदैवाने (किंवा साने यांच्या दुर्दैवाने) देशपांडे घरात नव्हतेच, त्यांच्याकडे आलेल्या वृद्ध पाहुण्या बाईंनी फोन उचलला

व ते घरात नाहीत हे सांगितले व ही गोष्ट ताबडतोब साने यांनी फोनमधून माझ्या कानावर घातली.

आता हे प्रकरण फारच पेटणार असे वाटून मी साधनाला फोन केला. यावेळी तिचा सूर जरा वेगळाच भासला. त्यात चिंतेची झाक दिसत होती. आत्तापर्यंत तिने मला समजावण्याचा प्रयत्न केला होता व तबला परत करायचे कारण नाही असे ती सांगत होती, पण बालमानसशास्त्राइतकीच वृद्ध मानसशास्त्रातही तद्न्य सौ. ने मी कोणाबरोबर बोलत आहे हे ताड़ून फोनचा ताबा घेतला,

"हे पहा साधनाताई, तुम्ही देशपांडे यांना स्पष्ट सांगा की साने आता तबला मिळाल्याशिवाय चैन पडू देणार नाहीत. आणि तो तबला त्याना परत द्यायला सांगा. फार तर त्यासाठी त्यांनी जो काही खर्च केला तोही द्यायची तयारी दाखवा. नाहीतर देशपांडे आणि तुमची या प्रकरणातून सुटका नाही."

"बहुधा तसंच कराव लागेल असं दिसतेय, कारण ते कालपासून माझ्याशी बोलायलाही तयार नाहीत" साधना

चार पांच दिवसांनी साधनाचा फोन सौ. ला आला व देशपांडे यांनी तबला परत केला असे आम्हाला कळले. साने यांनी तबला वाजवायला सुरवात केली की नाही हे समजले नाही फक्त माझी तबला शिकवण्याच्या संकटातून मात्र मुक्तता झाली होती.

# ८. तिची दिव्य दृष्टी

वस्तु हरवणे हीच खरे तर एक कला आहे असे मला वाटते, म्हणजे त्याच एकमेव गोष्टीत मी प्रवीण असल्यामुळे माझा असा समज असेल. अगदी लहानपणी झोपताना आज आपली कोठली गोष्ट सापडत नाही याचा आढावा घेऊन उगीचच स्वत:च्या झोपेचे खोबरे करण्याची मला संवय होती. कारण असे आठवू लागल्यावर हमखास एकादी तरी गोष्ट हरवल्याचा शोध मला लागत असे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्या हरवलेल्या गोष्टीचा शोध घेण्याचे माझे काम सुरू होत असे आणि त्यामुळे मी "अनंताचा शोध" करणाऱ्या संतांच्या थाटात शोधण्याचे काम करत असे, घरातील इतर लोकांचे लक्ष्य आपल्याकडे जाऊन त्यांनी मग आपल्या शोधकार्यात मदत करावी अशी अंतर्यामी इच्छा असे पण आपली वस्तू हरवली आहे हे जाहीर करण्याची मात्र लाज वाटत असे. शेवटी कोणाला तरी माझ्या शोधकार्याची कुणकुण लागत असे आणि मग सगळे घरदार त्या शोधण्यामागे लागले की मग मी आरामात बसत असे कारण आता वस्तू सापडणार याची निश्चिती झालेली असे.

लहानपणी आपण शोधत आहोत ही गोष्ट इतरांना कळावी असे मला वाटे पण आता मात्र मी काही शोधू लागलो की बायकोला पत्ता लागू नये असे मला वाटत असते याचे कारण मी ती वस्तू सापडत नाही म्हटल्यावर ती कदाचित माझ्याच खिशातून किंवा टेबलावरून उचलून “ही काय इथेच तर आहे “ असे प्रत्यक्ष पण मनातल्या मनात “ किती हो बावळट तुम्ही अगदी समोरची वस्तूही दिसत नाही “ असे म्हणताना मला दिसते म्हणून मी माझा शोध गुप्तपणे घेत असतो पण तिला मी काय शोधतो आहे याचाही कसा काय पत्ता लागतो कळत नाही आणि मग “ हेच शोधताय ना? ”म्हणून अलगद ती वस्तू काढून ती माझ्या हातात ठेवते आणि माझा पुरता मामा करते. आणि मग वस्तू सापडण्याच्या आनंदापेक्षा आपण पकडले गेलो याचेच दु:ख मला अधिक होते.

मात्र कधी तरी गुप्तपणे शोध घेण्याचा माझा प्रयत्न यशस्वी होतो म्हणजे मी शोध घेत आहे ही गोष्ट तिच्या लक्षात येऊ न देण्याबाबतीत मी यशस्वी ठरतो पण अर्थातच वस्तू सापडण्याबाबतीत मात्र मी नेहमीप्रमाणेच अयशस्वी ठरतो मग नाइलाजाने मला माझा पराभव जाहीर करून सूत्रे तिच्या हातात सोपवावीच लागतात.

तिचा एक नेहमीचा सिद्धान्त आहे जो मी कधीच खोटा ठरवत नाही. त्यानुसार हरवलेली वस्तु तिच्या नेहमीच्याच जागेवर असते पण ती नीट शोधावयाला हवी. उदा: पॅन कार्ड अगदी आवश्यक असेल तेव्हां सापडत नाही आणि ते ठेवण्याची जागा माझ्याच ड्रॉवरमध्ये असते व मी पूर्ण ड्रॉवर शोधलेला असतो आणि मला सापडलेले नसते आणि त्यामुळे मी तिला शरण गेलेला असतो. मग तिने "ड्रॉवरमध्ये नीट शोधले का? " असे मला विचारल्यावर अर्थातच शोधण्याच्या श्रमाने अगोदरच बेजार झाल्यावर तिने असा प्रश्न विचारावा याचा राग येऊन, " मग तुला काय वाटते? " असा उलट सवाल करतो. अर्थात त्यावर अधिक चर्चा न करता ती मला बाजूस सारून ड्रॉवर उघडून त्यातील एक एक कागद सुट्टा करून बाजूस ठेवत जाते आणि मी मात्र "आत्ताच तर आपण शोधले त्यात आता ही काय उजेड पाडणार अश्या आविर्भावात बाजूस उभा रहातो आणि आश्चर्य म्हणजे खरोखरच तिचा उजेड पडून दोन कागदांच्या मध्ये अडकलेले पॅन कार्ड तिला बरोब्बर सापडते आणि मग ते माझ्यापुढे नाचवत ती म्हणते, "हे काय इथेच तर आहे"आणि मी मात्र आपण इतके शोधूनही आपल्याला कसे सापडले नाही हा विचार करत बसतो.

तिची ही दृष्टी अलीकडे जरा कमी सूक्ष्म झाली असे वाटू लागले. म्हणजे तिच्या दृष्टीने झालेल्या माझ्या चुका काढणे कमी

झाले अश्यातला भाग नाही पण कधीतरी जेवणानंतर बडीशेपेचा बोकणा भरताना माझ्या चिमटीतून (माझ्यामते) चुकून निसटून फरशीवर पडलेले दोन दाणेही ज्या दृष्टीतून निसटत नसत, किंवा तिला मदत करण्याच्या उच्च हेतूने चहाचा कप विसळून ठेवण्याचा प्रयत्न मी केला तर तिचा त्रास वाचवण्याच्या माझ्या उच्च हेतूकडे लक्ष न देता त्या कपाच्या तळाशी राहिलेला चहाचा सूक्ष्म डाग मात्र माझ्या निदर्शनास आणून देण्यास जी चुकत नसे. (अश्या वेळी मला त्या हरवलेल्या मुलाला शोधून देऊन मोठ्या उत्सुकतेने त्याची आई आपली कशी प्रशंसा करील याची वाट पहाणाऱ्या वेड्या माण्साची आठवण होते कारण ती हुशार आई त्या माणसाला प्रश्न विचारते, ''पण याची टोपी कुठे आहे?) किंवा सकाळी दात घासण्यासाठी मी वापरत असलेल्या डाबर लाल दंतमंजनाचा डाग शर्टाच्या पुढच्या भागावर पडलेला जी तत्परतेने मला दाखवत असे तीच अलीकडे माझ्या हातून होणाऱ्या अनेक गफलतींकडे दुर्लक्ष करू लागली होती आणि हे तिच्या दोषदिग्दर्शन तत्परतेत बसत नव्हते त्यामुळे असा संशय मला येऊ लागला होता.

अलीकडे तर तिच्या हातूनच तांदळाचा डबा सांडणे वगैरे माझ्यासाठी राखीव अपघात होऊ लागले. एक दिवस तर तिच्या हातातून पापडाचा डबा निसटला व त्यानंतर तिचा एक डोळा

उघडेनासा झाला अर्थात पापड डबा अपघात हे कारण त्यामागे नसावे असे तिला ही वाटत होते पण ते तात्कालिक कारण असल्याने त्या डब्यातीलच काही प्रक्षोभक द्रव्य डोळयात गेले असावे असा अंदाज बांधावा लागला पण त्यानंतर डोळा उघड मिट करू लागल्यामुळे तो तात्पुरताच परिणाम असावा असे वाटले. पण त्यानंतर शब्दकोडे सोडवायला तिला त्रास होऊ लागला म्हणजे थोडे पर्याय आटोपले की तिच्या डॉळयातून पाणी वाहू लागे व थोडी विश्रांती घ्यावी लागे.

यावर उपाय अर्थातच डॉळयाच्या डॉक्टरकडे जाणे हा होता. थोड्याच दिवसापूर्वी मलाही एका डोळयाचा त्रास जाणवू लागला होता म्हणजे मोतिबिंदूची शस्त्रक्रिया झाल्यावर सुद्धा पुन्हा एका डोळयाने अंधुक दिसते असे जाणवू लागले होते व त्यासाठी मी औरंगाबादला जाऊन नेहमीच्या नेत्रतज्ञाकडे जाऊन दाखवले असता त्याने लेसरच्या सहाय्याने त्या डोळयाचे भिंग साफ करावे लागेल असे सांगितले होते व त्याप्रकारची सामग्री त्याच्याकडे नसल्यामुळे दुसऱ्या नेत्रालयाकडे जाण्याचा सल्ला दिला होता व तेथे माझ्या भिंगाची सफाई मी करून घेतली होती यावेळीही आम्ही दोघेही त्याच नेत्र रुग्णालयात गेलो व त्यानी बऱ्याच तपासण्या करून काचबिंदूचे निदान केले.

काचबिंदूची शस्त्रक्रिया करण्याविषयी अर्थातच आमचे डॉक्टर बंधू व त्याची पत्नी यांच्याशी चर्चा झाली व त्याच वेळी त्यांची एक सहकारी औरंगाबादमध्येच असल्यामुळे तिच्याकडे जाऊन यावे असे ठरले. ती सहकारीही आमची परिचितच असल्यामुळे तिने ताबडतोबच सौ. च्या डोळ्याचे निरीक्षण करून तुमच्या एका डोळ्याची पापणीच आत गेली आहे आणि ती घासल्यामुळे तुम्हाला हा त्रास होत आहे असे म्हणून डोळ्यात एक औषधी थेंब टाकून थोडा वेळ जाऊ देऊन तिच्याजवळील उपकरणाने ती पापणी ओढून सरळ केल्यावर एकदम तिला होणार त्रास बंद झाला. काचबिंदूची शस्त्रक्रिया पुण्यासच करून घेण्याचे आम्ही ठरवले आणि पुण्यात माझी मोतिबिंदूची शस्त्रक्रिया जेथे केली त्या लेसर क्लिनिकमध्ये ती करावी असे ठरले. क्लिनिकच्या प्रमुख शल्यवैद्यास फोन केल्यावर त्यांनी काचबिंदू करण्याऐवजी मोतिबिंदूचीच शस्त्रक्रिया करून घ्या कारण काचनिंदूची शस्त्रक्रिया केल्यावर देखील पुन्हा मोतिबिंदू वाढू शकतो व पुन्हा ती शस्त्रक्रिया करावीच लागेल असे म्हटल्यावर आम्हाला फारसा विचार करण्याचे कारणच उरले नाही शिवाय पापणीचा होणार त्रास गेल्यामुळे सध्या कोणतीच शस्त्रक्रिया करणे आवश्यक नव्हते तरीही पुढेमागे करायचीच आहे तर आत्ताच करून घ्यावी असा विचार केला.

आता मोठा मुलगाही बरोबरच असल्यामुळे शस्त्रक्रियेसाठी हवी ती मदत घरी उपलब्ध होती. शस्त्रक्रियेनंतर गॅसजवळ न जाण्याचे पथ्य पाळणे सूनबाई घरात असल्यामुळे अशक्य नव्हते नाहीतर माझ्या अतिप्राचीन पाककौशल्यास उजाळा देऊन माझ्या विचित्र पाककृतींबरोबर सौ. च्या तिखट शब्दांचा घासहो गिळावा लागला असता. शस्त्रक्रियेचा निर्णय घेऊन फारसा विचार न करता शस्त्रक्रिया आणि त्याही दोन्ही डोळयांच्या पार पडल्या. मी माझ्याकडून शस्त्रक्रियेनंतर डोळयात घालण्याच्या औषधांचे वेळापत्रक करण्याचे व नंतर तिच्या डोळयात ते घालण्याचे काम माझ्या शिरावर घेतले पण त्यातही मी केलेल्या चुका आता तिच्या सुधारलेल्या दृष्टीमुळे अधिक तत्परतेने तिने माझ्या निदर्शनास आणल्या एवढेच काय त्या वेळापत्रकानुसार औषधही तीच घालू लागली. आता तिच्या सुधारलेल्या दिव्य दृष्टिपुढे माझी कुठलीच चूक लपवणे ही गोष्ट माझ्या कुवतीच्या बाहेरचे असणार हे उघडच आहे.

# ९. किस्सा कुर्सीका!

***(यावेळी माझ्या मदतीस माझी बहीण होती)***

आरामखुर्ची हा प्रकार बहुतेक कालबाह्य झाला आहे. कदाचित आराम करायला कुणाला वेळच नाही हे असेल किंवा खुर्ची उत्पादकांच्या मते हल्ली तयार होणाऱ्या सगळ्याच खुर्च्या आरामदायी असतात. आमच्या लहानपणी पण आरामखुर्च्यांचे फार वेगवेगळे प्रकार उपलब्ध होते अशातला भाग नाही. एकच सर्वमान्य प्रकार होता आणि तोच बहुतेक बऱ्याच घरात पहायला मिळे. या खुर्चीला जागा बरीच लागत असे. तिचा सांगाडा दोन लाकडी चौकटी गुणाकाराच्या चिन्हाप्रमाणे एकमेकात अडकवून तयार होत असे. त्यातील एक चौकट बरीच मोठी असे. तिच्या दोन बाजूना आडव्या फटी असत. त्यातून ज्यावर बसायचे ते कापड घालून दोन बाजूना दोन दंडगोलाकृती दांडे अडकवण्यासाठी त्या कापडाला शिवणी मारलेल्या असत ही खुर्ची इतकी आरामदायक असे की एकदा बसणारा बऱ्याच प्रयत्नानेच उठू शके. त्याचबरोबर एकीकडचा दांडा काढून कापड पडू दिले नाही तर बसणाऱ्यास त्याची कल्पना नसल्यामुळे तो ऐटीत बसायला जाऊन भुइसपाट

होत असे. आम्ही या तिच्या गुणधर्माचा आपापसातील सूड उगवण्यासाठी किंवा वेळीअवेळी घरी येऊन कठीण मराठी (कारण इंग्रजीचे भूत त्यावेळी पालकांच्या मानगुटीवर बसले नव्हते) शब्दार्थ, किंवा पाढ्यातील एकोणतीस सत्ते किंवा पावकी दीडकी (आताच्या पिढीला ही नावे तरी माहीत आहेत की नाही कुणास ठाऊक) सवायकी असले क्लिष्ट प्रश्न विचारून आम्हाला छळणाऱ्या पाहुण्याना पाडण्यासाठी करत असू.

त्यावेळी मला नुकतीच नोकरी लागली होती आणि वडील सेवानिवृत्त झाल्यामुळे मीच कुटुंबप्रमुख झालो होतो. पहिल्या पगारात आईसाठी साडी घ्यावयाचे मी ठरवले अर्थात वडिलांसाठी धोतरजोडी खरेदी करणेच योग्य ठरले असते. पण त्यावेळी त्यांची वापरातील धोतरजोडी पुरेशी फाटली नाही असा त्यांचा दावा होता. आणि एक वस्तु वापरात असताना दुसरी पर्यायी म्हणूनसुद्धा आणण्याचा प्रघात (आणि मुख्यत्वे ऐपत)त्यावेळी नव्हता. साध्या चप्पलजोडीचा विचार केला तर वापरातील जोडी झिजल्यावर प्रथम तळाला जोड लावले जायचे, नंतर मग बहुतेक अंगठ्याची पाळी असायची. अशा प्रकारे प्रत्येक चपलेचे सगळे अवयव जमतील तितक्या वेळा बदलल्यावरच दुसरा जोड घेतला जायचा (म्हणजे सुश्री जयललितांच्या चप्पलजोड्या आमच्या गावातील सगळ्या स्त्रियानी चप्पल वापरण्याचे ठरवले असते तर त्याना

जन्मभर पुरल्या असत्या.)आणि ही केवळ आमच्यासारख्या त्या काळातील मध्यमवर्गीय (म्ह. आजच्या कनिष्ठ मध्यम वर्गीय पक्षी दरिद्री)लोकांचीच पद्धत होती असे काही नव्हते. आमच्या संस्थानचे एक राजपुत्रसुद्धा अगोदर हाफ पँटच घालायचे पण तिलाही नवीन शिवतानाच पार्श्वभागावर आतल्या बाजूने दोन ठिगळे लावायचे असे आम्ही ऐकले होते (खरेखोटे त्यांचा शिंपी आणि धोबीच जाणोत) तर अशा तालमीत तयार झालेल्या वडिलानी धोतरजोडी घेण्यास विरोध केल्याने त्यांच्या सेवानिवृत्त जीवनात आराम मिळावा म्हणून बसण्यासाठी आरामखुर्ची घ्यावी या उद्देशाने मग आम्ही घराबाहेर पडलो.

या 'आम्ही'त मी व माझी व्यवहारकुशल भगिनी यांचा समावेश होतो. खरे तर माझ्या तुलनेत कोणीही व्यवहारकुशलच ठरेल याची मला खात्री होती (आणि आहे पण). शिवाय ती व्यवहारकुशल आहे असा तिचा दावाही होता. मात्र तिने आणलेली कोणतीही वस्तु एकदा तरी बदलून आणावीच लागे. पण दुकानदार कोणतीही सबब न सांगता निमूटपणे तिला वस्तु बदलून देत हाच फार तर तिच्या व्यवहारकौशल्याचा पुरावा मानता येईल. एकदातर तिने आणलेली साडी काही वेळा नेसून धुतल्यावरही केवळ तिच्या मैत्रिणीनी साडीवर केलेली टीका सहन न झाल्यामुळे तावातावाने परत केली होती.

त्यावेळी बाजारात नुकत्याच येवू घातलेल्या लोखंडी फर्निचरमध्ये मिळणारी आरामखुर्ची घ्यावी असे आम्ही ठरवले अर्थात हा निर्णय एका दुकानात शिरल्यावर व दुकानदाराकडून त्या खुर्चीची प्रशस्ती व अर्थातच किंमत ऐकूनच केला होता ही पूर्वीच्या लाकडी खुर्चीचीच लोखंडी आवृत्ती होती फक्त यात कापडाच्या दोन्ही बाजू वरच्या आणि खालच्या दाड्यावरून घेऊन शिवूनच टाकल्या होत्या म्हणजे दांडा काढून पाडण्याची सोय यात नव्हती. मात्र ते कापड फाटले तर काय ही मूलभूत शंका माझ्या व्यवहारकुशल बहिणीस आलीच. यावर त्या दुकानदाराने कापड फाटले तर बदलून देण्याची जबाबदारी घेऊन फक्त कापडाची किंमत गिऱ्हाइकाने द्यायची असे सांगितले. या दुकानदाराचा मूळ व्यवसाय कलालाचा म्हणजे दारू तयार करून विकणाराचा होता. मधल्या काळात दारूबंदीमुळे (त्यावेळी आपल्या राज्यात दारूबंदी होती)पिढीजात व्यवसाय सोडून हे दुकान त्याने टाकले होते.

पूर्वीच्या व्यवसायात गिऱ्हाइकाना काहीही आश्वासन दिले तरी विकलेल्या पेयाच्या अमलाखाली गिऱ्हाईक व कधीकधी तो स्वत: पण असल्यामुळे त्या आश्वासनाची आठवण दोघानाही रहात नसल्याने त्याची पूर्तता क्वचितच करावी लागे हे आश्वासनही त्या संवयीचाच भाग असावा पण हे आमच्या नंतर लक्षात येणार होते. अर्थात आमच्या हा शब्द वापरणे हा केवळ औपचारिकतेचाच

भाग आहे कारण मी नेहमीप्रमाणे पूर्णपणे बरोबरच्या व्यक्तीच्या निर्णयकौशल्यावर विसंबून होतो अशावेळी एकादी गोष्ट माझ्या ध्यानात आली तरी मी तिकडे दुर्लक्ष करतो आणि अर्थातच त्याचा पुढे मलाच पश्चाताप करावा लागतो हे वेगळे! आताही या खुर्चीच्या बाबतीत मला एक गोष्ट खुपत होती ती म्हणजे लोखंडी चौकट करताना दोन बाजूमधील अंतर सगळीकडे सारखे रहावे म्हणून मध्ये एक आडवी लोखंडी पट्टी बैठकीच्या भागाकडे वेल्ड केली होती. तिच्यावर बैठकीचे कापड आपण बसल्यावर घासू लागे. त्यामुळे खुर्चीचे कापड त्या जागी लवकरच फाटण्याची शक्यताच नव्हे तर निश्चितीच होती. पण खरेदी तज्ञ बहिणीची मान्यता आणि कापड बदलून देण्याचा दुकानदाराचा वायदा या दोन गोष्टींनी या शंकेवर मात केली व खुर्ची आम्ही खरेदी केली.

कुठल्याही क्षुल्लक खरेदीने आनंद वाटण्याचे ते दिवस असल्यामुळे तेवढ्या खरेदीचेही कौतुक झाले. वडिलानी तिच्यावर बसून तिजे उद्घाटन केल्याचे जाहीर केले (कारण तसे पहाता तिचे उद्घाटन केल्याशिवाय तिच्यावर बसता येतच नसे.)वडील सेवानिवृत्त झाले असले तरी घरात बसून रहाण्याचा पिंड नसल्यामुळे आरामखुर्चीवर क्वचितच बसत, भावंडांना तिच्यावर बसून अभ्यास करणे शक्य नव्हते. आई तर तिला हातही लावत नसे. येऊन जाऊन एवढा गाजावाजा करून तिला खरेदी करणारे

आम्ही दोघेच कधी बसलो तर बसत असू तिच्यावर, नाहीतर ती कोपऱ्यात घडी केलेल्या अवस्थेत उभी असे. म्हणजे घरातील व्यक्तींपेक्षा जास्त आराम तिचाच चालू होता म्हणाना! पण मूळ तोळामासा तब्येत असणाऱ्या व्यक्तीस कितीही आराम मिळाला तरी थोड्या दगदगीनेही मूळ रोगाने उचल खावी तसेच तिच्याही बाबतीत झाले आणि अगदी मोजक्या व्यक्तीनी तिच्यावर आराम करण्याचे सौख्य उपभोगल्यावर माझी भीती खरी ठरून तिला पट्टीवर घासणाऱ्या भागास प्रथम छोटे भोक आणि छिद्रेश्वनर्थाः बहुलीभवंति या उक्तीस जागून ते भोक वाढून तिच्यावर बसणे लवकरच अशक्य झाले. आणि मग खुर्चीविक्रेत्याच्या आश्वासनाच्या सत्यतेचा पडताळा घेण्याची वेळ लवकरच आली.

खुर्ची घेऊन आमची वरात त्या दुकानात पोचल्यावर मालकाने पहिल्यावेळी दाखवलेल्या उत्साहानेच आमचे स्वागत केले. हसतमुद्रेने स्वागत करणे हा त्याच्या विक्रयशास्त्राचा भाग होताच पण आमचे आगमन त्याला अपेक्षितही असावे असाही भाव त्याच्या हास्यातून सूचित होत असल्याचा भास मला झाला. खुर्ची आमच्याबरोबर असल्याने आमच्या येण्याचे कारण त्याला समजल्यातच जमा होते. पण तरीही आपल्या खुर्चीचे अवमूल्यन आपणच केले असे व्हायला नको म्हणून एक औपचारिकता पुरी करण्याच्या हेतूने त्याने विचारले" काय साहेब, आज कशासाठी

येणं केलत? " खुर्चीच्या दुरुस्तीसाठी इतक्या लवकर त्याच्याकडे जावे लागणे ही गोष्ट माझ्या मनात डाचत असली तरी त्यात माझ्या ज्ञानाचेही दिवाळे निघाल्याची जाणीव मला जास्त क्लेशदायक वाटत होती. पण माझ्या बहिणीला अशी खंत बाळगण्याचे काही कारण नव्हते शिवाय तिने यापूर्वी अशा अनेक विक्रेत्याना लोळवले होते. त्यामुळे कठिण प्रसंगातही धैर्य न सोडण्याच्या आपल्या वृत्तीला जागून तिने, " अहो कसली खुर्ची गळयात घातलीत आमच्या, लगेच कापड फाटलेसुद्धा" असे म्हणत त्याच्यावर हला केला. अशा हल्ल्याची संवयच असल्यामुळे आपली मन: शांती मुळीच ढळू न देता त्याने " अहो ताई अशा रागावता कशाला, कापड बदलून देण्याची बोली आहे ना आपली? उलट तुम्हाला परत नव्या खुर्चीत बसण्याचा आनंद मिळेल, हव तर कापडाचे पैसेही देऊ नका मग तर झालं? "म्हणून तिच्या रागाचा पारा उतरवण्याचा प्रयत्न केला पण अशा गोड शब्दांना बळी पडणाऱ्यापैकी ती नव्हती. त्यामुळे "ते कापड किती टिकणार की घरी नेतानेताच फाटणार? "असे विचारून त्याला नामोहरम करण्याचा प्रयत्न तिने केलाच. पण असे शेकडो हल्ले दररोज पचवण्याची संवय असल्याने त्याने तिला शांत करण्याचा आणखी एक प्रयत्न करत म्हटले, " काय बोलताय ताई, आता खुर्ची तुटली तरी फाटणार नाही असे कापड बसवून देतो मग तर झालं? " तस

होण हे तर आणखीच त्रासदायक होत पण मी मध्ये बोलण्याचा मोह टाळला. या आमच्या दुकानभेटीची फलश्रुती खुर्चीच माहेरी आगमन येवढीच होण्याची शक्यता असल्याने मी तेथून बाहेर पडण्याची तयारी दर्शवीत " मग खुर्ची नेण्यास आम्ही परत केव्हां येऊ? "असे विचारले, त्यावर त्याने " याकी साहेब, दोनतीन दिवसात, आणि तसच जायच नाही बरका चहा मागवलाय" असं म्हणून आमच्या रागाच्या आगीवर चहाच पाणी मारण्याचा प्रयत्न केला

दोन तीन दिवसांच्या वायद्याचा अर्थ माहीत असल्यामुळे व आरामखुर्चीवाचून कुणाच काही अडत नसल्यामुळे तब्बल एक आठवड्याने मी दुकानात डोकावलो. आरामखुर्ची आमच्या मागच्या भेटीत ज्या ठिकाणी ठेवली होती त्याच जागी आराम करत होती. अर्थातच तिच्यावर बरेवाईट कसलेच संस्कार झालेले मव्हते. मला पाहिल्यावर आश्चर्य वाटल्यासारखे दाखवून दुकानदार म्हणाला, " अरे साहेब तुम्ही? " त्याच्या या उद्गारामुळे आपलीच काही चूक झाली नाही ना असा संशय मला आला. शिवाय माझी पाठराखीण माझ्याबरोबर नसल्याने माझ्या मनोधैर्याची पातळी म्हणावी तितकी उच्च नव्हती उलट तिच्या गैरहजेरीमुळे तेंडुलकराविना खेळणाऱ्या भारतीय संघासारखीच माझी अवस्था आहे हे त्या चतुर गृहस्थास पुरेपूर माहीत होते. त्याने मला

बसण्याची विनंती करून लगेच पोऱ्याला चहा आणण्यास पाठवले. आपल्या स्वरात जेवढा कडकपणा आणता येईल तेवढा आणण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालो, "हे पहा चुनिलाल, मी चहा पिण्यासाठी तुमच्या दुकानात आलो नाही. " असे कडक बोलण्याचा प्रयत्न मी करतो तेव्हा समोरच्या व्यक्तीला मात्र मी विनोद करण्याचाच प्रयत्न करतो आहे असे का वाटत कुणास ठाऊक. आताही तसेच झाल्यामुळे चुनीलालने त्याच्या अगोदरच विनोदी शैलीचा वापर करत, "हे काय बोलण झालं साहेब? आता पूर्वी आमच्याकडे ह्याच्यासाठीच लोक आमच्याकडे यायचे ते वेगळ! " असं ओठाला मूठ टेकत दारू पिण्याचा अभिनय करीत म्हटले. त्याच्या विनोदामुळे मी रागावणार नाही अशी त्याची जी कल्पना होती ती मात्र खरी ठरली. कारण माझ्या कडक बोलण्याने समोरच्या व्यक्तीपेक्षा मलाच जास्त वाईट वाटतं आणि हा माझा दुबळेपणा याही वेळी वर उसळून आल्यामुळे तो सहीसलामत सुटला.

मग गुळमुळीत शब्दात मी " मग आमच्या खुर्चीच काय झालं? " असं विचारल. खरं तर खुर्चीच काहीच झालेलं नाही हे मला स्पष्ट दिसत होते. मात्र मी प्रश्न विचारल्यावर चुनिलालला एकदम जोर आला, आणि तो म्हणाला, " काय सांगू साहेब,

खुर्चीला कापड लावून दुसऱ्या दिवशीच तयार ठेवायला सांगितल होत पण तो टेलरचा बच्चाच तेव्हापासून गायब झालाय. "

" मग तो केव्हा येणार? "मी उगीचच काहीतरी विचारायच म्हणून विचारल. कारण या प्रश्नाच उत्तर त्या टेलरच्या बच्चालाच माहीत असण्याची शक्यता होती शिवाय त्या उत्तरावर माझ्या खुर्चीच भवितव्य अवलंबून नाही याचीही पूर्ण कल्पना मला होती..

" तो केव्हा यायचा असेल तेव्हां येऊदे " चुनिलाल मोठ्या औदार्याने उत्तरला, "पण आता तुमच्या खुर्चीच काम मात्र उद्या तो नाही त्याच्या बापाकडून करून घेतल्याशिवाय माझं समाधान होणार नाही. तुम्हाला अशा चकरा मारायला लावायला बर वाटत नाही साहेब"

त्याच्या या आवेशाने जरा बरे वाटून, "ठीक आहे, मग उद्या येतो" असे म्हणून मी दुकानाबाहेर पाय ठेवत होतो तेवढ्यात एक पोरगेलासा दिसणारा माणूस माझ्या पाठीकडून चुनिलालला उद्देशून " शेट, आजतरी कापड आणून द्या म्हंजे त्या खुर्चीचा निकाल लावता येईल"म्हणत असताना ऐकू आल्यावर हाच तो टेलरचा बच्चा असावा आणि तो गायब वगैरे झाला नसून ते चुनिलालच्याच कल्पनाशक्तीच चातुर्य आहे हे माझ्या लक्षात आले. पण चुनिलाल मात्र काहीच घडले नसल्याच्या थाटात

म्हणाला, " बघा साहेब, हा आला आमचा टेलर, आता तुमचे काम झालेच समजा! उद्या केव्हाही तुमच्या सोयीन या आणि खुर्ची घेऊन जा. "

या वेळी मात्र उद्याचा वायदा टाळण्याचा प्रयत्न चुनीलाल करणार नाही अशी खात्री असल्याने मी स्वस्थ चित्ताने दुसऱ्या दिवशी त्याच्या दुकानात जायच ठरवल, तरीही प्रत्यक्ष दुकानात शिरताना माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकतच होती. पण चुनिलालच्या चेहऱ्यावरील आश्वासक हास्यातून " सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।" असे अर्जुनास बजावणाऱ्या श्रीकृष्णाचाच भास मला झाला.

"या साहेब खुर्ची तयार आहे " या त्याच्या उद्गारानी तर उरल्यासुरल्या सर्व शंकांचे समाधान झाले आहे असे अर्जुनाप्रमाणेच म्हणाव असं मला वाटू लागलं आणि दुसऱ्याच क्षणी खुर्चीवर दृष्टीक्षेप टाकताच आता अर्जुनाप्रमाणे मला लढायलाही तयार व्हाव लागणार असं वाटू लागलं कारण पूर्वी खुर्चीच्या ज्या भागाला कापड लावल्याने तिला आरामखुर्चीपद प्राप्त झाले होते त्याच्या बरोबर उलट्या आणि छोट्या भागास त्या शिंप्याने कापड लावून त्याला तान्ह्या बाळाची झोळी करूब टाकले होते. या झोळीचा वापर करण्यासाठी मला लग्नापासून तयारी

करयला लागली असती. खुर्ची चुनिलालपुढे उघडून ठेवूम शक्य तितक्या चढ्या स्वरात मी म्हणालो, " हे काय करून ठेवलेय तुम्ही? " खुर्चीकडे पाहून त्यालाही हसू आवरेना. आपल्या हसण्याचा गिऱ्हाइकावर काय परिणाम होईल याचीही त्याला काळजी नसावी किंवा त्या खुर्चीकडे पाहून त्याला बाकी कुठल्याच गोष्टीचे भान उरले नसावे.

" त्या टेलरच्या बच्चाचा हा सगळा प्रताप"अगदी हसत हसत तो म्हणाला, " हो पण त्यावेळी तुम्ही काय करत होता? " असं विचारण्यापूर्वीच गिऱ्हाइकासाठी नसली तरी तो स्वत: पुरती तरी गाळत असावा याची मला खात्री पटली. तरीही चुनिलाल पूर्वीच्याच उत्साहाने मला त्याची नवी योजना ऐकवू लागला. "काळजी नको साहेब" खरं तर काळजी करण्याचा पूर्ण भार माझ्यावर टाकून काळजी न करण्याची बाजू त्याने उत्तम रीतीने संभाळली असल्याने असा सल्ला मला देण्यास त्याच्याइतका लायक माणूस शोधूनही सापडला नसता.

" आत्ताच्या आत्ता त्या टेलरची मान पकडून नवे कापड टाकायला लावतो. "चुनिलाल उवाच.

" पण त्यापूर्वी हे कापड काढायला सांगा" आता कुठलाही धोका पत्करण्याची माझी तयारी नव्हती. त्यामुळे मी म्हणालो.

" काय साहेब, हे काय सांगायला पाहिजे का? " इति चुनिलाल. खरं तर आता त्याला काहीही सांगण्याची माझी इच्छा नव्हती. भर्तृहरीच्री चुकून गाठ चुनिलालशी पडली असती तर या माणसाला कुठलीही गोष्ट समजावण्याचे शिरसि मा लिख मा लिख मा लिख! असा श्लोक त्याला लिहावा वाटला असता.

"मग मी आता उद्या येतो" व्याधाशी परत येण्याचा वायदा करणाऱ्या हरिणीच्या व्याकुळतेने मी म्हणालो. फक्त व्याध हरिणीची वाट पहाणार होता तर चुनिलाल मला वाट पहायला लावण्याचा विक्रम प्रस्थापित करून आपले नाव गिनीच्या पुस्तकात येण्याची वाट पाहात होता.

" अगदी बिनधास्त या साहेब आणि समजा मी जरी येथे नसलो तरी खुर्ची येथे तयारच राहील आणि येथे बसणाऱ्या माणसाला मी सांगून ठेवीन" आता चुनिलालने नकळत दुसऱ्या एका संकटाची म्हणजे पुढील वेळी त्याच्या दुकानात नसण्याच्या शक्यतेची घंटा वाजवून ठेवली. आणि खुर्चीही त्याच्याच तालमीत तयार झाल्यामुळे तिनेही समझनेवालोको इशारा काफी होता है या न्यायाने त्याच्या पावलावर पाऊल ठेवण्याचे ठरवले असावे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी मी दुकानात गेलो तेव्हा दुकानात चुनिलाल व खुर्ची दोन्हीचा पत्ता नव्हता. एवढेच काय त्याच्या गैरहजेरीत तेथे

बसणारा माणूसही त्याला उपलब्ध झाला नसावा. खरे तर त्याचे दुकानही तेथून बेपत्ता झाले असते तरी आता मला आश्चर्य मुळीच वाटले नसते.

पण शेजारच्या दुकानदाराचे माझ्याकडे लक्ष गेले. खुर्चीसाठी त्या भागात आम्ही इतक्या चकरा मारल्याने आम्ही आणि आमची खुर्ची यांनी त्या भागात बऱ्यापैकी प्रसिद्धी संपादन केली होती. त्यामुळे त्या दुकानदाराने चुनिलालचे घर जवळच असून तेथे कसे जायचे याविषयी बहुमोल मार्गदर्शन मला केले. त्याला अनुसरून मी त्याने सांगितलेल्या जवळच असणाऱ्या इमारतीत गेलो. तेथील चिंचोळया आणि अंधाऱ्या जिन्याच्या पायऱ्या चढताना हैदराबादच्या चार मिनारच्या पायऱ्या चढल्याचा भास मला झाला. त्या एकूण चौसष्ठ पायऱ्या होत्या हे पुढे बऱ्याच वेळा त्या चढाव्या लागल्यामुळे मला पाठ झाले. पुढेपुढे तर त्या मी डोळे मिटून चढू शकेन येवढा आत्मविश्वासही मला आला. अर्थात पहिल्याच वेळी मी घरी गेल्यावर चुनिलाल घरी नव्हता हे सूज्ञांस सांगणे नलगे!

चुनिलालच्या घराचा पत्ता लागल्यावर एका घूंघट सावरत येणाऱ्या स्त्रीन " सेठ बाहर गये है" हे शुभवर्तमान मला दिल. ती अर्थातच त्याची बायको असावी. तेवढ्यात चुनिलालचा दहा बारा वर्षाचा मुलगा तेथे आला. त्याच्याकडून अधिक माहिती मिळाली

तर पहावी म्हणून बाबा कुठे गेले आहेत असे विचारल्यावर त्याने बाबा आठ दिवसासाठी बाहेरगावी गेल्याची बातमी मला दिली. त्यामुळे खरं तर माझ्या पोटात गोळा यायला हवा होता पण तसे काही न होता उलट आठ दिवस आपल्याला चकरा माराव्या लागनार नाहीत व चुनिलालचे तोंड पहावे लागणार नाही या कल्पनेने मला बरेच वाटले.

पण माझ्या लढाऊ बहिणीस मात्र हा आमच्या संपूर्ण खानदानाचा अपमान आहे असे वाटून तिने चुनिलालचा पिच्छा पुरवण्याचे ठरवले. तिचा महाविद्यालयास जाण्याचा रस्ता तिच्या सुदैवाने आणि चुबिलालच्या दुर्दैवाने बराचसा त्याच्या दुकानावरून जात असल्याने तिला त्यासाठी स्वतंत्र वेळ काढावा लागणार नव्हता. थोडक्यात दुसऱ्या दिवसापासून माझा कार्यभार तिच्यावर सोपवून फक्त आता चुनिलालचे कसे होणार एवढी काळजी सोडता मी निश्चिंत झालो. खरतर या चुनिलाल प्रकरणात थोडी विश्रांती घ्यावी असे मला वाटत होते. मालिकेचा भाग दाखवण्यापेक्षा ब्रेकमध्येच जास्त वेळ घालवणाऱ्या दूरदर्शनचे या बाबतीत माझ्याशी चांगले जमते. पण माझ्या अवतीभवतीच्या लोकाना माझे असे ब्रेक घेणे आवडत नाही. चुनिलाल आठ दिवस गावालाच गेल्यामुळे तो काळ तरी शांततेत जाणार असे मी गृहित धरले होते पण माझी ही शांततेची आवड इतरेजनाना मानवत नाही.

माझ्या बहिणीने कुठुनतरी बातमी काढली की चुनिलाल गावाला वगैरे कुठे गेला नसून आपल्या मुलाला त्यान तशी थाप मारायला सांगितले होते. अर्थातच आता पुन्हा एकदा चुनिलालच्या दुकानाची आणि तो घरी मसल्यामुळे त्याच्या घराची पायरी (नव्हे बऱ्याच पायऱ्या) चढणे पुन्हा माझ्या नशिबी आलेच. खरतर आमच्या खुर्चीसाठी नाही तर निदान स्वत:च्या धंद्यासाठी तरी त्यान दुकानात रहाव असं मला वाटू लागल. पण खुर्ची प्रकरण त्यान फारच मनाला लावून घेतल्यासारख दिसले. त्यासाठी त्यान स्वत: च्या धंद्यावरही पाणी सोडायच ठरवल्यासारख वाटू लागल. त्याच्या वागण्यातही पूर्वीचे अगत्य राहिले नाही. खरं तर येवढ्या क्षुल्लक गोष्टीसाठी त्यान आपली इभ्रत का पणाला लावावी हे अनाकलनीय होत हल्ली ती खुर्ची त्याच्या दुकानात वा घरी कुठेच दिसत नसे शेवटी कंटाळून त्याच्या दुकानात एक गार्डन चेअर पडली होती तीच घेऊन जाण्याची धमकी मी त्याला दिली आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुळीच आढेवेढे न घेता त्याने माझी मागणी मान्य केली, बहुतेक तीही खुर्ची खपणार नाही अशी त्याची खात्री असावी.

अशा प्रकारे घरात गार्डन नसताना गार्डन चेअर माझ्या घरात आली, पण त्या खुर्चीचा उपयोग बागेत फक्त शोभेची वस्तु म्हणून ठेवण्यासाठी व्हावा असा चुनिलालचा दृष्टिकोन असावा त्यामुळे

तिचा पाया त्यान इतका कमी ठेवला होता की तिच्यावर बसणारी व्यक्ती थोडे पाठीकडे रेलून बसू लागली की ती पाठीकडे कलंडत असे. थोडक्यात जुन्या पद्धतीच्या लाकडी आरामखुर्चीत बसणाऱ्या व्यक्तीस पडण्याची जी शक्यता होती तिला चुनिलालने या खुर्चीचा गुणधर्मच बनवले होते. त्यामुळे आमच्याकडे येणाऱ्या नव्या माणसास त्या खुर्चीवर बसण्याचा मोह झालाच तर प्रथम त्याला या खुर्चीचे हे वैशिष्ट्य समजावून सांगणे हा त्याच्या स्वागताचा महत्त्वाचा भाग असे, नाहीतर त्याचे स्वागत फारच वेगळ्या प्रकारे होऊन एक मित्र आम्हास कायमचा दुरावत असे. अजूनही जुन्या वस्तु जपण्याच्या भारतीय परंपरेनुसार ती खुर्ची माझ्या घरात आहे. तिच्यावर बसून माझे बहुतेक मित्र, घरातील एकूणएक माणसे पडलेली आहेत. आता तिचा उपयोग माझी मांजरी करते. आणि फक्त तीच त्या खुर्चीवरून पडण्याची धास्ती न बाळगता आराम करू शकते.

# १०. आडमार्गी जाऊ नको

आपल्याविषयीच्या चांगल्या बातम्या लोकांना सांगाव्या लागतात (जरी त्यामुळे लोकांच्या पोटात दुखणार असेल तरी) वाईट बातम्या मात्र लोकच आपल्याला सांगतात. अर्थात त्यांचा त्यामागील हेतु अगदी शुद्ध म्हणजे आपल्याविषयी सहानुभूति दाखवणे हाच असतो. त्यादिवशीही पक्याने मला "अरे मी ऐकले ते खरे का? " अशी सुरवात केल्यावर आता आपल्याला हा काय ऐकवतोय या भीतीने पोटात गोळा उठला आणि त्याने ती बातमी ऐकवताच नुकत्याच सुरू झालेल्या आपल्या वैवाहिक आयुष्याला सुरुंग लागणार अशी भीती मला वाटू लागली. सुमतीला ती बातमी ऐकवून तिचा आपण कडेलोट करणार आहोत याची कल्पना मला होती. त्या दिवशी बॅंकेतून घरी नेहमीप्रमाणे हसत जाणे मला शक्यच नव्हते उलट एकदम चिडक्या चेहऱ्याने घरात येऊन अंगावरचे कपडे जवळ जवळ ओढूनच काढत मी खुर्चीवर बसलो आणि पाण्याचा पेला घेऊन आलेल्या सुमतीला म्हणालो,

"झाले कोटकल्याण "

"का काय झाले? " पंखा सुरू करून माझ्याजवळ येत सुमती म्हणाली.

"माझी बदली झालीय. "

"असं कस काय झालं आणि कुठ झाली? "तिन विचारले.

तिच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे नव्हत म्हणून दुसऱ्या प्रश्नाचे तेवढे मी दिले,

"बोंदरवाडी "

हे नाव सुद्धा सुमती प्रथमच ऐकत होती त्यामुळे तिचा पुढला प्रश्न होता

"हे गाव कोठे आहे? "

"मला तरी कुठे माहीत आहे पण जायचे म्हणजे समजून घ्यावेच येईल "

आणि पुढ "चला मग निघण्याची तयारी करा आलिया भोगासी असावे सादर " मी भरतवाक्य म्हणावे तसे म्हटले. सुदैवाने तो काळ नवऱ्यांसाठी आजच्याइतका वाईट नव्हता नाहीतर आमचा संवाद काहीसा असा झाला असता

" काय बदली झालीय? तू तर म्हणाला होतास की निदान पाच वर्षे तरी बदली नाही म्हणून"

" हो म्हणालो होतो पण त्यावेळी कुठ माहीत होत आमदारसाहेबांच्या मुलीला याच ब्रॅन्चलाच यायच होत. "

"उद्यापरवा निघाव लागेल"

" मला वाटत तू एकट्यानच जावस "

"कमाल आहे म्हणजे तू माझ्याबरोबर येणार नाहीस का? "

" हे बघ श्यामकांत वाईट वाटून घेऊ नकोस, पण मी लग्नाला तयार झाले कारण तू पुण्यात नोकरी करत होतास आणि त्यामुळे पुण मला निदान काही वर्षे तरी सोडायला लागणार नाही असं वाटत होत पण आता सगळच बदलल आहे, ते बोंदरवाडी गाव कसल आहे कुणास ठाऊक"

" मग याचा अर्थ आपण नेहमीसाठीच वेगळ रहायच की आणखी काही --- " आता मात्र माझा धीर सुटत चालला.

" तस नाही तू मधून मधून येत जा पुण्याला किंवा मीही ये ईन बोंदरवाडीला "

अशा वळणावर आमच्या संवादाची गाडी न जाता सुमतीने फारसा त्रागा न करता जाण्याची तयारी दाखवली फक्त तिने एकच सूचना केली,

" मला वाटते तुम्ही एकदा बोंदरवाडीला कामावर रुजू व्हा जागा वगैरे पहा मग मला न्यायला या"अर्थात या तिच्या सूचनेत गैर काही नव्हते.

मी मुक्काम पोस्ट बोंदरवाडीला पोचलो आणि कामावर तर रुजू झालो पण या कृतीचा उत्तरार्ध पार पाडणे अवघड आहे हे माझ्या लक्षात येऊ लागले कारण बोंदरवाडीत सुमतीला पटेल असे घर मिळणे किती अवघड आहे हे बरीच घरे पाहिल्यावर माझ्या लक्षात येऊ लागले. बोंदरवाडी छोटे गाव असले तरी बॅंकेतल्या सह्काऱ्यानी मला बरीच घरे दाखवली पण काही झालं तरी ती बोंदरवाडीतलीच घर त्याना पुण्यामुंबईतल्या घरांची सर थोडीच येणार. काही नवश्रीमंत शेतकऱ्यांनी बऱ्यापैकी घरे बांधली होती पण मुख्य प्रश्न होता पाण्याचा. नळाची सोय असली तरी नळाला पाण्याचा थेंबही पहायला मिळण म्हणजे अगदी कपिलाषष्ठीचा योग, त्यामुळे माझ्या एका सहाय्यकाने केलेली सूचना मला पटली आणि मी एक वाडा पद्धतीचे पण जुनाट घर भाड्याने घ्यायचे ठरवले कारण त्या घराला मोठे अंगण होते आणि त्यामध्ये एक सुबक पद्धतीने बांधलेला आड होता, आणि त्या आडाची अशी ख्याती होती की आजूबाजूच्या पंचक्रोशीतले पाणी आटले तरी त्यातील पाणी आटत नसे.

घराचे काम एकदा पार पडल्यावर मी सुमतीला घेऊन गेलो. घर पाहून सुमतीन अगदी नापसंती व्यक्त केली नाही हे पाहून मला बरे वाटले. त्यादिवशी माझ्या बॅंकेतील मित्राने जेवायला बोलावले होते, जेवण करून घरी आलो आणि बऱ्याच दिवसानी सुखाने झोप आली असे मला वाटले पण पहाटे जाग आल्यावर सुमतीला जवळ घेण्याच्या माझ्या बेताला एकदम खीळ बसली ती अंगणाच्या दारावर कुणीतरी ठोकल्यामुळे. या घराची रचना बाहेर अंगण ते बंदिस्त होण्यासाठी मुख्य दरवाजा आणि मग आतल्या घराचे दार अशी होती. अंगणातील दारावरील ठोकण्याकडे काही वेळ दुर्लक्ष्य केले तरी तरी ते ठोठावणे थांबण्याचे चिन्ह दिसेना त्यामुळे आपला बेत जरा बाजूस ठेऊन उठून त्या ठोकणाऱ्याची दखल घेण मला भाग होते नाहीतर जो कोणी असेल तो ठोकून ठोकून दारच मोडून टाकेल अशी शक्यता दिसत होती.

उठून दार उघडून मी डोळे चोळतच अंगणात गेलो, बाहेरील दारावरील दणके चालूच होते, ते दार उघडले आणि पहातो तो दोन हातात दोन भल्या मोठ्या घागरी घेतलेले, डोक्याचा तुळतुळीत गोटा केलेले, धोतराचा काचा मारलेले असे पैलवानी धाटणीचे गृहस्थ समोर अवतीर्ण झाले. आपण या गृहस्थांना केव्हां भेटलो याचा विचार करण्याचा प्रयत्न मी डोळे चोळत आणि डोके खाजवत करू लागलो, पण मला जास्त आठवण्याची तसदी न देता

समोरील गृहस्थानी " अहो वाटेत काय उभे रहाताय मला पाणी न्यायला उशीर होतोय बाजूस सरा "असा हुकूम सोडल्यावर मला बाजूस सरणे भाग पडले. कारण आपण या घरात रहायला येण्यापूर्वीचीच या गृहस्थांची ही हक्काची वहिवाट असावी याचा साक्षात्कार मला झाला.

आत परत गेल्यावर सुमतीलाही जाग आली आणि तिने उठून चहाची तयारी सुरू केली पण प्रथमग्रासे मक्षिकापात: व्हावा तशी एक गोष्ट तिच्या लक्षात आली ती म्हणजे घरात पाण्याचा एक थेंबही नव्हता. सुदैवाने लग्नात आईकडून मिळालेली घागर सुमतीने आणली होती ती माझ्यापुढे ठेवून तिने मला आडावरून पाणी आणायला सांगितले.

तिची आज्ञा शिरोधार्य करून मी बाहेर आडावर गेलो. मिशाबहाद्दर पाणी घेऊन गेले होते. मोठ्या आनंदाने दोनतीनदा आडाकडे आणि दोनतीनदा हातातल्या घागरीकडे पाहिले. नंतर आळीपाळीने एकदा रहाटाकडे आणि एकदा घागरीकडे पाहिले. द्रोणाचार्यासारखे घागर आडात टाकून ती भरल्यावर बाण मारून ती बाहेर काढण्याचे कसब आपल्याकडे नाही म्हणजे ती घागर आडात सोडण्यासाठी दोर हवा याची जाणीव झाली. शेवटी वेळ

भागवण्यापुरती सुमतीची एक जुनी साडी वापरून पाणी शेंदून काढायचा विचार केला.

त्याच पद्धतीने एक घागर पाणी काढून घरात घेऊन गेल्यावर सुमतीने एक कृपाकटाक्ष माझ्याकडे टाकला. कोणतेही काम केल्यावर "तुम्ही किती चांगले आहात हो" या अर्थी असा कटाक्ष टाकून ती मला गार करते पण यावेळी पाणी शेंदून काढून घरी आणेपर्यंत माझ्या अंगावर झालेल्या अभिषेकामुळे मी आधीच गार झालो होतो अजून गॅसचा पत्ता नसल्यामुळे स्टोव्ह पेटवून चहाच आधण तिन ठेवल. आत स्टोव्हच संगीत चालू होत व बाहेर रहाटाच संगीत चालू होत. बरेच लोक जलभरणासाठी आडावर येत होते. मी दाराच्या चौकटीत उभा राहून मोठ्या दिमाखान त्यांच्याकडे पहात होतो. आपण एक पुण्यकृत्य करत आहोत असं मला वाटत होत. चहा झाला आणि मी वर्तमानपत्र चाळीत बसलो तोच एक सदगृहस्थ आत आले. या घरात आल्यापासून अनेक अनोळखी लोकांना पहाण्याची पाळी इतक्या थोड्या वेळात आल्याने मी या गोष्टीस चांगलाच सरावलो होतो. त्यानी एकदम अधिकारदर्शक सुरात "जरा दोर द्या बर" अशी मागणी केली आणि दोर नाही असे मी सांगताच "काय विचित्र माणुस आहे घरात आड आहे आणि दोर नाही"असे पुटपुटत निघून गेले.

पण त्यामुळे आता दोर आणला पाहिजे हे लक्षात आले आणि मी उठलो. पाकिट खिशात घालून बाजारात गेलो. आतापर्यंत दोराचा वापर करायची पाळी आली नव्हती. येऊन जाऊन नरवीर तानाजी नाटकात सूर्याजीच काम करत असताना मी दोरावरून चढताना बाकीच्या मावळ्यांना इतकी वीरश्री चढली की मी वर चढण्यापूर्वीच त्यानी दोर कापून टाकला आणि त्यानंतर चार दिवस मी दवाखान्यात पडून होतो हाच काय तो दोराचा माझ्या पोतडीत असलेला अनुभव. त्यामुळे दोर विकत घेण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. बोंदरवाडी म्हणजे काही बिग बझार असणारे शहर नव्हते की तेथे एका छताखाली सगळया वस्तू मिळाव्या त्यामुळे एका दुकानात दोर मागितल्यावर त्याने "अहो दोर असा दुकानात कुठला भेटायला, त्यासाठी जावा **वाड्यात (जातिवाचक उल्लेखाचे बोंदरवाडीस वावडे नव्हते) " असे सांगितले. मग शोध घेत गेलो तेव्हा **वाड्यात खरोखरच दोर वळण्याचेच काम चालू होते. आणि मला हवा तसा दोर तिथे उपलब्ध झाला आणि विजयी मुद्रेने तो घेऊन मी घरी आलो.

घरी आल्यावर नेहमीप्रमाणेच माझ्या खरेदीवर आणि त्यातील अव्यावहारिकपणावर शिक्कामोर्तब झाले व पाणी काढण्यासाठी म्हणून मी दोर व घागर घेऊन पुन्हा आडावर गेलो. पण आता अडचण वेगळीच उपस्थित झाली. आता घागर दोरात

अडकवण्यासाठी फास तयार करणे आवश्यक होते. बरीच धडपड करून त्या दोराचा फास बनवणे काही मला जमले नाही. गळफास घेऊन आत्महत्या करणाऱ्यांना बहुधा फास कोणीतरी तयार करून देत असावेत नाहीतर फास तयार करेपर्यंत त्यांचा आत्महत्या करण्याचा विचार बदलण्याची निश्चिती आहे असे मला वाटून गेले. इतक्यात एक तरूण वीर त्याचवेळी पाणी नेण्यासाठी प्रविष्ट झाले आणि तेसुद्धा अगदी भला मोठा हंडा घेऊनच. ते या शास्त्रात पारंगत असल्याने एका दमात त्यानी फास तयार केला आणि त्याचा उपयोग करून मी एक घागर पाणी ओढून काढले, अर्थात त्यांच्या कामगिरीबद्दल दोराचा वापर याना करू देणे आवश्यकच होते. त्यांच्या त्या अवाढव्य हंड्याच्या वजनाने दोर तुटणार तर नाही ना अशी सारखी भीती मला वाटत होती, पण सुदैवाने तसे काही घडले नाही. आणि घागर घेऊन मोठ्या समाधानाने मी घरात गेलो.

जेवण करून ऑफिसात गेलो संध्याकाळी घरी परत येतो तो सुमती हवालदिल होऊन बसलेली. "का ग काय झालं? " असं मी विचारताच तिने काहीही न बोलता दोराचे दोन तुकडे माझ्या हातात ठेवत "जो तो मोठे मोठे हंडॅ घेऊन येतोय मग कसा दोर टिकणार? " असे उद्गार काढले. "काही हरकत नाही तू काही काळजी करू नकोस ही बघ ही अशी घट्ट गाठ मारतो त्या दोन तुकड्यांची की

झाला पुन्हा दोर तयार. हे बघ " म्हणून मी तुटका दोर अखंड करून तिच्या पुढे ठेवला.

अर्थात माझ्या कर्तृत्वावर फारसा विश्वास नसणाऱ्या सुमतीचा या अखंड दोरावरही फारसा विश्वास बसला नाही कारण तिने दोन हातात तो दोर धरून तिच्या अल्प शक्तीनुसार त्याची दोन टोके ओढून पाहिली आणि जोड जसाचा तसा राहिल्यामुळे फारशी खळखळ न करता माझी ही कर्तबगारी मान्य केली आणि पुढचा समरप्रसंग टळला.

" लोकांना दोर देऊन उपयोग नाही. म्हणजे आपण आपल्याला पाणी हवे असेल तेव्हांच दोर रहाटाला बांधायचा. एरवी तो काढून ठेवायचा. "तसा हा पर्याय स्वागतार्ह होता फक्त त्यासाठी दोर रहाटाला लावण्या काढण्याचा खेळ मला दिवसातून काही वेळा करावा लागणार होता. पण त्यावरही तिने सुचवले,

" तुम्हाला दोर लावण्याचा आणि काढण्याचा वेळ वाचवायचा असेल तर एक गोष्ट करता येईल एक मोठे पीप आणून ते एकदाच भरून ठेवायचे आणि तसेच पिण्याच्या पाण्यासाठी एक हंडा " अर्थात या गोष्टी माझ्या भल्यासाठी करायच्या असल्यामुळे त्या मोहिमेवर लगेचच मी निघणे अपेक्षित होते आणि माझा दृष्टीने आवश्यकही. त्यामुळे मी ताबडतोब त्या मोहिमेवर प्रस्थान ठेवले.

अशा झटपट कृतीमुळे दुसरा दिवस शांततेत पार पडला पण दिवसाचा शेवट मात्र पुन्हा नवी अडचण उपस्थित करून झाला आणि ही अडचण काही साधी नव्हती.

ऑफिसातून घरात शिरताना खमंग बटाटे पोहे आणि चहाची फरमाइश करण्याच्या माझ्या मनसुब्यावर सुमतीच्या दु:खी चेहऱ्याने पाणी फिरवले. काहीतरी अकल्पित आणि अवघड संकट उपस्थित झाले असावे याची मला कल्पना आली. पण हे तिला विचारल्याशिवाय कळणे शक्य नव्हते.

" मी परत पुण्यालाच जाते " असा तिचा पवित्रा पाहून मी आणखीच हादरलो

" काय झाले तरी काय? " मी शक्य तो मृदु स्वर काढण्याचा प्रयत्न केला तरीही त्यातून माझाही त्रागा प्रकट झालाच.

" इथ आल्यापासून एक दिवस सरळ गेला असेल तर शप्पथ " तिच्या या वक्तव्यातून संकटाची कल्पना येणे शक्यच नव्हते पण ती कल्पना पाणी न्यायला आलेल्यापैकीच एका गृहस्थानी दिली,

" कायहो घागर पाण्यात पडलेली दिसतेय "म्हणजे आता दोर तुटण्यापेक्षाही अवघड प्रसंग उद्भवला होता तर. आणि त्याला माझेच कौशल्य कारणीभूत होते असे सुमतीच्या बोलण्यावरून दिसले,

" होना, तुम्ही जोडून दिलेल्या दोराचा निम्मा भाग घागरीसकट पाण्यात पडला "

" कायहो ती घागर काढून द्याल का? " माझ्यावरील संकटाचा पंचनामा करणाऱ्या त्या गृहस्थानाच कामाला लावण्याचा मी प्रयत्न केला.

" छे छे असली काम मी नाही करत, हां पण एक सांगतो ब्राह्मणगल्लीत ते गजाभाऊ आहेत ना त्यांच्याकडे गळ आहे तो आणा म्हणजे तो आडात टाकून त्या गळाला घागर लागली की वर ओढून घेता येईल"असा सल्ला देऊन ते गृहस्थ निघूनही गेले.

आता गजाभाऊंचा धावा करणे भाग होते. बऱ्याच प्रयत्नाने गजाभाऊंचे घर तरी सापडले. दारावर ठोठावले आणि दार उघडले गेले आणि पहिल्या दिवशी अगदी सक्काळी सक्काळीच दर्शन दिलेल्या महाभागांचे मिशाळ आणि तुळतुळीत डोके दाराबाहेर अवतीर्ण झाले आणि " काय पाहिजे? " अशी कसलेल्या आवाजात विचारणा झाली.

" गजाभाऊ आपणच ना? " स्वरात शक्यतो मार्दव आणीत मी विचारले.

" हो मीच पण काय काम आहे? " माझ्या मार्दवाच्या दसपट तिरसटपणा स्वरात आणून केलेली विचारणा. पण गरजवंताला

अक्कल नसते, त्यामुळे मी माझ्या गळाच्या मागणीचा गळ टाकून बघितला पण त्यांच्या उत्तराने निराशाच पदरी पडली,

" अहो गळ शेतावर गेलाय तो घरात कुठला सापडायला? बर या " आणि दार खट्टकन बंद झाले सुदैवाने माझ्या चपळाईमुळे माझी बोटे दाराच्या फटीत सापडून माझा शाइस्तेखान व्हायचा वाचला.

मी हात हलवत घरी!

" काय हो मिळाला का गळ? " मी गळ जणु खिशात टाकून आणला असावा अशा समजुतीत सुमतीची विचारणा. पण तिच्यासारख्या पुणेरी मुलीला दोष देण्यात काय अर्थ होता आणि देऊन उपयोग तरी काय होता.

" अहो ते गृहस्थ आपली घागर काढून द्यायला तयार आहेत " मी नसताना तिनच माझी या संकटातून सुटका करण्याचा प्रयत्न केलेला दिसत होता.

'"त्या "' गृहस्थांकडे मी मग उत्सुकतेने पाहिले. पांढरा शर्ट अर्ध्या खाकी चड्डीत खोचलेला म्हणजे संघपरिवारातला दिसतोय अर्थात मला त्याच्याविषयी आदर वाटू लागला.

" अहो अडचणीत सापडलेल्याला मदत करायला हवी ना? " हे त्याचे शब्द ऐकून माझा त्यांच्याविषयीचा आदर दुणावला.

" ताईनी मला सांगितले आणि मी लगेचच आडात उतरणारच होतो"

" हो पण मीच त्याना थांबवले कारण तुम्ही गळ घेऊन येणार होता, म्हटले गळ मिळाला तर आपले १०० रु. आणि नारळ वाचेल"

" म्हणजे काय? "

" काही नाही अशी लोकसेवेची कामे आम्ही करतो पण हल्ली लोकांना सगळयाच गोष्टी फुकट हव्या असतात. तुम्हीच सांगा ही प्रवृत्ती बरी आहे का? " त्यानीच माझी समस्यापूर्ती करत म्हटले.

" खरे आहे " मी त्याना दुजोरा दिला.

" पण १०० रु. म्हणजे जरा जास्तच होतात नाही का? " इति सुमती आणि मलाही तिच्या म्हणण्यात तथ्य आहे असे वाटले

" पहा बुवा, घागर अस्सल तांब्याची दिसतेय आजच्या बाजारभावाने तिची किंमत पाचशेच्याखाली नाही महाराजा, " घागरीची किंमत जरा जास्तच फुगवत आपली मागणी काही अवाजवी नाही हे आमच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करून ते गृहस्थ निघून गेलेसुद्धा बहुधा आम्ही त्याना परत बोलावूच याविषयी त्याना खात्री असावी. पण त्यांच्या या डावपेचामुळे मला

खिजवल्यासारखे वाटून मीही हट्टाला पेटलो आणि सुमतीला म्हणालो,

"अग त्यात काय विशेष आहे मीसुद्धा आडात उतरून घागर काढू शकेन"

" हं उगीच काहीतरी नका बोलू आणि असल्या फंदातही नका पडू. " या बाबतीत मात्र अगदी वास्तव वादी भूमिका घेत सुमती उद्गारली. माझ्या कर्तृत्बाचा अभिमान असला तरी योग्य तो अंदाजही तिला आतापर्यंत आला होताच.

" असं म्हणतेस? मग दाखवतोच तुला. अग लहानपणी अगदी खोल विहिरीत पोहलेलो आहे मी "

" अहो ती गोष्ट वेगळी आणि ही विहीर नाही हा आड आहे हे लक्षात घ्या"

पण मी अगदी हट्टालाच पेटलो

" हे बघ दोराला धरून खाली उतरायच मग एक उडी मारून घागर काढायची झालं "

" पण आत उतरल्यावर पुन्हा वर कस येणार? " ही तिची शंका बरोबर होती कारण घागर जरी मोकळी असली तरी एक हात ती पकडण्यात गुंतल्यावर वर चढण्याचे काम तितके सोपे नाही पण मग मला काहीसे सुचून मी म्हणालो

’ अग नंतर मला घागरीसकट वर ओढून घ्या की तुम्ही किंवा एकदा घागर आणि नंतर मला "

"असं म्हणताय? बर बघूया पण आता दोर तर आत पडलाय थांबा शेजारी कमलाबाईंकडे असेल " म्हणून ती गेली

पण पाणी न्यायला आलेल्या एका थोर गृहस्थाला वहिनीचा पुळका आला आणि " वयनी, काळजी कशाला करताय, हा घ्या दोर " म्हणत त्याने आपल्या हातातला दोर पुढे केला. इतक्या स्वस्तात बरीच मोठी करमणूक होण्याची अशी आलेली संधी जाऊ न देण्याचा त्याचा हा डाव माझ्या लक्षात आला.

आता मात्र माझ्या बढाई मारण्याचा मला पश्चाताप होऊ लागला. तितक्यात शेजारी रहाणाऱ्या कमलाबाईही लगबगीने आल्या. सुमती दोर मागायला गेल्यामुळे त्याना या गोष्टीचा पत्ता लागला होता नाहीतर खेड्यातील संवयीला अनुसरून शेजारच्या घरात काय चालले आहे याकडे त्यांचा एक कान असणार याविषयी मला शंका नव्हती..

" अहो मी याना सांगितल की तुम्ही आडात उतरता आहात म्हणून तर ह्या म्हणाल्या की मीपण येते म्हणून" इति सुमती

" हो बाई, असली धाडसाची काम पहायला मला फार आवडत. नरवीर तानाजी हा सिनेमा तानाजी आणि त्याचे मावळे

गड कसे चढून जातात फक्त हे बघण्यासाठी मी दहा वेळा पाहिला. गावात आलेल्या सर्कसचे तर झाडून सगळे खेळ मी अटेन करते. बरका श्यामकान्त, तुम्ही आज आडात उतरला तर मी ह्यांना पण उद्याच आडात उतरवते की नाही ते तुम्ही बघाच. "

" मग आजच त्याना उतरायला सांगा ना " असं त्याना सांगायच अगदी माझ्या ओठावर आलेल मी तसच गिळून टाकल. अखेर आता हा माझ्या इभ्रतीचा प्रश्न झाला होता.

आता माझी चर्या गंभीर बनत चालली. डोळ्यातून पाणीही येतेय की काय अशी भीती वाटू लागली. आपला बेत रद्द करावा की काय असे मला वाटू लागले. आणि मी सुमतीला म्हटलेसुद्धा

"अग आजचा दिवस चांगला नाही तेव्हां घागर उद्या काढायची का? "

" हे काय हो माझी किती निराशा होईल" कमलाबाईंनी दु:ख व्यक्त केले.

" म्हणजे काय? माझं आडात उतरण हा सर्कसचा खेळ वाटला की काय तुम्हाला? " मी जरा घुश्शातच विचारले.

" तुमच आपल काहीतरीच, पण अहो मग १०० रु. आणि एक नारळ द्यावा लागेल ना" इति सुमती म्हणजे इतका वेळ मला आवरणारी ही पण कमलाबाईंच्याच गोटात सामील झाली वाटत.

"माझ्यापेक्षा १००रु आणि नारळ तुला जास्त वाटतात का? "

" बर बर काही नको अगोदर फुशारकी मारलीतच कशाला? त्या सरूताईंच्या यजमानानी बघा परवा एक मोठ्ठा साप मारला "

" आणि बरका आमच्या ह्यांनी " लगेच कमलाबाई सुरू झाल्या

आता मात्र अशा पराक्रमी नवऱ्यांच्या मालिकेत बसण्यासाठी मला आडात उतरणे भागच होते.

शेवटी तो दोर घेऊन मी रहाटाच्या एका बाजूच्या खांबाला बांधला देवाचे नाव घेतले अन दोराला धरून पाय आडात सोडले. आडाची खोली बघून माझा जीव वरखाली होऊ लागला. कमलाबाई व सुमती मला धीर देत होत्य

" अहो त्या दगडाला धरा, एका हातान आणि दुसऱ्या हातान दोर पकडा. अहो असं कस करताय. त्या नरवीर तानाजीमध्ये कस तानाजी ---"

आता मी जर वर असतो तर तानाजीप्रमाणेच या दोन घोरपडींना खांडोळी करण्याची धमकी तरी निश्चितच दिली असती.

मी आडात उतरतो ही बातली गावात वाऱ्यासारखी पसरली व आमच्या आडावर इतकी गर्दी जमली की या करमणुकीसाठी

प्रत्येकी एक रु. जरी घेतला तर शंभर रुपये आणि नारळ विकत आणण्याइतके पैसे सहज जमा होतील असे वाटून गेले. सुमतीच्या चेहऱ्यावर वीरस्त्रीचे तेज ओसंडून वहात होते. सद्ध्या " झासीकी रानी"ही मालिका ती नित्यनियमाने पहात होती. तिचेच प्रतिबिंब जणु! फक्त वीरश्री दाखवण्याचे काम माझ्यावर सोपवण्यात आले होते एवढाच काय तो फरक.

प्रत्यक्षात माझी परिस्थिति फारच दीनवाणी झाली होती. आडाच्या बाजूच्या भिंतीवर शेवाळ चढल्यामुळे त्यावर पाय ठरत नव्हता, तर वरून दोराने हात काचत होता. तोंडाने रामरक्षेचा जप चालू होता. बर आता हा प्रयत्न सोडून वर चढावे तर वर असलेल्या बऱ्याच लोकांची निराशा होणार होती. तेवढ्यात गावातील फोटोग्राफर कॅमेरा घेऊन धावत आला आणि त्याने माझा एक फोटो पण खेचला.

" हं श्यामकांत शाब्बास, हळू, आस्ते, अहो तिकडे धरा, अहो तिथ काय धरता काय मरायचे आहे की काय, हं बरोबर "अशा अनेक सूचना, उद्गार उत्तेजनपर शब्द कानावर पडत होते आणि त्यातल्या कोणत्या उद्गाराचा काय अर्थ आहे हे मात्र माझ्या डोक्यात मुळीच शिरत नव्हते. अखेर एका दगडावरून माझा पाय सरकला आणि त्याच बरोबर पाण्याने गुळगुळीत झालेल्या

दोरावरून हातही घसरत मी थेट आडाच्या तळालाच पोचलो आणि पाण्यावर आपटलो थोडाबहुत पाण्याचा मार लागला आणि गुडघ्याला दगडाने दुखापत झाली इतकेच. लगेच वरच्या मंडळींनी "शाब्बास रे पठ्ठे ". म्हणून माझे अभिनंदन केले. फक्त त्यानंतर हरहर महादेव म्हणायचेच काय ते बाकी राहिले होते. सुमती तर इतकी वाकून बघत होती की ती आता माझ्या अंगावरच पडते की काय अशी भीती मला वाटू लागली.

गावातल्या मंडळींची ही रसिकता पाहून नोकरी सोडून जत्रेत मौतका कुव्वा खेळ करणाऱ्या मोटरसायकल बहाद्दरासारखे आडात चढण्याउतरण्याचेच प्रयोग करावे असा विचारही डोक्यात डोकावून गेला.

आता आडाच्या पाण्यातून घागर वर काढण्याचेच काय ते बाकी होते. सुदैवाने एका बुडीत घागर हाती आली पण मी वर यायला आणि पुन्हा तिने आडाचा तळ गाठायला एकच गाठ पडली पण अखेर दुसऱ्या बुडीत काम झाले. वरच्या लोकांनी माझी ही सर्कस चालू असतानाच दोर रहाटाला बांधून घागरीसह मला वर ओढून घेण्याची तयारी केली. आता त्या दोराचा खालचा भाग मी कमरेला गच्च बांधला आणि वरच्या लोकांना इशारा केला.

वरच्या लोकांनी उत्साहाने वर ओढायला सुरवात केली. आणि मी हळूहळू वर सरकू लागलो. आडाच्या तोंडापाशी येतो न येतो तोच ओढणाऱ्या व्यक्तीचा कसा काय रहाटावरचा हात ढिला झाला आणि एकदम वेगाने घागर आणि मी यांचे अध:पतन सुरू झाले ते मी थेट तळ गाठेपर्यंत! या वेळी मात्र त्या पाण्याच्या हबक्याने मी एकदम बेशुद्धच झालो. तासदोन तासाने मी शुद्धीवर आलो तेव्हां मी घरातल्या बिछान्यात होतो आणि माझ्या उशाशी बसून सुमती आणि कमलाबाई बोलत होत्या

" किती यांना आपण परोपरीन सांगितले की असले धाडस करू नका पण ते कुठले ऐकायला " मी कपाळावर हात मारून घेतला आणि मग दुसऱ्यांदा बेशुद्ध झालो.

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
# श्री श्याम कुलकर्णी यांचे हे दुसरे पुस्तक.

श्री श्याम कुलकर्णी हे इंजिनियरिंगचे शिक्षक. त्यांचे खरे गुरू म्हटले तर पु लं च. समोरच्या परिस्थितीने कितीही छळ करायचे म्हटले तरी त्यातली विसंगती शोधून हे स्वतःचे मन रिझवणार आणि भोवतालालाही अपल्या खुसखुशीत विनोदाने मजेत ठेवणार. त्यांच्या लेखनातला विनोद हा दर्जेदार, नेमका आणि अत्रेंनी विनोदातल्या व्याकरणात ज्याला सर्वोच्च म्हटले आहे त्या प्रकारचा. याचे कारण त्यांचा बहुतांश विनोद हा स्वतःचीच खिल्ली उडवणारा असतो. किंचित अतिशयोक्तीची फ़ोडणी असेल, पण मुख्य गाभा वास्तवातल्या विसंगतीचा. कार्टुनिस्ट लक्ष्मण सांगत की इथले राजकारणी मला कधीच विषयांची कमी पडू देत नाहीत. पण श्यामजींना तर घरी दारी देशो देशी सर्वत्र विनोदाचे विषय येऊन स्वतःच भेटतात.

श्री. श्याम कुलकर्णी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत

तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

श्री. श्याम कुलकर्णी यांचे ई साहित्यवरचे पहिले धमाल विनोदी पुस्तक. यावर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा आणि हसत सुटा. (इंटरनेट पाहिजे हो. नाहीतर उघडणार नाही)

